विचारविसावा

डॉ. सुहास पेठे

विचारविसावा

* * * * * * * * * * *

(विसावा देणारी विचारांची विद्या)

डॉ. सुहास पेठे

एम्.ए.,पीएच्.डी.(तत्त्वज्ञान)

* विचारविसावा

पुस्तकरूपाने प्रकाशित दुसरी आवृत्ती : जून २०१५
डिजिटल आवृत्ती : डिसेंबर २०२१

© डॉ. सुहास पेठे , सातारा, महाराष्ट्र

डॉ. सुहास पेठे यांच्या अन्य साहित्यासाठी पहा :
वेबसाईट : www.pethekaka.com
युट्यूब चॅनेल : Shri Pethe Kaka
अँड्रॉईड ॲप : SadhanNandadeep (साधननंदादीप)

जगात दुःख, अडचणी, संघर्ष, अज्ञान -
अशा अनेक गोष्टींना आपण सामोरे जात असतो.
त्या गोष्टी नाहीशा व्हाव्या असं अनेकांना वाटतं.
पण त्याला एक जगाची बाजू आहे.
एक स्वतःचीही.
जगाच्या बाजूचं काम जग किती करेल
ते इतरांनाच माहीत.
आपल्याला मात्र आपल्या बाजूनं
वाटचाल करायची संधी नक्की आहे.
त्याप्रमाणात आनंद, स्वास्थ्य आणि विसावा
मिळवण्याचीही.

त्या दिशेनं
हे काही प्रयत्न, काही शब्दसंवाद, काही विचार -

त्यासाठी शक्ती, बुद्धी देणाऱ्या
भगवंताच्या चरणी
आणि
याचा उपयोग करून घेणाऱ्या
जिज्ञासूंच्या चरणीही

सादर अर्पण...

- सुहास पेठे

अनुक्रम

१. जगापलीकडलं जग / ५
२. माणूस आणि अडचणी /११
३. आनंदाचा शोध / १६
४. रोजच्या आनंदाचा एक मार्ग / २७
५. आनंदाचा शोध : बाहेर नव्हे आत / ३८
६. स्वत:च्या विचारस्वातंत्र्याचा परिचय / ५०
७. थोडा विचार - मूल्यांचा / ५५
८. संघर्षापलीकडं / ६७
९. स्वत:ं शिक्षण / ७२
१०. वृद्धपणाचे सांगाती / ७७
११. फसवी फूटपट्टी / ८५
१२. विचारविकासानं निरंतर दिवाळी / ९०
१३. विचारविसावा / ९९

* * *

एखाद्या माणसाला 'आपण कुठं जगता किंवा तू कुठं जगतोस' असं विचारलं आणि मी पृथ्वीवर जगतो वगैरे उत्तरं टाळली तर 'मी जगात जगतो' असं सर्वसाधारण उत्तर आपल्याला मिळेल. ते उत्तर बऱ्याच लोकांचं असेल. ते उत्तर चूक नाही. आपण प्रत्येक जण 'जगातच जगतो' हे खरं असलं तरी, आपलं हे उत्तर 'अपुरं आहे', 'पूर्ण नाही' - असं मात्र विचार केला तरच लक्षात येईल. त्या प्रश्नाचं खरं, अधिक पूर्ण उत्तर 'मी माझ्या जगात जगतो' असं आहे. हेही आपल्याला चटकन न पटणारं, पण विचार केला, तर खरं ठरणारं उत्तर आहे, याची जाणीव आपल्याला होईल.

आपण आपला दिनक्रम क्षणभर पाहावा. सकाळी आपल्याला जाग आली की, साधं तोंड धुवायला मनुष्य बेसिनवर,बाथरूममध्ये, कट्ट्यावर गेला आणि तिथं आधीच कुणी आवरत असेल तर, आपल्याला अस्वस्थता येते, कुणाच्या कपाळावर आठ्या पडतात, ते ज्यांनी त्यांनी पाहावं - आठवावं -असाच विषय आहे. त्या क्षणीसुद्धा मनात इतके विचार येऊन जातात की, यांना आधी तोंड धुवायला काय होतं, नेमकं याच वेळी यांनी ते का करावं, मी उठून येतो आहे म्हटल्यावर यांनी थांबून मला सरकून जागा देऊ नये का, यांनी वाटलं तर थोडं उशीरा उठलं तरी चाललं असतं म्हणजे आत्ता हे मध्ये आले नसते, किती वेळ झाला हे तोंड धुतात, पटकन आवरायचं यांना अजून कसं कळत नाही - असे क्षणार्धात येऊन जाणारे किती विचार असतात !

बरं ही घटना वाटते तेवढी साधी, एवढीशी नाही. बेसिनवर जागा मोकळी मिळाली, तोंड धुऊन झालं तरी विषय संपत नाही. त्या क्षणी तो असा सुरू होत नसेल, हे खरं आहे. पण पाच मिनिटांच्या आत आपल्याला चहाला, कॉफीला बोलावलं नाही किंवा आणून दिलं नाही की, पुन्हा तसेच विचार मनात सुरू होतात ना ? मी मगाशीच उठलो तेव्हाच घरातल्यांचं लक्ष

जायला नको का, चहा दोन मिनिटांत होतो, माझं तोंड धुऊन झालं त्यावर आता पाच मिनिटं होऊन गेली म्हणजे जवळजवळ दहा मिनिटं झाली, अजून चहाचा पत्ता नाही, घरात शिस्त राहिली नाही - एक ना दोन.

आता याच क्रमानं पुढं दिवसभर काय काय होत असेल, ते सांगण्याची गरज नाही. हेच आंघोळीच्या वेळेबद्दल असेल, जेवणाच्या ताटाबद्दल असेल, इतकंच काय, त्यातल्या स्वत:च्या नावडीच्या भाजीबद्दल असेल, पुढं ऑफिसमध्ये बसायच्या टेबलापासून किंवा मिळालेल्या कामापासून ते न मिळालेल्या बढती, बदलीबद्दल असेल, व्यवसायात मालक-नोकर-ग्राहक कशाहीबद्दल असेल, हे वेगळं सांगायला नकोच.

प्रत्येक वेळेला घडणाऱ्या विचारांचं आणि अपेक्षांचं स्वरूप लक्षात घेणं, हे खरं शिकण्यासारखं आहे. आपल्या प्रत्येक कामाच्या वेळी आपल्याला असं नकळत वाटत असतं की, आपण करतो ती कामं बरोबर आहेत, आवश्यक आहेत, महत्त्वाची आहेत, त्यासाठी बाकीच्या सर्वांनी आपापली कामं-वेळा-मतं-जागा साऱ्या गोष्टी आपल्याला सोयीच्या होतील अशा बदलून घ्याव्या, निदान आपल्या कामांच्या आड येणार नाहीत अशा कराव्या. तसं घडलं नाही की, मग त्यात्या सर्वांचा त्रागा - त्रास होतो, त्यांच्यावर राग निघतो, धुसफूस होते, अनेकदा तर तोतो विषय डोक्यातून अनेक दिवस जात नाही. कधी संधी मिळाली तर उलट उट्टं निघतं, निदान बोलून तरी दाखवलं जातं, हा अनुभव आपण घेतला असेल. आपण तेवढे सावध नसू, तर निदान इतरांच्या बाबतीत तरी तो आपल्याला आला असेल.

इतरांच्या बाबतीत जेव्हा असा अनुभव आपल्याला येतो, तेव्हा तरी आपल्याला हा माणूस जुळवून घेणारा नाही, आपल्या अडचणी लक्षात घेणारा नाही, स्वत:पुरतं पाहाणारा आहे, अशा प्रतिक्रिया मनात उमटतात ना ? वेळी त्या - त्या माणसांचा रागही येतो. फक्त त्याच वेळी आपलंही

इतरांच्या बाबतीत अनेकदा तेच घडत असेल, त्यांनाही तेव्हा असंच वाटत असेल, एवढं लक्षात घेतलं तरी पुरे.

याचं सखोल कारण असं आहे की, माणूस नुसता 'जगात जगत नाही' तर तो 'स्वत:च्या जगात जगतो'. त्याच्या स्वत:च्या कामांचं, कुटुंबाचं, संस्कारांचं, मतांचं, विचारांचं, अनुभवांचं, अपेक्षांचं, आग्रहांचं, आवडी-निवडींचं - असं एक जग असतं. तो जगतो, तो खरा या विशाल, अगणित माणसांच्या जगात. पण मनानं आणि कृतीनंही मात्र तो जगत असतो, तो त्याच्या या 'स्वत:च्या जगात'! कारण त्याच्या त्या जगाच्या बाहेर काहीही घडलं की, त्याला अस्वस्थता येते, राग येतो, त्रास वाटतो, स्वास्थ्य जातं, तो निराश होतो - काहीही होतं. जर माणूस असाच स्वत:च्या जगात राहील, तर असं होणं अपरिहार्यही असतं. कारण सत्य, जगाचा कारभार काही असा त्याच्या एकट्याचा नसतो. जग काही एखाद्या व्यक्तीच्या जगातल्या गोष्टींवर ठरत नाही, त्याच्या अस्तित्वात चालवलं जात नाही. त्यात असे इतर कितीतरी लोक आहेत, विचार आहेत, अकल्पित वस्तुस्थिती आहेत, विविध मतं-विचारप्रणाली आहेत, प्राथमिकता - प्रायोरिटीज आहेत, इतर लोकांच्या अपेक्षा-गरजा आहेत- आणि त्या साऱ्याही महत्त्वाच्या आहेत, अनेकदा अधिक गरजेच्या आणि सत्य आहेत.

पण त्यासाठी या 'स्वत:च्या जगापलीकडच्या जगाचा' विचार आपल्या मनात यायला हवा ना ? तर मग 'स्वत:चं जग' जरूर असू द्या, पण 'इतरांच्या जगा'चाही विचार करावा लागेल. कारण मुळातच एक तर, हे जग माझं एकट्याचं नाहीच, साध्या चार माणसांच्या कुटुंबातसुद्धा ते तसं शक्य नाही. मुळात कुटुंबच दोन माणसांनी आकाराला आलं ना, त्यात जसं दुसऱ्याला स्थान आलं, पुढं तिसऱ्या-चौथ्याला, नातेवाईकांना स्थान आलं, तसंच ते त्यांच्या मतांना, कामांना, विचारांनाही आलंच. त्यांच्या साऱ्यांचा

समावेश 'माझ्या जगात' करणं गरजेचंच आहे.

दुसरं हेही आहे की, मुळात 'माझं जग' आकाराला आलं तेच इतरांच्यामुळं नाही का ? मी कुठं जगात स्वयंभू आहे ? स्वत:चा स्वत: कुठं जन्माला-आकाराला आलो आहे ? मग इतरांचं स्थान, त्यांची मतं, त्यांची कामं, त्यांना मान हे सारं ओघानंच नाही का आलं ? इतकंच काय, ज्या माझ्या विचारांनी-मतांनी-आग्रहांनी-कामांनी 'माझं जग' निर्माण झालं आहे- ते सारंसुद्धा कितीतरी प्रमाणात या साऱ्या 'इतरांच्या जगा'कडूनच मी घेतलेलं नाही का ? घरंदारं-माणसं-भाषा-संस्कृती-विचारधारा अशा 'माझ्या जगा'त दाखल झालेल्या असंख्य गोष्टी खऱ्या अर्थानं किती 'माझ्या स्वत:च्या' आहेत ? उलट विचार केला तर लक्षात येईल की, त्यांतलं बरंचसं इतरांचंच आहे. मला पटलं म्हणून, संस्कार घडले म्हणून मी आता ते माझंच समजून त्याचा आग्रह धरतो. इतकंच काय, ते देणाऱ्या इतरांनीच आता या माझ्या अपेक्षा, मतं, गरजा- यांच्याप्रमाणं राहावं असं म्हणतो-हेच अन्याय्य आहे.

म्हणून स्वत:च्या जगात जरूर असावं, पण इतरांचंही जग आहे, त्यातही महत्त्वाच्या गोष्टी आहेत, त्या सत्य आहेत, त्यांच्या गरजा वेळी माझ्यापेक्षाही जास्त निकडीच्या आहेत, मलाच उलट त्यासाठी काही करण्याची - निदान ते समजून घेण्याची गरज आहे, हे जरूर लक्षात येईल. हे जर एकदा आपण कळून घेतलं,तर याची अधिक व्यापकता आणि ते लक्षात घेतल्यामुळं दूर होणारे अनेक सामाजिक प्रश्नही आपल्या लक्षात येतील.

उदाहरणार्थ, अशी प्रत्येकाची 'स्वत:ची जगं' अनेक प्रकारची असतात, हे ध्यानी येत जाईल. ती कधी चालीरितींची असतात, कुलधर्म-कुळाचारांची असतात, जीवनपद्धतीची असतात, आहारविहारांची असतात, आवडी-निवडींची असतात. इतकंच काय, ती राजकीय-सामाजिक मतांची-पक्षांची असतात, जातीपातींची असतात, वेळी भाषांची - राज्यांची-देशांची

नव्हे तर धर्मांचीही असतात. पण अखेर ती 'स्वत:च्या जगा'सारखीच मर्यादित असतात. त्या 'जगांपलीकडची जगं' असतात, त्यांतही तथ्य असतं, विचार करावा, घ्यावं असं असतं, मान देण्याजोगं असतं, कदाचित त्यांचा विचार करण्याची, त्यासाठी आधी कृती करण्याची गरज असते - सत्य माझ्याइतकं इतरांच्या म्हणण्यात, जगातही आहे. या वृत्तीनं राहण्याची, सहिष्णुता दाखवण्याची गरज तर नक्कीच असते.

हा स्वत:च्या 'जगापलीकडच्या जगाचा' विचार एकदा सुरू झाला, त्याचा अंमल सुरू झाला, तर आपल्या असं लक्षात येईल की, अगदी सुरुवातीला पाहिलं तसं, सकाळी उठल्यापासून निर्माण होणारे प्रश्न उद्भवणार नाहीत. सारं सर्वांच्या सोयीनं आणि गरजेनं केलं तर काम आपलंही होतं आहे आणि इतरांचंही, हे लक्षात येईल. मग याच पद्धतीनं पुढं विचार करीत गेलं तर कुठल्याच अभिनिवेशाला वाव राहाणार नाही, मग तो कुठल्या कामाचा असो, कुठल्या पक्षाचा असो, कुठल्या पंथाचा असो, धर्माचा असो वा भाषा किंवा प्रदेशाचा असो.

मग लक्षात येतं की, जगातले काय, घरातले काय, नोकरी-व्यवसायातले काय, धर्मपंथातले काय - अनेक संघर्ष या 'स्वत:च्या जगा'त राहाण्यानं, तेच खरं-पूर्ण-सत्य-महत्त्वाचं मानण्याच्या आग्रहामुळं निर्माण झाले आहेत. असंख्य विसंवाद, अस्वास्थ्य, कोर्टकचेऱ्या, डावपेच, विविध प्रकारच्या विघातक कृती - या अशा संकुचित जगाच्या आग्रहांतून निर्माण झालेल्या आहेत. त्यांतल्या कितीतरी टाळता येणं शक्य आहे. त्यावर होणारे अकारण खर्च, शक्तीचे अपव्यय, मानसिक त्रास नि दडपणं, जाणारा अमूल्य मानवी वेळ - या साऱ्यांची बचत आवश्यक आहे आणि ती शक्य आहे.

फक्त त्यासाठी या स्वत:च्या 'जगापलीकडल्या जगा' चा विचार आणि त्यानुसार कृती करण्याची गुरुकिल्ली हाती घ्यावी लागेल.

आता ते काम कुणालाही स्वत:पासून सुरू करता येईल, असं आहे. स्वत:पुरता तरी स्वत:च्या आणि जगाच्या स्वास्थ्याचा प्रश्न सुटू लागेल. जगाच्या स्वास्थ्याचा प्रश्न खूप मोठा असला, त्यासाठी लागणारे प्रयत्नही खूप असले तरी तो सगळा प्रवास काही एका पावलात होत नाही. असा हा स्वतःच्या जगापुरता विचार करण्याबरोबर इतरांच्या जगाचा जेव्हा विचार सुरू होतो, कृती सुरू होते, तेव्हा हा प्रश्न सुटायला खरी सुरुवात झालेली असते - हे आपल्या लक्षात येईल. सगळे प्रश्न एकदम मोठ्या पातळीवर सुटणं हे एकदम आकर्षक आणि आदर्श वाटलं तरी ते प्रत्यक्षात किती अवघड आहे, याची कल्पनाच केलेली बरी. ते सुटण्याच्या नुसत्या मोठमोठ्या योजनांचा आणि कल्पनांचा उपयोग होत नाही, हे आता आपण अनुभवानं शिकलेले आहोत.

म्हणून तरी निदान आपण इतरांच्या जगाचा विचार आपल्या कृतीत समाविष्ट करण्यानं हा प्रश्न सोडवण्याची खरी सुरुवात करू शकतो. इथं हेही लक्षात घ्यावं की, आपलं स्वास्थ्य जगाच्या स्वास्थ्याचाच एक भाग आहे. आपण ज्यावेळेला या मार्गांनी स्वतःबरोबर जगाच्या स्वास्थ्याचा विचार आणि कृती सुरू करतो त्यावेळी स्वतःचा प्रश्न सुटण्याबरोबर साऱ्या जगाच्या स्वास्थ्याचा प्रश्न सुटण्याची सोपी, मोलाची आाणि निश्चित कृती सुरू होते. जी खरी गरजेची आहे !

* * *

२. माणूस आणि अडचणी

माणूस आणि अडचणी यांची सांगड तशी पुरातन आहे. क्वचित एखादा कालखंड अडचणींशिवाय जात असेल. पण तो अपवादच. कधी परिस्थितीची अडचण असते, कधी प्रकृतीची, कधी माणसांची, कधी पैशाची. माणूस जणू एका अडचणीतून सुटण्याचीच दुसरी अडचण वाट पाहात असते. त्यामुळं पहिली अडचण सुटताच दुसरी अडचण दत्त म्हणून उभी राहते. अनेकदा तर माणूस एकाच वेळी अनेक अडचणींनी वेढलेला असतो. म्हणूनच या अडचणींवर थोडा विचार करण्याची गरज माणसाला आहे.

या अडचणींची काही ठळक वैशिष्ट्यं आपल्या प्रथमदर्शनी लक्षात येतील. कधी माणसापेक्षा अडचणी मोठ्या ठरतात, तर कधी माणूस अडचणींपेक्षा मोठा ठरतो, तर कधीकधी हा सामना बरोबरीत सुटतो. याच्यावर एवढा विचार करण्याचं कारण असं की, माणसापेक्षा ज्यावेळेला अडचणी मोठ्या ठरतात, तेव्हा त्याचे माणसाच्या व्यक्तिगत व कौटुंबिक जीवनात - अस्वास्थ्य, निराशा, गैरसमज, चुकीच्या कृती - अशा प्रकारचे कितीतरी दुष्परिणाम होत असतात. इतकंच नव्हे, तर अडचणींपुढं माणूस जेव्हा अगदी तोकडा पडतो तेव्हा, जीवन संपवण्यापर्यंतचे कोणतेही दुर्दैवी निर्णय तो घेतो. म्हणून आपल्याला या अडचणींचा विचार केला तर, हे नक्कीच वाटेल आणि पटेल की, माणसापेक्षा अडचणी कधीच मोठ्या होता कामा नयेत. शक्यतो, त्या माणसापेक्षा लहान कशा राहतील, निदान त्या माणसाच्या आटोक्यातल्या राहून हा विषय बरोबरीनं कसा सुटेल, याचा विचार करण्याची माणसाला आत्यंतिक गरज आहे. हा विचार करताना समोर येणाऱ्या अनेक बाजू आपण थोडक्यात पाहू या.

एका माणसाला त्याचा जुना, मोडकळीला आलेला प्रचंड वाडा पाडून नवी इमारत उभी करायची होती. अनेक कामगार आणल्यास त्यांच्यात

होणाऱ्या कटकटी, मतभेद लक्षात घेता, त्यानं हे जुना वाडा उतरवण्याचं काम एका गवंड्याकडून करून घ्यायचं ठरवलं. त्याच्या बोलवण्यानुसार अनेक गवंडी येत. त्या वाड्याच्या दर्शनी भागात भलीमोठी जाडजूड भिंत होती. ती पाहून छाती दडपून जाई. आलेले गवंडी 'नंतर काय ते सांगतो' असं म्हणत आणि निघून जात. ते पुन्हा परत येत नसत.

एके दिवशी एक गवंडी आला. त्यानंही नेहमीप्रमाणं ती भिंत पाहिली. समोर दगड ठासूनठोसून पाहिले, ते हलतही नव्हते. त्या भिंतीची सुरुवातीपासून शेवटपर्यंत त्यानं पाहणी केली. मालकाला वाटलं, हाही 'नंतर सांगतो' म्हणून जाणार. पण त्यानं शांतपणे मालकाला सांगितलं की, 'हे काम मी करीन'. आता आश्चर्य करण्याची पाळी मालकाची होती. त्यानं ते काम त्या गवंड्याला दिलं आणि उत्सुकतेनं ही भिंत तो गवंडी कशी उतरवणार ते पाहण्यासाठी तो स्वत: तिथंच थांबला.

त्या गवंड्यानं भिंतीच्या जवळच्या दर्शनी भागाला हात न लावता भिंतीच्या दुसऱ्या टोकाकडं पहार व कुदळ घेऊन प्रयाण केलं. मालकाच्या डोळ्यांदेखत पाहता पाहता त्या बाजूनं त्यानं दोनचार मोठे दगड हलकेच ढासळवले. भिंत उतरायला सुरुवात झाली होती. गवंड्यानं संपूर्ण भिंतीचा व्यवस्थित अंदाज घेतला होता. दर्शनी ती कितीही पक्की वाटत असली तरी, पलीकडच्या बाजूचे काही दगड थोडे सैल होते. ते त्यानं हेरले होते. म्हणूनच इतरांना अडचणीचं वाटणारं आणि त्यामुळं त्यांनी सोडून दिलेलं काम यानं शांतपणानं व कमी वेळात संपवलं होतं.

अनेकदा अडचणींचंही असंच असतं. त्या दर्शनी कठीण आणि अभेद्य वाटतात, पण अनुभवी व विचारी नजर जर आपल्याजवळ असेल, तर त्यांतली ठिसूळ जागा आपल्याला हमखास शोधता येते आणि मग आपलं काम सोपं होऊन जातं.

या अडचणींचे काही महत्त्वाचे प्रकार आहेत. त्यांतले शारीरिक अडचणी, परिस्थितीतल्या अडचणी व मानसिक अडचणी हे तीन महत्त्वाचे प्रकार आहेत. इथं मानसिक अडचणींमध्ये कल्पना, भावना, विचार यांसारख्या साऱ्या अडचणी गृहीत धरल्या आहेत. या तीनही प्रकारच्या अडचणी प्रत्येकाला थोड्याफार फरकानं वाट्याला येत असल्या तरी, त्यांचं हे एक वैशिष्ट्य आहे की, त्या एकत्रितपणे कधी माणसाच्या वाट्याला येत नाहीत. शिवाय त्यांचं दुसरं वैशिष्ट्य हे आहे की, यांतली कुठलीच अडचण कुणाच्या वाट्याला कधी पूर्णपणे येत नाही. म्हणजे काय ते थोडं उदाहरणानं पाहू.

शारीरिक अडचणी - आजारपणं, अपघात, व्यंगं, उणिवा - अशा पद्धतीनं वाट्याला आलेली माणसं, अनेकदा त्यानं त्रस्त होऊन तक्रार करताना दिसतात, खंत करताना दिसतात. अनेकदा निराश झालेली दिसतात. वरवर पाहाता त्यांचं दुःख इतरांना पटून तेही त्यांचीच री ओढून त्या माणसांचं दुःख पक्कं करतात.

परंतु वर सांगितल्याप्रमाणं - कुठलीही एक अडचणदेखील माणसाच्या वाट्याला कधी पूर्णपणे येत नाही - या तत्त्वानुसार यांच्या बाबतीतही पूर्ण शारीरिक प्रतिकूलताही कधी नसते. हात नाहीत म्हणून खंत करणाऱ्या माणसाला पाय दिलेले असतात. दुर्दैवानं हातपाय दिले नसतील तरी डोळे दिलेले असतात. प्रत्येकानं आपल्या या शारीरिक अडचणीकडं पाहिलं तर याची सत्यता पटू शकेल. मग अडचणीची तीव्रताही कमी होईल आणि तक्रारही.

जागतिक कीर्तीचे हॉकिंग्जसारखे आजचे शास्त्रज्ञ विकलांग अवस्थेत व्हीलचेअरवर असूनही जगाला पुढं नेतात आणि उपयोगी पडू शकतात. गेल्या शतकातला कार्ल उन्थानसारखा माणूस दोनही हात नसताना पायानं व्हायोलिन वाजवून जागतिक कीर्तीचा संगीततज्ज्ञ होऊ शकतो. 'अडचण

कधी पूर्ण अडचण नसते' एवढं मात्र ओळखण्याची गरज आहे.

जी गोष्ट शारीरिक अडचणींच्या बाबतीत, तीच गोष्ट परिस्थितीच्या अडचणींच्या बाबतीत. वातावरण, घरदार, वस्तू, पैसा, माणसं अशा साऱ्या गोष्टींनी बनणारी परिस्थिती हीदेखील कुणाला पूर्णपणे प्रतिकूल असत नाही. पैशाच्या दृष्टीनं अडचणीत असणाऱ्या आणि त्यामुळं गांजलेल्या माणसानं या थोड्या विचारी दृष्टिकोनानं पाहिलं, तर त्याच्या हे लक्षात येऊ शकेल की, त्याला घरादाराची किंवा चार जोडलेल्या माणसांची अनुकूलता असते. तिच्या साहाय्यानं त्या परिस्थितीवर मात करण्याची कुवतही त्याच्यात असते. अशा वेळी संपूर्ण प्रतिकूलता तर नाहीच, पण आपल्या वाट्याला इतर अनेक अनुकूलताच आहेत, हे त्याला दिसेल, निराशा टळेल. प्रतिकूलतेतून बाहेर पडण्याचा मार्गही सापडेल.

हीच गोष्ट मानसिक अडचणींच्या बाबतीतही आहे. या अडचणी खूप लोकांना सतावतात. त्यात भीतीसारख्या भावनांचा आणि कल्पनांच्या शक्तींचा मोठा वाटा आहे. हे लक्षात आलं तरी अडचणींवरील निम्मा मार्ग सापडेल. नवीन ठिकाणी किंवा नवीन गावात गेल्यावर अडचणी येणार हे जरी खरं असलं, तरी आपलीच कल्पना त्या अडचणीला एवढं मोठं स्वरूप देते की, नवीन ठिकाणी प्रत्येक क्षणीच आपल्याला जणू अडचण येणार आहे असं वाटतं ! मग भीती पुढं सरसावते आणि ती भीती 'ही अडचण' आणखीच बिकट करून टाकते. या सगळ्यांत - मूळ अडचण कधी पूर्णपणे अडचण नसते - हे आपण विसरूनच जातो. तेच जर आपण हे तत्त्व लक्षात ठेवून त्या परिस्थितीकडं पाहिलं, तर चार प्रतिकूल, पण सहा अनुकूल गोष्टी - अशी खरी वस्तुस्थिती आहे, हे लक्षात येतं आणि त्या सहांच्या साहाय्यानं चारवर मात करायचा मार्गही सुचू लागतो.

जी गोष्ट या बाबतीत खरी आहे, तीच शारीरिक - मानसिक आणि

परिस्थितीच्या अडचणींच्या बाबतीत प्रतिकूल होण्याबद्दल आहे. यांतील एक किंवा दोन गोष्टी प्रतिकूल असतील, तर तिसरी तरी माणसाला अनुकूल असते. म्हणजे एखाद्याला पैसा व माणसांची - परिस्थितीची प्रतिकूलता असली, तरी त्यासाठी झगडण्याचं शारीरिक बळ त्याच्याजवळ असतं. शरीर आणि परिस्थिती प्रतिकूल असतील तर त्या दोन्हींशी झगडण्याचं मानसिक बळ त्याच्याजवळ असतं.

थोर सत्पुरुष गुरुदेव रानडे हे शरीर प्रकृतीनं नाजूकच. तेही एकदा म्हणाले होते की, 'गेल्या पंचवीस वर्षांत असा एखाददुसराही दिवस गेला नसेल की, ज्या दिवशी माझी प्रकृती चांगली होती.' परंतु अशाही अडचणीच्या परिस्थितीत विलक्षण साधना आणि सत्कार्याचा डोंगर रचण्याएवढं मानसिक व आध्यात्मिक बळ त्याही परिस्थितीत त्यांच्याजवळ होतंच. हे लक्षात घेतलं, तर आपल्या तथाकथित अडचणींना किती महत्त्व देता येईल ?

थोडा राहिला विचार तो सदैव अडचणीत असणाऱ्या माणसांचा. ती माणसं सदैव अडचणीत असतात, हे अगदी खरं म्हणून गृहीत धरलं तरी, त्याचा अर्थ असा होतो की, त्यांच्याकडं निसर्गानं सदैव काहीतरी अनुकूल ठेवलं आहे. प्रश्न आहे तो, ती अनुकूलता त्यांना पाहता येते की नाही, तिचा जास्तीत जास्त वापर करता येतो की नाही,याचा!थोड्या विचारान्ती हे जमलं तर मुळातच 'सदैव' अडचणीत राहण्याची वेळही त्यांच्यावर येणार नाही.

आपल्याआपल्या ठिकाणी प्रत्येकाला वेगवेगळ्या स्वरूपात अडचणींचा सामना करावा लागतो आहे. पण त्यात वर उल्लेखलेली व्यापक वैचारिकता टिकवता आली, अनुकूलता लक्षात घेता आल्या आणि 'अडचणींपेक्षा माणूस मोठा' असण्यावर श्रद्धा असली, तर अडचणींवर मात साधणं कुणालाही शक्य आहे !

* * *

माणसाची अखंड धडपड चालू आहे. इथंच नाही, तर जगाच्या पाठीवर कुठंही जा, ही धडपड अविरतपणे सुरू असलेली आपल्याला दिसून येईल. नाइलाज म्हणून म्हणा किंवा क्षणभरासाठी विसावा म्हणून म्हणा, जरा तास-दोन तासांसाठी स्वस्थ बसलेला माणूस जरी आपल्याला आढळला, तरी त्या तास-दोन तासांतसुद्धा तो मनानं स्वस्थ बसलेला आढळणार नाही. बसल्या जागीसुद्धा तो काय काय घडलं, कसं कसं घडलं, पुढं काय काय करायचं याचं नियोजन मनानं करीत बसलेला दिसेल - एकूण त्याच्या धडपडीला तसा विसावा नाही.

बरं, यात मोठीमोठी माणसं व्यापात असावी हे पटतं, पण अगदी सर्वसामान्य माणूस तरी स्वस्थ असावा ! तर तसंही आढळणार नाही. मोठे आपापल्या परीनं व्यापात असतील तर, तोही आपल्या परीनं या धडपडीत आहे, असं दिसेल. बरं मोठ्या माणसांना म्हणजे सगळ्याच मोठ्या माणसांना - गरीब किंवा श्रीमंत - सगळ्यांना धडपड आणि व्याप असतात, पण लहानसहान मुलाबाळांना ते असायचं काय कारण ? पण तीही रिकामी नाहीत. तीही आपापल्या परीनं सतत धडपडत आहेत, कामात आहेत.

इतक्या पातळीवर ही धडपड आढळते आहे, तर तिच्यात स्वाभाविकपणे खूप प्रकार आढळणार. तसे ते दिसतातही. शाळकरी मुलांच्या शाळा -अभ्यास -खेळ -छंद-शिकवण्या असतील तर मोठ्यांच्या बाबतीत नोकरीसाठी धडपडी अर्ज-विनंत्या-मुलाखती-तयारी-परीक्षा-स्पर्धा अशा अनेक बाबी. इतर मोठ्यांच्या बाबतीत उद्योग-व्यवसाय-शेती-त्यांतल्या रोजच्या उलाढाली-संपर्क-हेवेदावे-व्यक्तिगत प्रपंच-लग्नं-मुलंबाळं-सामाजिक कार्यं-संस्था-राजकारणं-सैन्यं-युद्धं-डावपेच-या यादीला अंतच नाही.

पण यावरून असं वाटतं की, या साऱ्या धडपडीमागचे हेतूसुद्धा किती वेगवेगळे असतील ! अभ्यासामागं नंबर मिळवणं, पास होणं, नोकरी, उद्योगात तज्ज्ञता मिळवणं, कौशल्य मिळवणं, पैसा मिळवणं, घर बांधण्यात हक्काच्या, सत्तेच्या घरात राहायला मिळणं, सत्ता मिळवण्यात मानमान्यता मिळणं, परिस्थितीवर आपलं नियंत्रण प्रस्थापित करणं - असे हेतूसुद्धा कितीतरी प्रकारचे असल्याचं दिसेल !

पण या साऱ्यामागं विचार करण्यासारखी आश्चर्याची एकच गोष्ट आढळेल आणि ती म्हणजे माणसांचे प्रकार काय किंवा त्यांच्या कर्मांचे-धडपडीचे प्रकार काय आणि त्यामागं असलेल्या हेतूंचे प्रकार काय - ते सारे अगणित दिसले, तरी त्याचं एकच एक समान सूत्रं, समान उद्दिष्ट-समान हेतू आहे आणि तो म्हणजे आनंद मिळवणं ! कधी त्याला माणूस सुख म्हणेल, कधी समाधान म्हणेल ! पण या साऱ्या धडपडीमागं त्याला हवा असतो तो म्हणजे आनंद !

अर्थात वर वर पाहिलं तर, व्यवसाय करणारा किंवा नोकरी करणारा माणूस ती करतो, ती त्यातून मिळणाऱ्या फायद्यासाठी किंवा पगारासाठी करतो, असं दिसतं. शेतकरी एवढे कष्ट करतो, उन्हातान्हात राबतो तो, ते - ते पीक मिळावं, तेही चांगल्या दर्जाचं, भरपूर मिळावं - यासाठी ! एखादा डॉक्टर वेळअवेळ न पाहाता कष्ट करतो आहे तो पेशंट बरा व्हावा, त्याचा आजार दूर व्हावा - यासाठी असं दिसतं खरं ! त्यांची प्रत्येकाची उद्दिष्टं वेगवेगळी दिसतात.

पण विचार केला तर लक्षात येईल की, उद्दिष्ट हे फायदा, पगार, पीक असं काहीही असो, जर तेच उद्दिष्ट हे आपलं खरं आणि अंतिम उद्दिष्ट असेल तर ते उद्दिष्ट पूर्ण झालं की, आपण थांबलं पाहिजे ! हातात पगार पडला किंवा पीक आलं की, ते घेऊन थांबलं पाहिजे ! पण तसं होत नाही.

त्या नोटांचा किंवा धान्याचा तसा प्रत्यक्ष उपयोग होत नाही. त्या नोटा देऊन तो बाजारातून धान्य आणील, ते दळून-कांडून शिजवून खाईल. बरं, ते खायला मिळावं यासाठी त्यानं नोकरी केली म्हणावं, तर निदान ते तरी त्याचं अंतिम उद्दिष्ट ठरेल, पण तसंही घडत नाही !

ते खाल्ल्यावरसुद्धा त्याला त्याचा अखेर आनंद व्हायला हवा असतो नाही का ? कारण जर हेच खाणं आनंदाचं ठरत नसेल, तर तो माणूस ते अन्न न खायलाही तयार होतो ना ? तो उपाशी राहायलाही तयार होतो ! मग खाणं हेसुद्धा अंतिम ध्येय म्हणता येत नाही.

सुखाचं व्हावं म्हणून माणूस जसा जेवायला तयार आहे, तसाच सुखाचं व्हावं म्हणून तो उपाशी राहायलाही तयार आहे, यावरून एक महत्त्वाची आणि आश्चर्यकारक गोष्ट लक्षात येईल की, अनंत माणसं आणि त्यांचे जगण्याचे अनंत प्रकार दिसले तरी 'आनंद मिळवणं किंवा आनंदाचा शोध घेणं' हे त्यांचं एकमेव आणि निदान प्रधान तरी उद्दिष्ट आहे!

हे किती लागू आहे पहा ! या आनंदासाठी माणूस इतक्या खटपटी-लटपटी करतो आहे, हे तर दिसतंच. त्यात तो सारी चांगली कृत्यं आनंदासाठी करतोच, पण वेळी निषिद्ध-वाईट कृत्यंसुद्धा तो कुठंतरी याच आनंदाच्या ओढीपोटी करतो आहे, असं लक्षात येईल. माणूस जेवतो-खातो ते आनंदासाठी हे आता लक्षात येतं आणि पटतंही. पण तो खोटं बोलतो, व्यसनं करतो तेसुद्धा मुळात या आनंदाच्या प्राप्तीसाठी, हेही आपल्या लक्षात येईल. जेवणं सुखाचं होत नसेल तर माणूस उपाशी राहायला तयार आहे, फक्त ते तरी आनंदाचं व्हावं, ही त्याची ओढ आहे. तीच गोष्ट वाईट करण्याची किंवा खाण्याची आहे. चांगलं-शुद्ध खाण्यापेक्षा वाईट खाण्यानं, वाईट बोलण्यानं आनंद अधिक मिळेल असं त्याला वाटतं. म्हणून तो ते करायला तयार आहे.

समजा, त्याला त्या वाईट खाण्यानं, बोलण्यानं दु:ख होतं आहे, हे कळलं किंवा त्यापेक्षा शुद्ध, चांगलं खाण्या-बोलण्यानं अधिक आनंद होतो आहे असं आढळलं, तर तो चांगलं खायला, बोलायला तयार होईल, यात नवल नाही. कारण मुळात त्याचा उद्देश आनंद मिळवणं - हा आहे. ती विशिष्ट गोष्ट करणं हा नाही ! अर्थात यावरून वाईट गोष्ट करणं हे जरी समर्थनीय ठरत नसलं, तरी आपल्या कृतींच्या मागची मूळ प्रेरणा आनंदाचा शोध घेण्याचीच आहे, एवढं मात्र इथं लक्षात घेण्यासारखं आहे !

यावरून आणखीही एक महत्त्वाचा मुद्दा आपल्या लक्षात येऊ शकेल. तो म्हणजे एखादं व्यसन करणाऱ्याचं मूळ प्रेम, हे त्या आनंदावरच आहे. फक्त त्याचा तो आनंद मिळवण्याचा मार्ग चुकलेला आहे, असं आपण म्हणतो. म्हणजेच असं की, व्यसन करताना जरी त्याला आनंद मिळाल्यासारखं वाटलं, तरी पुढं तोच आनंद अनेक दु:खांना आमंत्रण देणारा ठरतो, असं आपल्याला आढळतं. त्यातही जो आनंद या क्षणी मिळाल्यासारखा वाटतो तो तरी कितपत खरा आहे, टिकाऊ आहे ? कारण एखाद्या कुत्र्यालासुद्धा कठीण, टोचणारा हाडकाचा तुकडा चघळताना आनंद मिळाल्यासारखा वाटतो आहे, असं आपण पाहातो. पण आपण हे थोडं ओळखून असतो की, त्याला यातून खरं काहीच मिळत नाहीये. त्या हाडकातही काही नाहीये उलट, निघतंय ते याचं स्वत:चंच रक्त ! आणि तेही त्याला स्वत:ला नकळत त्रास होऊन. पण भ्रम असा आहे की, यातून काही मिळतं आहे, पोट भरतं आहे, आनंद होतो आहे ! पण हे कुणाला ? ज्याला हा सारा भ्रमाचा घोटाळा आहे, हे कळतं त्याला !

यावरून हाही एक मुद्दा आपल्या ध्यानी येऊ शकतो की, स्वत:च्या बाबतीत काय किंवा जगाच्या बाबतीत काय, जितकं जितकं आपल्याला कळत जाईल तितकं तितकं आपण खोट्या आनंदाकडून खऱ्या आनंदाकडं

जाऊ शकू.

म्हणजे आपल्या लक्षात येईल की, शोध आनंदाचाच असला तरी त्यातसुद्धा आनंदाचे तीन तरी प्रकार अगदी सहज दिसून येत आहेत. एक फसवा आहे, खोटा आहे, आनंदाचं मायावी रूप आहे, भ्रमाचा आहे. दुसरा आनंदच आहे, पण क्षणिक आहे, वरवरचा आहे, इंद्रियांपुरता आहे, न टिकणारा आहे आणि तिसरा आहे तो इंद्रियांपलीकडं आहे, शाश्वत आहे. परिस्थितीत किंवा कशातही काहीही बदल झाला तरीही न बिघडणारा, न संपणारा असा आहे.

या आनंद घेण्यातसुद्धा जी धडपड आहे जी कृती आहे - ती अगदी नाममात्र असो किंवा मोठी, उलाढालीची असो, तिचेही तीन तरी ढोबळ प्रकार दिसतात. काहींच्या बाबतीत असं आढळतं की, त्यांच्या कृती त्यांना आनंद देतात, पण इतरांना मात्र त्या दु:खी करतात, त्रासाच्या ठरतात. म्हणजे यात दुसऱ्यांना त्रास, पण त्यातून मला आनंद तर दुसऱ्या प्रकारातले लोक स्वत:ला त्रास घेतील, पण दुसऱ्यांना ते आनंदाचं करतील. या दोनही प्रकारातले लोक आपण आजूबाजूला पाहिले असतील.

उदाहरणार्थ, दुसऱ्यांचा पैसा, त्यांच्या वस्तू या हिसकावून, स्वत:साठी घेऊन आनंद मिळवणारे लोक दिसतील. त्यांना स्वत:ला असा पैसा मिळाला की, खूप आनंदित व्हायला होतं. अगदी चोरी करणारासुद्धा याच प्रकारानं आनंदित होत असतो. दुसऱ्याचं डबोलं आणखीन मोठं मिळालं की, याला आणखीन आनंद होतो. पण आपण हे सहज ओळखू शकू की, ज्याचा पैसा त्यानं चोरला किंवा हिसकावून घेतला त्याला मात्र चोराच्या या कृतीनं कितीतरी दु:ख निर्माण केलेलं आहे. अनेकांना तर एकदोन दिवस नव्हे, तर आयुष्यभरसुद्धा असलं दु:ख विसरता येत नाही. म्हणजे ही कृती चोराला किंवा अशा मार्गानं आनंद मिळवू पाहाणाऱ्याला सुखाची वाटली, तरी ती

दुसऱ्याला दु:खाची ठरत असते.

यात पैसा नि चोरी एकवेळ जाऊ द्या, पण इतर अनेक बाबतीत आनंद मिळवतानासुद्धा काही वेळा असं घडताना आपल्याला दिसेल. दुर्दैवानं एखाद्याला एखादं शारीरिक व्यंग असेल, काही उणीव-दोष असेल, परिस्थितीनं एखादी कमतरता असेल तर, त्याच्यावर बोट ठेवून, त्याचा विनाकारण विषय करून माणूस जेव्हा आनंद मिळवू पाहातो, तेव्हा तो त्या क्षणिक आनंदाच्या भ्रमात असला, तरी तो आनंद असा दुसऱ्याच्या दु:खाच्या पायावर उभा असतो, हे कसं विसरता येईल ? असले आनंद हे कितीही शक्य असले आणि घ्यावेसे वाटले तरी ते त्याज्यच मानावे लागतील, नाही का?

दुसरा प्रकार स्वत:कडं त्रास, दु:ख घेऊन दुसऱ्यांना आनंद देण्याचा आहे. यामध्ये माणसाची अधिक प्रगत अवस्था आहे. आत्ताच्याच चोराच्या नि पैशाच्या उदाहरणानं पाहायचं तर, स्वत: कष्ट करून मिळवलेला पैसा गरजवंताला देण्याचा तो आनंद आहे. आपला पैसा जाईल, त्यामुळं आपल्याला काही उणीव, त्रास भासेल हे खरं, पण दुसऱ्या गरजूच्या जीवनात त्यानं आनंद पसरेल, हेही तितकंच खरं आहे.

आपल्या मर्यादित कुटुंबात असो किंवा समाजाच्या, देशाच्या, जगाच्या मोठ्या कुटुंबात - वसुधैव कुटुंबकम् - मध्ये असो, आपल्या कृतीनं आनंद पसरवणारे आणि त्यायोगे आपण आनंदित होणारे लोक, हे या दुसऱ्या प्रकारच्या कृतींनी आनंद मिळवीत असतात. दुसऱ्यासाठी शरीरानं राबणारे, दु:खी, पीडित माणसांसाठी कष्ट करणारे - असे लोक हे आपल्या सामान्य लोकांसाठी आनंद मिळवण्याच्या विद्येतले मार्गदर्शन करणारे आदर्शच होत. अगदी साध्यासाध्या कौटुंबिक पातळीवरसुद्धा असा स्वत:कडं त्रास घेऊन दुसऱ्याला आनंद देणं कुणालाही शक्य आहे आणि समाजालासुद्धा

ते अतिशय गरजेचं आहे, सर्वांचं स्वास्थ्य, विकास यांसाठी ते आवश्यक आहे.

अर्थात याही पलीकडं जाणारा एक तिसरा कृतींचा प्रकार आहे, तोही आपण समजून घेऊ शकतो. तो म्हणजे स्वत:लाही आनंद आहे, त्रास नाही आणि दुसऱ्यालाही आनंद आहे, त्रास नाही. या अत्यंत श्रेष्ठ प्रकारातले लोक म्हणजे सत्पुरुष होत. त्यांना स्वत:ला कृतींचा त्रास नाही. म्हणजे ते काहीच करीत नाहीत असं नाही, पण ते त्रास घेऊन कृती करण्याच्या पलीकडं गेलेले असतात. किंबहुना त्यांची इतरांनाही आनंदित करणारी कृती अगदी सहजपणे घडते. ते स्वत: आनंदानं इतके भरलेले असतात की, तो आनंद सहजपणे ओसंडून वाहातो, इतरांना अत्यंत सहजपणे मिळतो. शिवाय यांचा स्वत:चाही आनंद कमी होत नाही.

आपलं पैशाचंच उदाहरण थोडंसं चालवायचं म्हटलं, तर त्या बाबतीत हे लोक, कुबेरासारखे किंवा त्याही पलीकडचे असतात, असं म्हणावं लागेल. म्हणजेच ते गरजूला देतील तर, त्यानं त्याची नड भागून त्याला आनंद होईलच, पण स्वत:चं कमी होऊन यांना त्रास होईल अशी दुसऱ्या प्रकारासारखी परिस्थिती या तिसऱ्या प्रकारात नसते. कितीही देऊनसुद्धा यांचं कधीच काही कमी होत नाही. शिवाय देणंसुद्धा अगदी सहज घडत असल्यानं देण्याच्या कृतीचासुद्धा त्रास अशांच्या बाबतीत संभवत नाही. विशाल सागरातलं पाणी जसं कितीही वाटलं, उपसलं तरी पुन्हा त्याची पातळी तशीच राहावी तशी ही अवस्था म्हणावी लागेल.

याचा अर्थ तिसऱ्या प्रकारातल्या लोकांच्याकडं कुठल्या वस्तू, पैसा, घरदारं भरपूर असतात, न संपणारी असतात असा नसून ते देण्यानं त्यांना त्रास होत नाही, कमी पडल्याचं दु:ख होत नाही, या मानसिक अवस्थेत ते वावरतात, असा आहे. लोकव्यवहारानं अशा तऱ्हेच्या देण्यानं त्यांना कधी

कमी पडत असेल, उणीवा निर्माण होत असतील पण त्यामुळं आपल्याला जसा त्रास व्हावा तसा त्यांना तो होत नाही, हे लक्षात घेणं गरजेचं आहे.

आनंदासाठी करण्याच्या तीन प्रकारच्या कृतींची जी गोष्ट आपण पाहिली, तीच गोष्ट आनंदाच्या तीन प्रकारांची आहे आणि ती आपल्याला आजच्या आजूबाजूच्या धावपळीच्या, बाजारू, अस्वास्थ्याच्या युगामध्ये फारच महत्त्वाची आहे, असं म्हणावंसं वाटतं. त्यात आपण पाहिल्याप्रमाणं पहिला आनंदाचा प्रकार फसवा आहे, दुसरा प्रकार क्षणिक, तात्पुरता आहे आणि तिसरा आनंदाचा प्रकार टिकाऊ आहे, शाश्वत आहे.

व्यसनात असलेल्या माणसाला त्यावेळी असं वाटतं की, मी किती आनंदात आहे. सारं जग, सारी माणसं त्याला नगण्य, तुच्छ वाटतात. परिस्थितीतले सारे तणाव - दु:ख - विवंचना यांचा त्याला विसर पडतो - त्याला वाटतं, आपण किती आनंदात आहोत. पण त्यातून बाहेर आल्यावर त्याच्याही लक्षात येतं की, त्याच्या तणावातलं, दु:खातलं काहीच कमी झालेलं नाही, उलट त्याच्या असल्या उधळपट्टीनं त्या दु:खात भरच पडलेली आहे. त्यामुळं असला आनंद तर खोटा आणि भ्रमाचा आहेच, पण जर एखादा माणूस एखादं व्यसन प्रतिष्ठेचं मानलं जातं म्हणून करीत असेल आणि त्यातून आनंद मिळवत असेल तरीही ती प्रतिष्ठासुद्धा वरवरची, तकलादू असून भ्रमाची आणि खोटीच आहे, यात शंका नाही. त्यामुळं असल्या भ्रामक आनंदाकडं पाठ फिरवणं आपल्याला हिताचं ठरेल.

आनंदाचा दुसरा प्रकार मात्र बराच आढळणारा आहे, प्रचलित आहे. जो खाण्यापिण्यातला आहे, कपडेलत्ते, पैसापाणी, मौजमजा यांतला आहे. याची व्याप्ती फार मोठी आहे. किंबहुना बरचंसं जग याच्याच मागं आहे. आपल्या देहाला-इंद्रियांना सुखाचं झालं की, झालं अशी समजूत याच्यामागं आहे.

खाण्याचीच गोष्ट घ्या. पदार्थ त्याज्य नाही, निषिद्ध नाही, तो चांगला आहे, हे खरंच आहे. पण तो मी खाल्ल्यानं मला होणाऱ्या आनंदावर माझी मदार आहे, भिस्त आहे आणि व्यवहारानं पाहिलं तर, त्याचा अनुभव तसा येतोसुद्धा. एखादा चांगला पदार्थ आहे, खाल्ल्यावर आनंद होतो, मनुष्य तृप्त होतो हेही खरंच आहे. पण यात विचार करण्यासारखं आहे, ते पुढं आहे.

अशा तऱ्हेनं एखादा तृप्त झालेला मनुष्य खरं म्हणजे तसाच तृप्त आणि आनंदी राहायला हवा होता. पण अनुभव तसा नाही. तसाच पुढं आनंद टिकण्याचं तर सोडाच, पण काही ताससुद्धा हा आनंद टिकत नाही. पुन्हा पोट रिकामं आहे, भूक सतावू लागते आहे. म्हणजे हा आनंद, आनंद वाटतो खरा, पण तो टिकाऊ नाही, शाश्वत नाही. दुसऱ्या बाजूनंही त्याला मर्यादा आहे.

समजा हेच खाण्याचं उदाहरण घ्या. खाण्यानं आनंद होतो आहे, ठीक आहे. खावं, पण आनंद होतो आहे, तो जास्तीत जास्त व्हावा, म्हणून खातच राहिलं, तर आनंदही सतत टिकून राहिला पाहिजे आणि खाण्याबरोबर वाढत गेला पाहिजे, तर तसं होत नाही. कारण आपल्या खाण्याला मर्यादा आहेत.

पण याऐवजी क्षणभर असा विचार करू की, आपल्याला जसा खाण्यानं आनंद आहे, तसाच तो इतरांनाही आहे. म्हणून आपण तोच पदार्थ त्यांना खायला घालून आनंद द्यायचा आणि त्याचा आनंद आपण घ्यायचा, असं ठरवलं आहे. तर आता मात्र पाहा की, माझ्या खाण्याला माझ्या एका पोटाची मर्यादा होती, त्यामुळंच माझ्या आनंदालाही तीच मर्यादा होती. पण आता दुसऱ्याला द्यायचं आहे. द्यायला कितीतरी माणसं आहेत ! प्रत्येक माणसागणिक आनंद आहे. माणसांना मर्यादा नाही तशी ती

आपल्याला मिळणाऱ्या आनंदालाही नाही. आपण देत राहावं, अख्खं जग घेत राहील. आधी स्वत:साठी आनंद मिळवण्यानं आपलाच आनंद मर्यादित, न टिकणारा, अशाश्वत झाला होता, आता तोच आनंद दुसऱ्यांसाठी द्यायचा ठरवल्यावर अमर्याद, टिकणारा आणि शाश्वत झाला !

हे तर साध्या खाण्यापिण्याचं झालं. त्यात जर साधा दुसऱ्याचा विचार आला आणि या आनंदाकडं जाता आलं, तर या तिसऱ्या शाश्वत टिकणाऱ्या आनंदाच्या प्रकाराची ओळख होईल. यामुळं या न टिकणाऱ्या गोष्टींच्या, त्यापासून मिळणाऱ्या आणि न टिकणाऱ्या आनंदाच्या पलीकडं जायचा काही विचार आपण करू शकू.

खाण्यापिण्याइतकाच आनंद माणसाला कपडेलत्ते, घरदार अशा गोष्टींनी मिळतो, हे तर आपण सर्वजण ओळखतोच. पण जेव्हा कधी या गोष्टी माणसाला मिळतात, त्यावेळी हे कळतं की, हा आनंद शाश्वत नाही, टिकणारा नाही. कारण अगदी मनासारखा कपडा मिळाला तरी तो झिजतो, फाटतो - मनासारखं म्हणून बांधलेलं घरही कधी गळतं, मोडतं, पडतं, गैरसोयीचं ठरतं !

या गोष्टी तर जरा वरवर दिसणाऱ्या आहेत. पण ज्या गोष्टी थोड्याशा न दिसणाऱ्या आहेत, तरी पण आपल्याला आनंद देतील असं वाटतं, म्हणून ज्यांच्यासाठी आपण अविरत धडपडतो आहोत, अशा कितीतरी सूक्ष्म गोष्टी अजून आहेत. उदाहरणार्थ, पैसा आहे, सत्ता आहे, मान आहे. हे मिळाल्यावर लक्षात येतं की, यालाही परत मर्यादा आहेत. पैसा संपतो, सगळ्या गोष्टी तो देऊ शकत नाही. सत्ता मर्यादित आहे, जरा दुसऱ्या ठिकाणी गेलं की, कुणी आपल्याला विचारत नाही, साधं ओळखत नाही, मान तर दूरच.

मग माणसाचा खऱ्या किंवा टिकणाऱ्या आनंदाचा शोध सुरू होतो. त्यावेळी त्याच्या एक गोष्ट प्रथमच लक्षात येते की, या साऱ्या दुसऱ्या

प्रकारातला आनंद हा कशावर तरी अवलंबून होता, म्हणून ते कारण संपलं की, तो गेला. मग जर तो टिकायचा असेल, तर एकतर तो अशा कारणांवर अवलंबून असला पाहिजे की, जे कधीच संपणार नाही, शाश्वत असेल किंवा जर हा आनंद अखंड टिकायचाच असेल तर तो कशावर अवलंबूनच नसला पाहिजे. माणसाला या तिसऱ्या प्रकारातल्या शाश्वत आनंदाची एकदा ओळख झाली की, झाली ! कारण या दोनही प्रकारांनी हा शाश्वत आनंद मिळवणारे लोक त्याला दिसतील.

पहिले आहेत ते भगवंतासारख्या अविनाशी, शाश्वत तत्त्वाला अर्पण राहून तो भगवंत शाश्वत असल्यानं त्याच्यापासून मिळणारा यांचा आनंदही शाश्वत टिकवणारे आहेत. दुसऱ्या प्रकारातले लोक हे आपला आनंद कुठल्याच बाह्य वस्तूवर, क्रियेवर अवलंबून न ठेवणारे लोक. असे लोक मोठे कर्मयोगी, ज्ञानयोगी दिसतील. ते जगाच्या कल्याणासाठी अपरंपार कार्य करतील, पण त्यांचा आनंद त्या कर्मावर, त्याच्या फळावर अवलंबून न ठेवणारे ते असतात. त्यामुळं वस्तू काय, कर्म काय - टिकलं तरी ते आनंदात असतात आणि कालौघामध्ये ते गेलं, बदललं, न टिकलं - तरी ते आनंदातच असतात.

अशा तऱ्हेनं आपल्या साऱ्या धडपडीमागं आनंदाचा शोध हेच खरं, मूळ सूत्र आहे, हे मात्र खरंच आहे. पण हाच विषय जरा अधिक समजून घेतला, तर हा आनंदाचा उद्देश नुसता आनंदाचा उद्देश न राहता खरा, शाश्वत आनंदाचा अनुभव ठरेल. ज्यामुळं आपलंही सार्थक घडेल आणि ज्यात जगतो त्या समाजाचंही सार्थक घडेल, कल्याण साधेल !

* * *

लहानथोर कोणताही माणूस असो आणि त्याचं जीवन कोणत्याही प्रकारचं असो, त्याच्या मागचं सूत्र एकच असतं आणि ते म्हणजे 'आनंद'. कुठल्या ना कुठल्या रूपात तो त्या आनंदाचाच शोध घेत असतो, हे थोडासा विचार केला तर, आपल्या लक्षात येऊ शकेल. अर्थात वरवर पाहिलं तर, आपण अनेक गोष्टी आयुष्यभर करत आलेले असतो. त्या करण्यामागचे त्या-त्या वेळचे आपले हेतूसुद्धा वेगवेगळे असतात असं दिसेल. पण त्याही हेतूच्या एक पायरी खाली गेलं की, लगेचच त्या हेतूच्याही मागं खरा हेतू आनंदाच्या शोधाचा, आनंदाच्या प्राप्तीचाच होता, असं लक्षात येईल.

म्हणजे एक दोन उदाहरणांनीच बघायचं झालं, तर आपलं स्वत:चं घर असावं, म्हणून माणूस खूप कष्ट करतो, पैसे साठवतो, काटकसर करतो, कर्ज काढतो, प्रत्यक्ष ते उभं होताना होणारे हाल पत्करतो. याचा हेतू त्याला विचारला तर तो 'स्वत:चं घर व्हावं' हा आहे, असंच सांगेल. पण एक पायरी पुढं जाऊन विचारलं की, स्वत:चं घर तरी कशासाठी हवं ? तर मात्र मग थोड्याशा विचारान्ती तो सांगेल की,ते मला 'आनंदासाठी'च हवं आहे.

कारण समजा, जर एखाद्या माणसानं घर बांधलं, अगदी स्वत:चं आहे, पण तिथं राहाण्यानं काही गैरसोयी होतात म्हणून म्हणा किंवा असुरक्षितता वाटते म्हणून म्हणा - त्याला स्वत:च्या घरात राहण्याचा अनुभव दु:खाचा झाला, तर तो ते घर सोडून गावातल्या किंवा दुसऱ्या सोयीच्या जागी - अगदी भाड्याच्या घरातसुद्धा जायला तयार होतो. याचाच अर्थ असा की, त्याचा मूळ उद्देश हा वरवर पाहाता 'स्वत:चं घर' हा वाटला तरी, खरा किंवा मूळ हेतू हा 'आनंद' हाच होता आणि असतोही.

तीच गोष्ट त्याच्या नोकरीची, पैसा मिळवण्याची, शेती करण्याची, लग्नकार्य करण्याचीही असते. वरवर पाहाता या गोष्टींमागचे हेतू वेगवेगळे

आणि स्पष्ट वाटले तरी, खरा आणि मूळ हेतू 'आनंदाची ओढ - प्राप्ती' असाच असतो, असं लक्षात येईल.

हा मूळ आनंदाचा उद्देश साध्य करण्यासाठी अनेक मार्ग माणूस अमलात आणतो, असं आपल्याला आढळून येतं. त्यापैकी आनंदाचा शोध घेण्याचा एक महत्त्वाचा मार्ग माणसाकडं आहे. तो त्याला अगदी जवळचा आहे, थोडा विचारपूर्वक अंमलात आणला तर सोपाही आहे. अशा या एका मार्गाचा विचार आता आपण करूया.

आपण जर आपल्या रोजच्या दिनक्रमाकडं बघितलं, इतरांच्याही दिनक्रमाकडं बघितलं, तर एक अत्यंत ठळक गोष्ट आपल्या लक्षात येईल, ती अशी की, परिस्थितीनुसार प्रत्येकाच्या दिनक्रमात खूपच वैविध्य आहे - वय, आर्थिक परिस्थिती, राहणीमान, नोकरीधंद्याचा प्रकार, भौगोलिक भेद, नैसर्गिक वैविध्य, प्रत्येकाचं प्रकृतीमान, गरजांचं स्वरूप, त्याची शैक्षणिक-विकासात्मक प्रगत - अप्रगत अवस्था - एक ना दोन. नाना प्रकारांमुळं प्रत्येकाचा दिनक्रम जरी मूलत: आनंदाच्या प्राप्तीसाठीच चाललेला असला, तरी त्यात अक्षरश: अगणित प्रकारचं वैविध्य आहे.

फक्त या साऱ्या वैविध्यात एकच गोष्ट समान आहे - ती म्हणजे कुठलाही माणूस अखंड क्रियाशील आहे. इतर साऱ्या वैशिष्ट्यांप्रमाणं माणसा - माणसांत कितीतरी विविधता असेल. एखाद्याला जी गोष्ट आयुष्यभर करावी लागेल, ती दुसऱ्याला सबंध आयुष्यात एकदाही करावी लागणार नाही - मग ती शेती असो, कारखान्यातलं काम असो, हमाली असो, युद्ध असो, संशोधन असो - हे सारं असं असलं तरी 'क्रिया किंवा कर्म' याला मात्र कुणालाच पर्याय नाही, असं दिसेल. म्हणून सर्वजण बाकी कितीही दृष्टींनी कितीही वेगवेगळे ठरोत - ते दोन बाबतीत अगदी समसमान पातळीवर आहेत. त्या म्हणजे एक - ते साऱ्यातून आनंदाचाच शोध घेत आहेत आणि

दुसरं म्हणजे हा शोध ते त्यांच्या त्यांच्या क्रियांतून - कर्मांतून घेत आहेत.

यावरून आता आपल्या एक लक्षात येऊ शकेल की, ही कर्मं जर सर्वांना समान असतील, रोजची असतील तर त्या सर्व कर्मांना लागू पडेल असा आनंदाकडं नेणारा प्रकार हा - जर आपल्याला शोधता आला तर - आनंद मिळवण्यासाठीचा सर्वांनाच समान प्रकार - समान मार्ग राहू शकेल. आपण कुठल्याही परिस्थितीत असू, तरी तो आपण अंमलात आणू शकू आणि रोज आनंद मिळवण्याचा आणखी एक मार्ग आपल्याला गवसेल.

हा मार्ग शोधण्यासाठी आपल्याला थोडं आपल्याच कृतींकडं पाहावं लागेल. आज आपण उजाडल्यापासून मावळेपर्यंत ज्या कृती करतो त्यांतल्या अगदी प्रतिक्षिप्त क्रियेसारख्या - उठणं, तोंड धुणं, आंघोळ, जेवणंखाणं - अशा गोष्टी सोडल्या तरी त्यापेक्षा वेगळ्या, महत्त्वाच्या आणि आनंदाला पोषक आणि मारक ठरणाऱ्या अनेक कृती, अनेक कर्मं आपण करीत असतो. मग त्यात एखाद्या उद्योगधंद्याची निवड असो, त्यातल्या कार्यपद्धतीची निवड असो, सामाजिक कार्य असो, एखादा व्यासंग असो, एखादं विरंगुळ्याचं साधन असो, वाईट व्यसन असो - या प्रत्येक बाबतीत आपण निर्णय करतो, निवड करतो, त्यानुसार कृती होत राहतात, परिणामही घडत राहातात. यात विशेष नाही. थोडा विचार केला की, हे लक्षात येऊ शकतं.

पण यात विशेष आहे ते वेगळंच आहे. ते असं की, कळत असो, नकळत असो माणूस जर आनंदासाठी साऱ्या कृती करतो आहे, तर माणसाला परिणामी सतत आनंद अनुभवायला का मिळत नाही ? इतक्या मोठ्या प्रमाणात - इतक्या असंख्य प्रकारच्या कृती करीत असूनही 'सुख पाहाता जवापाडे, दुःख पर्वताएवढे' असा सर्वसाधारण अनुभव का येतो ? हे विशेष आहे आणि हे विचार करायला लावणारं आहे.

याचाच पहिला अर्थ सरळ आहे की, आनंदाकडं जायला ज्या

पद्धतीनं कृती करायला पाहिजेत त्या पद्धतीनं, तशा त्या आपण करीत नसलो पाहिजे ! आनंदात पर्यवसान होणाऱ्या कृतींचंही काही शास्त्र नक्कीच असलं पाहिजे. कारण अशी माणसंही अनेक होऊन गेली किंवा आजही आहेत की, त्यांनी असं क्रियाशील आयुष्य आनंदानं घालवलं आहे. आयुष्याच्या अखेरीसही अत्यंत समाधानानं, कृतार्थतेनं, आनंदानं जगाचा निरोप घेतला आहे. स्वत:च्या आयुष्यात तर आनंदच आहे, पण संपर्कातल्या कित्येक माणसांच्या आयुष्यातही अशी माणसं आणि त्यांच्या कृती आनंद पसरवून गेल्या आहेत. क्षणभर जगाचं सोडलं, तर स्वत:च्या आयुष्यात हा आनंद मिळवणाऱ्यांच्या कृतींचं वेगळेपण असं काय होतं, हे समजून घेणं मोठं उद्‌बोधक ठरेल. कोणतंही कर्म म्हटलं की, कर्म करणारा, त्याचा हेतू, दृष्टिकोन, प्रत्यक्ष कृती आणि त्याचे परिणाम - अशा गोष्टी सहज दिसतील. या प्रत्येक बाबतीत आपल्या आणि अशा आनंदयात्रींच्या ठिकाणी फरक असल्याचं आपल्याला दिसेल.

आपण आपल्या कृतींच्याकडं पाहिलं तर लक्षात येईल की, आपल्या कृतींचं केंद्रच मुळात 'मी आणि माझं सुख' हे असतं. ते तसं असायलाही हरकत नाही. कारण आपला आनंदाचा, सुखाचाच सारा प्रयत्न आहे. पण ते केंद्र जाणतं ते 'मी' म्हणजे 'मीपणा'ला सुखावणारं कृत्यं ! मग भले ते कसलंही कृत्य असेना का ! त्यामुळं प्रत्यक्षात अशा कृती आनंदाच्या ठरण्याऐवजी पुढं दु:खाच्या ठरतात. याउलट थोरांच्या कृती किंवा खऱ्या, योग्य कृती याही सुखासाठी - आनंदासाठीच घडतात. पण त्यांचं केंद्र 'मी किंवा मीपणा' हे नसतं आणि 'स्वत:च्या देहाला सुखावणं' हेही नसतं. त्यांचं केंद्र 'कर्तव्य' हे असतं. 'मी जे करणं योग्य आहे, आवश्यक आहे, अपरिहार्य आहे ते करणं' हे त्यांचं केंद्र असतं. त्यामुळं त्यावेळी वरवर पाहाता ते कदाचित 'मीपणा'ला

सुखावणारं नसेल, ती कृती कदाचित मला थोडीफार देहाच्या दृष्टीनं त्रासाची असेल, कष्टप्रद असेल, देहसुखाला उणीव आणणारी असेल, पण ती परिणामी सुखाची, आनंदाची ठरते.

आपल्या कृतींतलं दुसरं एक वैशिष्ट्य आपल्याला सहजपणे लक्षात येईल. आपण फारच वरवरचा आणि तात्कालिक फायदा लक्षात घेऊन कृती करतो. उदाहरणार्थ, एखादा निर्णय घ्यायचा आहे किंवा एखाद्याला सल्ला देण्याचं आपलं काम आहे - अशा वेळी लगेच त्यामुळं फायदा होईल ना, एवढंच पाहाणं, दुसऱ्याला सल्ला देताना त्याला बरा वाटेल असा देऊन त्याच्याशी वाद टाळू पाहाणं, त्यालाही तात्पुरता आनंद देईल असा निर्णय देणं - यात जरी तात्कालिक आणि वरवरचा आनंद मिळाला तरी त्यातून अखेर ना त्याचं भलं होतं, ना त्याला आनंद लाभतो, ना आपल्याला.

पण हेच जर आपण आपल्या खऱ्या कर्तव्याचं भान ठेवून कृती केली तर - जरी तात्पुरता आपल्याला कुणाचा रोष पत्करावा लागला, तात्कालिक संबंधात, सुखात उणीव आल्यासारखी वाटली - तरी अंतिमतः ते आपल्याही आनंदाचं ठरतं आणि ज्याच्याबद्दल आपण हे करतो त्यालाही ते आनंदाचं ठरतं. लहानपणी मुलाला काय वाटेल, म्हणून त्याच्या चोरी करण्याकडं दुर्लक्षित करणाऱ्या आईचाही - चोऱ्यांची सवय लागून अट्टल गुन्हेगार म्हणून फाशीवर जायची वेळ आल्यावर - त्याच मुलानं कान चावला होता. कारण वेळीच तिनं करायचं कर्तव्य केलं असतं, तर त्यावेळी थोडा त्रास वाटलाही असता, पण आज त्यानंच तो आणि त्याची आई दोघंही खऱ्या, टिकाऊ आनंदात राहू शकले असते, हे मोठं शिकण्यासारखं आहे.

आपल्या कृती आनंद पर्यवसायी का होत नाहीत, याचंच याला जोडून असलेलं कारण म्हणजे छोटेमोठे लोभ ! त्यांना बळी पडून माणूस जी कृती करतो ती त्याला सुखाची होईल असं वाटतं. सुरुवातीला ती तशी

कदाचित होतेही, पण ती पुढं मात्र फार दुःखात लोटते - हा इतिहास आहे. आज मोठमोठ्या आर्थिक गुन्हेगाऱ्या ज्यासाठी होतात, त्या पैशाच्या नि त्यापासून मिळू शकणाऱ्या सुखसोयींच्या मोहापोटी आपण पाहातो, देशाची रहस्यंसुद्धा माणूस विकायला तयार होतो - हे चार पैसे घेताना कदाचित सुखाचं वाटतं, पण पुढं वाढून ठेवलेलं दुःख पाहिलं, म्हणजे कळतं की, कृतीत काय काय चुकलं !

हेच जर थोरांच्या ठिकाणी पाहिलं तर फरक कळतो की, त्यांची कृती करतानाची मनाची ठेवण, ओढ मोहाकडं झुकली, व्यक्तिगत स्वार्थाकडं झुकली तरी, ते ती लगेच दुरुस्त करून योग्य कर्तव्याकडं वळवतात आणि परिणामी, आनंद निर्माण होतो. आपल्या कृती मोहाकडं वळतात, म्हणून दुःखद ठरतात. त्यांच्या कृती मात्र त्यागाकडं वळतात,कर्तव्यांकडं वळतात, म्हणून सुखद ठरतात.

सहज जाताजाता महात्मा गांधींच्या जीवनातला एक छोटासा प्रसंग पाहाण्यासारखा आहे. ती घटना त्यांच्या सहवासात राहिलेल्या त्यांच्या नातीच्या - मनुबेनच्या - संदर्भातली आहे. बापूजींच्या बरोबर ती एकदा पाटण्याला गेली होती. तेव्हा ते सर्वजण बापूजींचे स्नेही डॉ. महमूद यांच्या बंगल्यावर उतरले होते. त्यावेळी बिहारमध्ये हिंदू-मुस्लिमांमध्ये मोठा हिंसाचार उसळला होता आणि त्याला आळा घालण्यासाठी, विधायक विचार रुजवण्यासाठी गांधीजींचा दौरा होता. ज्या डॉ. महमूद यांच्या घरी गांधीजी उतरले होते, त्यांच्या मुलाचं लग्न त्याच काळात त्यांच्या घरी पार पडलं.

लग्नाला उभं राहाण्यापूर्वी मुलगा गांधीजींना नमस्कार करायला आला. गांधीजींनी आशीर्वाद दिला. जवळचं नातं असल्यानं मनुबेननं बहिणीच्या नात्यानं त्याला मंगलतिलक लावला. त्यानंही भावाच्या नात्यानं

तिला एक सोन्याच्या दागिन्यांचा सेट भेट दिला. ती भेट तशी लहानसहान नव्हती. ते दागिने सुमारे तीस तोळ्यांचे होते. तिनंही अशी भेट स्वीकारायला नकार दिला आणि गांधीजींकडं पाहिलं. त्या मुलानंही प्रेमानं, आग्रहानं आणि भावाच्या नात्यानं ते देत असल्याचं सांगितलं. गांधीजींनी नातीला सांगितलं, 'जर असं आहे तर तू ते घेतलं पाहिजेस.' गांधीजींच्या शब्दाप्रमाणं तिनं ती भेट स्वीकारली. आता तर दोनही गोष्टी होत्या. बायकांना मुळात दागिन्यांची सहज आवड, त्यात सोन्याचा तीस तोळ्यांचा दागिन्यांचा सेट चालून आलेला, प्रेमानं आलेला आणि दुसरं म्हणजे घ्यायला गांधीजींची परवानगी मिळालेली. म्हणजे आता तो वापरायला, स्वत:च्या सुखासाठी घालायला कुठलीच अडचण नव्हती.

पण तिची कृती काही वेगळीच झाली. इतर कुठली सामान्य मुलगी त्या दागिन्यांच्या मोहात पडली असती. तिला त्याचं क्षणिक सुखही झालं असतं. पण कर्तव्याच्या कृती या काही वेगळे आणि शाश्वत आनंद निर्माण करतात, हे खरं! दहाच मिनिटांनी ती नात-मनुबेन-तो दागिन्यांचा सेट घेऊन गांधीजींच्याकडं आली आणि म्हणाली, 'ज्या कर्तव्यपालनासाठी आपण इथं आलो, त्या कामासाठी मी हे दागिने देऊ इच्छिते. ते दागिने विकून ती रक्कम आपण आत्ताच्या या मदतकार्यासाठी वापरावी असं मला वाटतं !'

गांधीजी प्रसन्न झाले. ते म्हणाले, 'ठीक आहे. मला आनंद झाला तो या कामाला पैसा मिळाला म्हणून नाही. मी परीक्षा पाहात होतो की, तुझं मन कुठं झुकतं आणि तुझी कृती काय होते. तू या कठीण परीक्षेत उत्तम पास झालीस. तू योग्य कृती निवडू शकलीस, करू शकलीस - याचा मला आनंद झाला.'

कोणत्या प्रकारची कृती आपल्याला अधिक टिकाऊ, विधायक आनंदाकडं नेऊ शकते, हे खरोखर समजून घेण्यासारखं आहे. आपल्या

कृती या अनेकदा प्रतिक्रियात्मक असतात. दुसरा अमुक एक वागला म्हणून मी अमुक एक वागलो - असं त्याचं स्वरूप असतं आणि अशा चुकीच्या कृतींचं ते एक प्रकारचं समर्थन असतं. पण त्यावेळी आपल्या लक्षात हे येत नाही की, त्यांची चुकीची कृती त्यांच्या आयुष्यात दु:ख निर्माण करायला कारण ठरते तशी, भले त्यांच्यामुळं का असेना, आपण केलेली चुकीची कृती आपल्याही आयुष्यात दु:ख निर्माण करायला कारण ठरणार असते. अशा वेळी शांतपणानं विचार करून आपली कृती आपण स्वतंत्र, विधायक ठेवू शकलो तर ती आपली कृती दु:खाऐवजी आपल्याला आनंदाकडं नेते आणि इतरांनाही आनंदाकडं नेते.

गांधीजींच्याच आयुष्यातल्या आणखी एका छोट्याशा पण उद्‌बोधक प्रसंगाची आठवण होते. १९४७ मध्ये ते रेल्वेनं काश्मीरमधला तणाव कमी करण्यासाठी अमृतसरमार्गे काश्मीरला निघाले होते. त्यांची ही कृती त्यांच्या कर्तव्यभावनेतून आलेली होती, ती रास्त होती आणि त्यावर ते ठामही होते.

पण काही अविचारी लोकांना ते पसंत नसल्यानं गांधीजींना अडवावं, भडकवावं, वेळी परत जायला लावावं - अशा उद्देशानं अमृतसर स्टेशनवर त्यांची गाडी येण्यापूर्वीच दोनेकशे माणसांचा जमावकाळे झेंडे घेऊन, प्रक्षुब्ध होऊन जमा झाला होता. गांधीजींच्या निषेधाच्या नि परतीच्या घोषणा इतक्या भयानक आवाजात सुरू होत्या की, त्यांची प्रतिक्रिया म्हणून भडकणं, परत फिरणं, पोलिसांच्या मदतीनं या साऱ्या आंदोलकांना अटकेत टाकणं - यातली कुठलीही कृती गांधीजींना शक्य होती.

पण त्यांचा शांतिकार्यावर, स्वत:च्या कर्तव्यभावनेतून ठरवलेल्या कृतीवर ठाम विश्वास होता.कोणत्याही विकारांच्या आहारी जाऊन

प्रतिक्रियात्मक विघातक कृती करण्यावर अजिबात विश्वास नव्हता. परिणामी, गाडीनं स्टेशन सोडेपर्यंत ते शांत, अविचल राहिले. आश्चर्य म्हणजे, चारपाच दिवसांनी परतीच्या मार्गावर याच स्टेशनवर हाच सारा जमाव त्यांची क्षमा मागण्यासाठी तिष्ठत उभा होता. जमावानं त्यांची क्षमा तर मागितलीच, पण गांधीजींच्या शांतिकार्यासाठी उत्स्फूर्तपणे वर्गणी गोळा करून त्यांनी देणगीही दिली. योग्य कृतीनं माणूस आनंदाकडं कशी वाटचाल करू शकतो, हे अगदी शिकण्यासारखं आहे. अशा वेळी तात्कालिक राग-लोभाची, क्षुल्लक लाभाची, मोहाची पर्वा न करणं उपयोगी ठरतं, हे लक्षात घेण्यासारखं आहे.

कर्मं तर आपल्याला टळली नाहीत. कारण विनोबा म्हणत तसं, कर्म टाळणं, कर्म सोडणं हेसुद्धा एक कर्मच आहे. शिवाय ते टाळण्याची, सोडण्याची कोणतीही गरज नाही. मग त्याच कर्माचं कर्तव्यात रूपांतर करून आपण आनंदाची वाटचाल का करू नये ? म्हणूनच गीतेनं हा क्रम कसा चढता होईल आणि आहे त्याच जागी, आहे तीच कर्मं, पण निवड बदलून, त्यामागची करण्याची भूमिका बदलून, कर्माच्या परिणामांतून मुक्त राहून सारीच कर्मं आनंदाची कशी ठरतील, याचा मार्ग मोकळा करून सांगितला आहे.

गीतेनं या साऱ्या कर्मांचं संशोधन इतकं खोल केलं की, कर्तव्याचा परिणाम म्हणून आनंद असं त्याचं स्वरूप न राहाता 'कर्तव्य करतानाच आनंद' असं त्याचं स्वरूप झाल्यानं, कर्म करतानाच आनंद निर्माण होण्याची आणि तो तसा टिकण्याची कर्मयोगाची मोठीच विद्या हाती आली आहे. कर्म करतानाच्या भूमिकेत गीतेनं स्वधर्माचं आचरण, कर्मात आपलं मन ओतणं, निर्मोहीपणे कर्म करणं, निरपेक्षता, साक्षीभाव, समत्व राखून कर्म करणं - असे अनेक निकषही उपलब्ध करून दिले. ते पाळून आपण कर्मं करायची ठरवली तर तीच अटळ, नित्याची, कटकटीची

वाटणारी कर्मं - कर्तव्यरूप होतील, आनंदाची ठरतील. उलट अविचल बुद्धीनं कर्तव्य म्हणून कर्मं करताना त्याचा परिणाम म्हणून होणारं नफा-नुकसानसुद्धा आपला आनंद बिघडवू शकत नाही. इथंपर्यंत हा आनंदाचा प्रवास पोचावा. ही तत्त्वं आणि हा कर्तव्याचा, आनंदाचा मार्ग आचरून दाखवणारे अनेक कर्मयोगीही आपल्याला आढळतील.

वारकरी संप्रदायाचे अध्वर्यू, पौर्वात्यपाश्चिमात्य तत्त्वज्ञानाचे साक्षेपी विद्वान आणि तितकेच परमविठ्ठलभक्त गुरुवर्य सोनोपंत दांडेकर यांच्या आयुष्यातली एक घटना मोठी लक्षणीय आहे. ते ज्या शिक्षण प्रसारक मंडळीत ध्येयवादानं आयुष्यभर राबले, तिनं त्यांच्यावर कॉलेजच्या उपप्राचार्य आणि पुढं प्राचार्यपदाची जबाबदारी टाकली. व्यक्तिशः अत्यंत ऋजू, कुणाला न दुखवणाऱ्या मामासाहेबांनी या कर्तव्याच्या, जबाबदारीच्या पदावरचं काम करताना मात्र संस्थेच्या नियमांचं पालन करण्यात आणि इतरांना कामकाजाचा भाग म्हणून ते पालन करायला लावण्यात कधी कुचराई केली नाही की, येणाऱ्या भल्याबुऱ्या परिणामांची तमा बाळगली नाही. त्यामुळं कर्तव्यदक्षतेचा त्यांचा आनंद कर्मांतच निर्माण झाला आणि परिणाम कसेही घडोत, तोच आनंद पुढं टिकूनही राहिला.

नियमांचं पालन करताना विद्यार्थ्यांनासुद्धा ते अगदी त्याची परिस्थिती लक्षात घेऊन शेवटच्या मर्यादेपर्यंत मदत करीत. पण संस्थेच्या हिताचा आणि लौकिकाचा, प्रतिष्ठेचा प्रश्न आला तर प्रसंगी कठोरपणे आपलं कर्तव्य पार पाडायलाही ते चुकत नसत. एका गरजू विद्यार्थ्याला स्वतःच्या अधिकारात त्यांनी फी भरण्याची सवलत दिली. फॉर्म फीसुद्धा न भरता परीक्षेपर्यंत फी भरण्याच्या वायद्यावर फॉर्म भरू दिला. त्यातूनही त्यानं फी भरली नाही. शेवटची संधी म्हणून मामांनी त्याला शेवटच्या पेपरपर्यंतसुद्धा

फी भरण्याची अपवादभूत सवलत त्यांनी दिली. आता मात्र त्यांनी सवलत दिली असती, तर होणाऱ्या संस्थेच्या आणि कर्तव्यातल्या नुकसानीला ते जबाबदार राहिले असते. शिवाय या कामात तो आणि त्याचे पालक अक्षम्य कुचराई करीत आहेत, हे लक्षात आल्यावर मात्र शेवटच्या पेपरला त्याला परीक्षेला बसण्याची परवानगी त्यांनी कठोरपणे नाकारली. त्यामुळं वर्ष वाया जाऊन त्याचा त्या मुलाच्या मनावर परिणाम झाला.

कित्येक वर्षांनी त्याचे वडील भेटले. तेव्हा ती खंत, तो राग ते बोलले. त्यांना ही कल्पनाही नव्हती की, हा निर्णय घेणाऱ्या मामांनाच आपण ही घटना सांगतो आहोत. पण हे ऐकूनही मामा अविचल होते. इतकंच नव्हे, तर कर्तव्यबुद्धीनं काम केल्यानं त्या कृतीनं त्यांच्या मनात कुठलीही शंका ठेवलेली नव्हती. त्यामुळं आपण होऊनच, तो निर्णय घेणारी व्यक्ती मीच, असं सांगण्याचं धाडसही ते दाखवू शकले. कर्तव्यबुद्धीनं काम करणाऱ्याला आनंदाच्या किल्लेकोटाची जणू चावीच हाती लागते. परिणामनिरपेक्ष आनंद आपल्या कृतीतूनच ते घेऊ शकतात. असा आनंद कृतींतून मिळत असल्यामुळं, कर्तव्यांतून मिळत असल्यामुळं तो रोज मिळू शकतो. हा आनंदाचा मार्ग प्रत्येक कर्तव्य करणाऱ्याला, म्हणजे त्या अर्थानं कुणालाही मिळू शकतो, हे आपल्या लक्षात येईलच.

कृती केल्याशिवाय तर आपलं चालणार नाहीच आहे. आपण सुरुवातीला पाहिल्याप्रमाणं प्रत्येकाला त्याच्यात्याच्या पातळीवर कृती आहेतच फक्त त्यांचं रूपांतर कर्तव्यात करताना ज्या काळजी घ्यायच्या त्या घेतल्या आणि आनंद मिळवण्याचा हा एक मार्ग आहे, या विचारानं, दृष्टीनं त्याकडं पाहिलं, तर हा आनंद रोज मिळेल, हे खचितच !

* * *

लहान मुलांचे किंवा शाळकरी मुलांचे सर्वत्र समान असणारे काही प्रश्न आहेत. त्याची उत्तरं शोधायचा आपापल्या परीनं अनेकांनी प्रयत्न केला असला, तरी बरोबर उत्तरं मात्र अगदी दुर्मीळ आहेत. अशा काही प्रश्नांतला एक सर्वसामान्य प्रश्न म्हणजे 'अभ्यास आवडत नाही' हा आहे. त्याचीच दुसरी बाजू म्हणून 'खेळायला मात्र आवडतं' हेही आहे. पण त्यापेक्षाही सर्वसाधारणपणे - अभ्यास आवडत नाही - हे अधिक खरं आणि बहुतांश मुलांकडं असणारं प्रश्नचिन्ह आहे.

त्याच्या इतर अनेक उत्तरांशी आपला इथं फारसा संबंध नाही. पण एक सहज आणि तितकंच सर्वत्र लागू असलेलं उत्तर मात्र लक्षात घेण्यासारखं आहे आणि ते म्हणजे 'अभ्यास सुखाचा नाही, म्हणून आवडत नाही'. याच्या विरोधात इतकं सारखं, सर्वांचं असं जरी उत्तर नसलं तरी बऱ्याच जणांना 'खेळणं आवडतं'. कारण काहींना त्या बरोबरीनं - सिनेमा आवडतो, चांगलं चांगलं खायलाप्यायला आवडतं, हिंडायला आवडतं, इंटरनेट सर्फिंग आवडतं - अशी अनेक उत्तरं असू शकतात. पण आश्चर्य वाटेल की, या साऱ्या उत्तरांची कारणं मात्र अनेक नसून 'ते ते सुखाचं वाटतं, आनंदाचं वाटतं' एवढं एकच आहे.

क्षणभरासाठी आपण असं पाहू की, 'अभ्यास करण्यानं अत्यंत आनंद मिळतो आहे' असा अनुभव एखाद्या मुलाला येतो आहे. तर 'अभ्यास' आता 'त्याच्या आवडीचा अगदी पहिला विषय ठरेल'. याच बरोबर कल्पना करू की, त्याच मुलाला 'खेळ खेळण्यानं दुःख होतं' असा अनुभव येतो आहे, तर आता पूर्वी आवडणारा आणि त्याच्यासारख्या अनेक मुलांना अत्यंत आवडणारा 'खेळ आता नावडीचा विषय ठरतो आहे' हे आनंदाचं गणित मोठं गंमतशीर आहे.

हा प्रश्न आणि ही उत्तरं अर्थातच मुलांचा अभ्यास आणि खेळ यांपुरती मर्यादित नक्कीच नाहीत. म्हणूनच आनंद मिळावा, विचारानं तरी विसावा मिळावा या मोठ्यांच्या विषयात आपण ही प्रश्नोत्तरं पाहिली. कारण जी परिस्थिती, अभ्यास अन् खेळ या मुलांच्या अगदी नेहमीच्या विषयांच्या बाबतीत आहे, तीच परिस्थिती थोड्याफार फरकानं मोठ्यांच्याही, अगदी नेहमीच्या जवळजवळ सगळ्या विषयांच्या बाबतीतही आहे.

उदाहरणार्थ, एखादा विषय घ्या - जबाबदारी घेण्याचा ! मोठ्या माणसांवर अनेक वेळा जबाबदारी घेण्याचा प्रश्न येतो. मग ती लग्न करून पत्नीची जबाबदारी घेण्यापासून अगदी राष्ट्रीय पातळीवर एखादं पद किंवा कार्य स्वीकारून ती जबाबदारी घेण्यापर्यंत कुठलीही गोष्ट असो. यात उत्साहानं 'जबाबदाऱ्या घेणारे' भेटतील तसे उत्साहानंच आणि थोड्याशा कौशल्यानंही 'जबाबदाऱ्या न घेणारे' भेटतील. जसं घेणाऱ्यांचं कारण त्यातून एक आनंद मिळतो हे आढळेल, तसं टाळणाऱ्यांचंही जबाबदाऱ्या टळल्यानं किंवा दुसऱ्या कुणी त्या घेतल्यानं फुकटचं दुःख, ताप टळतो आणि 'आनंद'च मिळतो, हेच कारण असल्याचं लक्षात येईल.

म्हणजे आपल्या कामं करण्यामागं जितकं - आनंद मिळवणं, असलेला आनंद टिकवणं, निदान तो घालवू न देणं आणि अगदी किमानपक्षी दुःख तरी टाळणं - हे उद्दिष्ट आहे, तितकंच आणि अगदी तसंच उद्दिष्ट म्हणजे - आनंद मिळवणं, टिकवणं, घालवू न देणं - असं उद्दिष्ट अनेक कामं न करण्यामागंही आहे.

जर असंच सुरळीत आणि अपेक्षेप्रमाणं सुखरूप चाललं असतं, तर हेही ठीक आहे. कारण हवी ती कामं किंवा वस्तू घेणं, माणसं जोडणं - अशा साऱ्या गोष्टी आनंदाच्या होतील तर करायच्या, आणि जर त्या टाळल्यानं किंवा न करण्यानं आनंदाच्या ठरत असतील तर नाही

करायच्या किंवा टाळायच्या, इतकं सरळ ते जमलं असतं. त्यामुळं अर्थातच - करण्यानं टिको नाहीतर न करण्यानं टिको - माणसाचा आनंद सततच टिकला असता.

पण असं तर कुठं दिसत नाही. जन्मभर आनंदात राहाणं या मार्गानं शक्य असताना, जन्मभर तर सोडाच, अर्धा जन्मसुद्धा आनंदात जात नाही. आपल्याला आनंद हवा आहे आणि त्यात कुणालाच काही शंका असायचं कारण नाही, पण त्याचा शोध घेताना आत्ता पाहिलेला हा इतका सोपा मार्ग, सोपा ठरत नाही आणि त्यामुळं त्याला उपाय काय हे शोधणं गरजेचं ठरतं, कारण त्याशिवाय 'आनंदाचा विसावा'आपल्या मनाला मिळणार नाही.

आत्ताच आपण पाहिलेली उदाहरणं जर सहज पुन्हा आठवली तरी हे लक्षात येईल की, मुलांच्या अभ्यास अन् खेळाच्या बाबतीत आनंद मिळवायचा किंवा टिकवायचा सोपा मार्ग म्हणजे अभ्यास न करणं आणि भरपूर खेळणं. पण अगदी सहज हे कळेल की, हा मार्ग वाटतो तेवढा सोपा अजिबात नाही. कारण या ज्या गोष्टी आपण करायच्या किंवा न करायच्या म्हणतो आहोत, त्या दोन्ही गोष्टी आपल्या म्हणजेच मुलांच्या हातात नाहीत. उलट जे टाळण्यानं आनंद मिळणार ते सक्तीनं करावं लागतं आणि जे केल्यानं आनंद मिळणार ते सक्तीनं टाळावं लागतं ! परिणामी जे करावं लागतं त्यानं तर आनंद नाहीच, उलट जे टाळावं लागतं त्यानं मात्र दु:ख होतं. म्हणून इतकं सोपं असूनही, ते करता न आल्यानं, मुलांचं जीवन तणावाचं आणि अर्थातच आनंदाला पारखं होतं.

थोड्याफार फरकानं हीच गोष्ट मोठ्या माणसांचीही घडते, असं लक्षात येईल. मग ते जबाबदारी घेण्याचं, न घेण्याचं असो की आणखी काही असो ! एखाद्या उच्च पदाची जबाबदारी घेऊ इच्छिणाऱ्या

आणि त्याद्वारे आनंद मिळवू पाहाणाऱ्या माणसाच्या बाबतीत असं होतं की, त्या जबाबदारीच्या पदासाठी जी परीक्षा द्यावी लागते तीच त्याला द्यायला मिळत नाही. एकतर आजारपणासारखी कारणं उद्‌भवतात, कधी कधी ते पदच रिकामं होत नाही, कधी कधी ते रिकामं झालं तरी रिकामंच ठेवायचा मॅनेजमेंटचा निर्णय होतो - यांतलं काहीही झालं तरी या मार्गानं आनंद मिळवू पाहाणाऱ्या या बिचाऱ्याला दुःखातच राहावं लागतं. उलट जो हे सगळं टाळून आनंदात राहू पाहातो आहे, त्याच्या वाट्याला ते पद अगदी, त्याचीच वाट पाहात असावं, तसं अलगद चालून येतं आणि ती जबाबदारी, तो लौकिक मोठेपणाही त्याच्या बाबतीत दुःखाला कारण होतो.

बरं, या दोन्ही बाबतीत अनेकदा हे सारं आपल्या हातात नाही. त्यामुळं एक जबाबदारीचं पद न मिळाल्यानं दुःखी आणि एक ते मिळाल्यानं दुःखी ! एकूण या दोघांची जी अवस्था किंवा आनंदाचं दुर्भिक्ष्य असल्याची जी अवस्था असते, तीच बहुतेकांची का होते, हे आता आपल्या हळूहळू लक्षात येईल.

याचं सर्वांत मोठं कारण आपल्या लक्षात येईल, ते म्हणजे या सर्वांचा आनंद मिळवण्याचा जो प्रयत्न चालला आहे, तो बाह्य परिस्थितीच्या बाबतीत काही बदल करून किंवा तो बदल करण्याचं टाळून चाललेला आहे. म्हणजेच सारांशानं त्यांचा आनंद हा परिस्थितीवर अवलंबून आहे. त्या परिस्थितीचं स्वरूप कसं का असेना, त्यांना असं वाटतं आहे की, ही परिस्थिती अमुक अमुक पद्धतीची आहे, ती तशीच राहिली किंवा ती अमुक अमुक पद्धतीची झाली की, मला आनंद होणार किंवा माझा आनंद टिकणार ! पण अशी कुठलीच परिस्थिती नाही की, जी प्रत्येक माणसाच्या इच्छेनुसार राहील - जाईल.

माणूस विज्ञानाच्या साहाय्यानं परिस्थितीवर, निसर्गावर नियंत्रण

आणण्याचे प्रयत्न करतो आहे. त्याला गेल्या काही शतकांत तर पुष्कळ प्रमाणात यशही मिळालं आहे. हे गृहीत धरलं तरीसुद्धा ते नियंत्रण सामूहिक स्वरूपाचं आहे. माझ्या एकट्याच्या मनातल्या, त्याही माझ्या काही विशिष्ट कल्पनांनुसार परिस्थितीनं राहावं, हे कधीच शक्य नव्हतं आणि नाही. खरं पाहिलं तर आनंदाच्या प्राप्तीसाठी त्याची गरजही नाही.

कारण मुळातच आनंद ही एक प्रत्येक माणसाला अगदी सामान्यातल्या सामान्य आणि असामान्यातल्या असामान्य माणसाला निसर्गत: उपलब्ध असलेली वस्तू किंवा अंतर्गत मानसिक स्थिती आहे. ती मुळात जशी बाह्य परिस्थितीवर अवलंबून नाही, तशी ती अशा बाह्य श्रीमंती - गरिबीवरही अवलंबून नाही. कारण मुळात आनंद जसा कुठं बाहेर दाखवण्यासारखी वस्तू नाही, तसाच तो मिळवण्याचा, टिकवण्याचा मार्ग किंवा शोध हीसुद्धा कुठं बाहेर सापडणारी किंवा शोधण्याची वस्तू नाही.

पण दुर्दैवानं म्हणा, भ्रमानं म्हणा, व्यक्तिगत पातळीवर असो किंवा सामूहिक पातळीवर असो - आनंदीआनंद करण्याचे बऱ्याच प्रकारचे भ्रामक विचार - योजना, या बाहेर काहीतरी करण्याच्या असतात आणि त्यामुळं प्रत्यक्षात त्या का फसतात, हे आता लक्षात येईल. मग त्या राजकीय विचारप्रणाली असोत, सामाजिक क्रांत्या असोत किंवा धार्मिक वा आध्यात्मिक संघटना असोत.

तसा आनंद हा पूर्णत्वाचा स्वभाव आहे. पूर्णत्व आलं की, आनंद येतो. साध्या व्यवहारातसुद्धा एखादी गोष्ट हातात घेतली आणि ती तडीला गेली, पूर्णत्वाला गेली की, आपल्याला स्वाभाविकच आनंद होतो. यातून निर्माण होणारी सर्वांत महत्त्वाची भ्रमाची गोष्ट मात्र अशी की, त्यामुळं माणसाला वर्षानुवर्षं वाटत आलेलं आहे की, जर आनंद

मिळवायचा असेल तर जे जे अपूर्ण वाटतं आहे, दिसतं आहे ते ते पूर्ण केलं की, आनंद मिळणार, टिकणार !

यातून मग सारी लौकिक धडपड सुरू होते. जी धडपड पूर्णपणे बाह्य जगात चालते. घर लहान वाटतं, अपूर्ण वाटतं. मग ते मोठं किंवा पूर्ण करण्यासाठी माणूस वर्षानुवर्षं कष्ट घेतो, तहानभूक विसरून काम करीत राहातो. त्यातून दोन गोष्टी पदरात पडतात. त्यानं पूर्ण म्हणून केलेलं घर तोपर्यंत नवनवी तंत्रं येऊन किंवा गरजा बदलून पुन्हा काही बाबतीत अपुरं ठरायला लागतं, इकडं आयुष्याची महत्त्वाची वर्षं खर्ची पडतात, पैशापरी पैसा जातो !

कुणाला वाटतं, माझं आनंदाचं सारं गाडं अडलं आहे, ते कमी पडणाऱ्या शिक्षणामुळं. मग त्याचा शोध सुरू होतो. हे शीक, ते शीक - ही पदवी, ती पदवी. एक तर शिक्षणाचा प्रांत कधीच न संपणारा, त्यामुळं त्यातून पूर्णत्व गाठणं हे मृगजळासारखं आहे. संगणकाच्या बाबतीत जसं आज शिकलेलं उद्या टाकाऊ ठरतं, पुन्हा नवं शिकावं लागतं-त्यामुळं पुन्हा अपूर्णत्व कायम, अपूर्णत्वाची रुखरुखही कायम !

हीच अवस्था पैशानं पूर्णत्व गाठू म्हणणाऱ्याची होते. नक्की किती मिळवला आणि नक्की किती साठवला म्हणजे तो पूर्ण होणार याचा उलगडा करता करता आयुष्य निघून जातं ! पैसा हातात राहतोही, पण आनंद दूरच राहातो. तीच गोष्ट लोकसंग्रहानं, सत्तेनं, सौंदर्यानं, जगाच्या परिभ्रमणानं, लिखाणानं, वाचनानं-एक ना दोन जगातल्या हजारो गोष्टींनी पूर्ण होऊ पाहाणाऱ्याची होते.

हा माणसाचा खरं तर हजारो वर्षांचा अनुभव आहे. यातून कुणीच काही शिकलं नाही, असं म्हणणं अर्थातच धाडसाचंही ठरेल आणि चुकीचंही ठरेल. त्यातून योग्य तो बोध घेऊन, खऱ्या आनंदाचा योग्य जागी शोध

घेऊन, त्यासाठी योग्य विचार करून, आनंद मिळवून परिपूर्ण झालेले महानुभाव काही थोडे थोडके नाहीत. मग ते उपनिषत्कालीन ऋषी असोत, संत-सत्पुरुष असोत, सॉक्रेटिस असोत, महावीर असोत वा बुद्ध असोत. पण बहुतांश जग मात्र आनंदाचा आणि त्यासाठी लौकिक जगातल्या घरंदारं, विद्या, माणसं, सत्ता अशा ठिकाणच्या पूर्णत्वाच्या प्रयत्नांचा पाठपुरावा करण्याच्या भ्रमात आहे, हे सत्य आपण अगदी आजही सहज अनुभवू शकू.

असं जर असेल आणि जर आनंद ही आतली अवस्था आहे आणि ती मिळवण्याचा मार्गही जर आतल्याच काही गोष्टींत आहे, तर त्या समजून घेणं हे आपल्या तरी हिताचं ठरेल, नाही का ? ते सोपं व्हावं म्हणून आपण एक घडलेली गोष्ट पाहू.

एका गावी एक सामान्य व्यापारी होता. त्याची पत्नी ही सतत आनंदी असे. व्यापाऱ्याच्या बाबतीत व्यापारात होतात तसे चढउतार नेहमी होत. त्याला ज्यावेळी मंदीमुळं तोटा येई, तेव्हा बायकोचे दागिने गहाण टाकून, विकून तो वेळ निभावून नेई. पुन्हा कधी तेजीही येई. गिऱ्हाईक वाढे, कधी वाढलेल्या भावांचा फायदा होई, तेव्हा त्याला चांगला नफासुद्धा होई. अशा वेळी चार पैसे बाजूला पडले की, त्यातून तो बायकोचे दागिने सोडवून आणी. कधी पूर्वी विकावे लागले असले, तर नवीन दागिने करून आणी. त्यामुळं कधी त्या पत्नीच्या अंगावर भरपूर दागिने दिसत, तर कधी कधी नुसतं मंगळसूत्रही दिसे. त्यामुळं ते पाहाणाऱ्या इतर बायकांना ते गूढ वाटे. बरं, कमी दागिने आहेत त्यावेळी ती दु:खात दिसावी, काळजीत दिसावी, तर असंही दिसत नसे. म्हणजे निदान चोरीमारी किंवा इतर अशी काही शंका घेता येईना.

म्हणून अखेर एकदा शेजारणींनी स्पष्टच विचारलं. तेव्हा तिनं उलगडा केला की, व्यापारात चढउतार चालायचाच. जेव्हा धंदा चांगला चालतो

तेव्हा हे मला चार दागिने करतात, मी घालते. कधी त्यांना नुकसान झालं की, दागिने काढून देते. दागिने मोडून ते ती वेळ भागवतात. त्यावर शेजारणींनी विचारलं, 'ते ठीक आहे, पण तुम्ही नेहमी आनंदात कशा राहू शकता ? निदान दागिने द्यावे लागल्यावर तरी दुःखात कशा दिसत नाही ? अशा वेळी दुःख होणं तर स्वाभाविकच नाही का ?' त्यावर त्या बाई म्हणाल्या, 'अशा वेळी दुःख होणं 'स्वाभाविक' आहे, असं कुठं आहे ? तसं दागिने असण्यानंही मी आनंदात कुठं असते ? कारण मुळात आनंद हा या दागिन्यांच्या असण्यावर किंवा नसण्यावर अवलंबून कुठं आहे ? परिस्थितीच्या स्वभावानुसार ती कधी अशी, तर कधी तशी ही असायचीच. त्यामुळं माझा आनंद हा त्या परिस्थितीवर अवलंबून न ठेवता, मी तो आतल्या तटस्थतेनं परिस्थितीकडं पाहाण्यावर अवलंबून ठेवला आहे. तटस्थ राहाणं तर माझ्या आतल्या स्थितीवर, आतल्या नियंत्रणावर आहे. त्यामुळं मी नेहमीच तटस्थ राहू शकते, नेहमीच साक्षित्वानं पाहू शकते. म्हणून माझा आनंद नेहमीच राहू शकतो. उलट साक्षित्वानं पाहाण्यानं मला या परिस्थितीच्या चढउतारात आपलं कर्तव्य जे आहे ते पार पाडता येतं, कारण परिणामांच्या तणावापासून मी मुक्त असते. त्याहीपेक्षा उलट या साऱ्या प्रपंचाच्या घडामोडींकडं, त्यांतल्या चढउतारांकडं मी कौतुकानं पाहू शकते, त्याची मौज घेऊ शकते !'

साक्षित्व हा आनंदाचा असा आतला एक मार्ग आहे. तो माणसाचा आनंद बाह्य परिस्थितीकडून सोडवून टाकतो. स्वतंत्र करतो. फक्त काहींना असं उगीचच वाटतं की, असं बाह्य परिस्थितीकडं तटस्थतेनं पाहाता यायला लागलं, त्यातल्या नफानुकसान, चढउतारांकडं तटस्थतेनं पाहाता यायला लागलं की, त्या दोन्ही विषयी माणूस उदास होऊन कर्तव्याला चुकेल. पण ही शंका केवळ ज्याला कुठं जायचं-यायचं नाही, त्यानं विचारलेल्या प्रवासाबद्दलच्या शंकांसारखी आहे !

कारण ज्यावेळी मनुष्य खऱ्या अर्थानं 'साक्षी' बनतो, त्यावेळी त्याची कर्तव्यदक्षता तर टिकून असतेच, पण तो उलट अधिक कार्यक्षम असतो, हा अनुभव कुणाही थोर पुरुषाकडं पाहून येईल. अत्यंत कमी वयातसुद्धा जगात कर्मांचा डोंगर रचणारे स्वामी विवेकानंदांसारखे सत्पुरुष काय किंवा साऱ्या भारतीय राजकारणाला गती आणि दिशा देणारे लोकमान्य काय-चित्ताच्या अशा साक्षित्वाच्या स्थितीमुळंच स्वत:ला धक्कादायक, अन्याय्य तुरुंगवासाची शिक्षा ऐकूनही शांतपणे झोपी जाऊ शकतात आणि पुढं भारतीय तत्त्वचिंतनात आणि अक्षरवाङ्मयात अजोड भर घालणारा ग्रंथ अशा तुरुंगवासातही निर्माण करू शकतात.

जसं साक्षित्व माणसाच्या दैनंदिन जीवनात आनंद आणायला कारणीभूत ठरतं, तसं चित्ताचं समत्वही आनंद आणायला कारणीभूत ठरतं. आज माझ्या 'मी'ला किंवा 'देहा'ला होणाऱ्या सुखदु:खाला धरून कुठल्याही घटनेची होणारी माझी प्रतिक्रिया अवलंबून आहे आणि अर्थातच मनाचा आनंद आणि दु:ख हा सततचा हेलकावाही त्यामुळं सुरू आहे. त्याऐवजी जो परिस्थितीत कर्तव्य करील, तो ते करीलच, पण त्यानंतर येणाऱ्या लाभ किंवा हानी, सुख किंवा दु:ख, अपेक्षित किंवा अनपेक्षित - अशा कोणत्याही परिणामाला सामोरं जाताना जो चित्ताचं समत्व कायम राखू शकेल, त्याला आनंदाची, शांततेची स्थिती कायमचीच टिकवता येईल. चित्ताचा समतोल हीसुद्धा आनंदाची एक गुरुकिल्लीच आहे. अशा माणसाला परिस्थितिनिरपेक्ष समाधान असतं. इथंही पुन्हा हे लक्षात अवश्य ठेवावं की, ही माणसं आवश्यक ते कष्ट अगदी सामान्य माणसापेक्षाही जास्त करतात.

एका रोमन विचारवंतानं स्टिल्पो नावाच्या अशा समतोल वृत्तीच्या,मोठ्या विवेकी योद्ध्याची गोष्ट सांगताना म्हटलं आहे की, हा एवढा निधड्या छातीचा थोर योद्धा, पण एकदा तो ज्या देशाच्या बाजूनं

लढत होता त्या देशाचा युद्धात पराभव झाला. स्वत: स्टिल्पोचं घरदारसुद्धा गेलं, संपत्ती लुटली गेली. अंगावरच्या कपड्यानिशी तो कसाबसा बचावला. आयुष्यात अनेक युद्धात जिंकलेला आणि कीर्तीमान असलेला हा थोर पुरुष अशा वेळी युद्धातल्या पराभवाच्या आणि दुर्दशेच्या अपमानानंच गेला असता.

पण आनंदाची अचूक जाण असलेला हा समतोल वृत्तीचा पुरुष या साऱ्या घटनेनंतर मित्राला म्हणाला, 'आज माझं घरदार, लौकिक संपत्ती अशा साऱ्या गोष्टी नाहीशा झाल्या. पण ज्यामुळं मी आजही आनंदी, शांत आहे ती माझी आतली संपत्ती - चित्ताचं समत्व, धैर्य - ही खरी संपत्ती, ती अगदी पूर्ण सुरक्षित आहे.'

अशा समतोल वृत्तीचा माणूस विजयात आनंदात राहील यात कौतुक नाही, पण अशा बाह्य पराभवाच्या आणि प्रतिकूल परिस्थितीतही आनंदात-शांततेतच राहील, हे त्याचं खरं कौतुक आहे आणि त्यातून शिकण्यासारखंही आहे. म्हणूनच या स्टिल्पोवर लिहिताना विचारवंतांनी म्हटलं आहे की, अशा मन:स्थितीच्या माणसाचा पराभव करणंही अशक्य आहे आणि त्याची आनंदित किंवा शांत अवस्था मोडणंही अशक्य आहे.

जी गोष्ट अशा समत्वानं येते, तीच गोष्ट आणखी एका वृत्तीनंही येते, ती म्हणजे मनाची विशालता. आनंदाचं प्रमाण अनेकदा या मनाच्या विशालपणाच्या प्रमाणाशी सम असतं, निगडित असतं. मनुष्य जितका विशाल, तितका सुखी-आनंदी. उपनिषत्कारांना हे रहस्य गवसलं आहे. ते सांगताना छांदोग्य उपनिषदात ते म्हणतात, 'यो वै भूमा तत् सुखम्', जो जितका विशाल होत जाईल, तितका तो आनंदी होत जाईल. आपण जे सुरुवातीला - अपूर्णपणामुळं दु:ख होतं - असं पाहिलं, म्हणून माणूस साऱ्या गोष्टी वाढवायच्या आणि पूर्ण करायच्या नादाला लागतो असं म्हटलं, त्याच्याशी निगडित अशीच ही विद्या आहे. फक्त माणसाची तिथं चाललेली धडपड ही

बाह्य गोष्टी -शिक्षण, घर, माणसं, पैसा, सत्ता - अशा गोष्टी गोळा करून पूर्ण होण्याची असते आणि त्यामुळं आपण आनंदी होऊ असं त्याला वाटतं. प्रत्यक्षात ते बाह्य असल्यानं कधीच पूर्ण होत नाही आणि त्यामुळं दु:खी राहावं लागतं ! त्यात जी चूक होते ती आनंदाचा मार्ग बाहेर शोधल्यामुळं होते. पण हे पूर्णत्व आत म्हणजे मनाच्या पातळीवर शोधण्यामुळं ती चूक दुरुस्त होते.

आपण पाहातोच की, एखादा माणूस अगदी स्वत:च्या सुखापुरतं, तेही विशेषत: त्याच्या 'मी'पणापुरतं किंवा 'देहाच्या सुखापुरतं' पाहू लागला की, त्याला स्वत:ला तर पूर्ण आनंदी-सुखी कधी होताच येत नाही. उलट इतरांना अगदी जवळच्या कुटुंबियांना-मित्रांनासुद्धा ते दु:खाचं, त्रासाचं होऊन बसतं. त्याऐवजी तोच माणूस स्वत:बरोबर वेळी स्वत:पेक्षा कुटुंबापुरतं पाहू लागला म्हणजे, मनानं तेवढा विशाल झाला, तर कुटुंबीयही आनंदित होतात आणि तोही. तो आनंदित व्हायला आणखी एक कारण घडतं, ते असं की, तो विशाल होऊन जेव्हा इतरांच्या आनंदाचं कसं होईल याची काळजी घेतो, तेव्हा तेही आपण होऊनच याच्या आनंदाची काळजी घेतात.

परिस्थिती कशीही असो, कर्तव्यकर्म कोणतंही वाट्याला येवो, आपली मतं-विचारप्रणाली कुठलीही असो - माणूस जर चारपाच माणसांच्या सुखाचा विचार करण्याएवढा विशाल झाला तर इतका सुखी-आनंदी होऊ शकतो, तर अधिक अधिक विशाल होत मनानं पूर्णत्व गाठू शकला, तर 'अवघे विश्वचि माझे घर' या वृत्तीनं खरा पूर्ण आणि आनंदी का होऊ शकणार नाही ? श्री ज्ञानेश्वर माउलींसारखा कोणत्याही, कितीही प्रतिकूल अशा व्यावहारिक बाह्य परिस्थितीत असूनही या मनाच्या विशालतेच्या मार्गानं 'कैवल्याचा नि आनंदाचा' पुतळा का नाही होऊ शकणार ? किंवा लोकव्यवहार चारचौघांसारखा किंवा लौकिक सुखसमृद्धीच्या पातळीवर

वेळीचारचौघांपक्षा कमी असूनसुद्धा श्री तुकोबांसारखा 'आनंदाचे डोही आनंद तरंग' असा अनुभव 'याचि देही याचि डोळा' का नाही घेऊ शकणार ?

ते तो नक्की करू शकेल, हे उत्तर आपण नीट विचार केला तर अवश्य देऊ शकू. त्यासाठी मात्र साक्षित्वाचे विचार, समत्वाचे विचार, विशालतेचे विचार या साऱ्यांची किती निकड आहे, हे आपल्या लक्षात येईल. या आणि अशा अनेक गोष्टी आपल्या अंतरंगातच आहेत. आनंद देऊ शकणारे किंबहुना असलेल्या आनंदाची ओळख देऊ शकणारे, तो टिकवू शकणारे विचार आपल्या अंतरंगातच आहेत. त्यांना जागृत करणं, योग्य दिशा देणं, ते टिकण्यासाठी सत्संगात असणं, त्याप्रमाणं प्रसंगांत कृती होत आहेत ना, याकडं लक्ष देणं - ही कामं करताकरता सोपी होत जाणारी आहेत. जो आनंद आहे, तोही या अंतरंगातच आहे. फक्त त्याच्या शोधांच्या वाटा, विचारांच्या योग्य विकासानं आतच गवसत असतात. हे समजून घ्यायला हवं आणि अमलात आणायला हवं, नाही का ?

अगदी साध्या भाषेत आपण 'गाता गळा' म्हणतो. येत नसलं तरी गात राहिल्यावर हळूहळू ते नक्की यायला लागतं. वर म्हटले ते विचार प्रथमदर्शनी अवघड वाटले, नवीन वाटले तरी एकवेळ गात्या गळ्याच्या क्षमतेला शारीरिक अनुकूलतेचं अंग असेल पण अंतरंगात आधीच असलेल्या आनंदासाठी योग्य विचार करण्याची क्षमता मात्र आपण ठरवलं की, जागी होणारी आहे. आणि त्या अर्थानं 'विचार करता विसावा' हे कुणालाही शक्य आहे, करावं असंच आहे !

* * *

माणूस कोणताही असो, कोणत्याही परिस्थितीतला, कोणत्याही काळातला असो त्याच्यात्याच्या आयुष्यात त्यालात्याला 'महत्त्वा'च्या वाटणाऱ्या काही गोष्टी या असतातच. आयुष्याचीच नव्हे, तर रोजच्या कामाची दिशा ठरवताना ही 'महत्त्वा'ची गोष्ट किंवा अशा 'काही गोष्टी' त्याच्या मनात नकळत असतात. व्यापाऱ्याचं धंद्यातल्या 'नफ्या'कडं जे लक्ष असतं, त्याच्या दृष्टीनं त्याच्या आयुष्यात त्याला जे 'महत्त्व' असतं, तेच एखाद्या चित्रकाराला त्याच्या 'रंगरेषे'चं असेल, खऱ्या विद्यार्थ्याला 'विद्ये'चं असेल, संगीतकाराला 'सुरां'चं असेल, भक्ताला त्याच्या 'भगवंता'चं असेल. त्या गोष्टीप्रमाणं त्याचंत्याचं आयुष्य तो तो माणूस घालवायला तयार होतो. अशा या गोष्टी प्रत्येक माणसागणिक वेगवेगळ्या असतील, हे उघडच आहे.

पण त्याचबरोबर हेही जाणवेल की, अशाही काही 'महत्त्वा'च्या गोष्टी आहेत की, ज्याच्या बाबतीत मात्र सर्वांच्याच दृष्टीनं सारखंच महत्त्व आहे. इतकंच काय, वेळी ती ती माणसं आपल्या आपल्या महत्त्वाच्या गोष्टी बाजूला ठेवतील, पण ही महत्त्वाची समान गोष्ट मात्र नजरेआड होऊ देणार नाहीत.

माणसाच्या माणूस म्हणून ज्या अशा महत्त्वाच्या 'काही समान गोष्टी' आहेत, त्यांत अगदी श्रेष्ठ दर्जाची गोष्ट म्हणजे 'स्वातंत्र्य' ही होय. ही गोष्ट मानवी जीवनात इतकी प्रधान आहे की, तिच्या रक्षणासाठी माणूस आपलं जीवन, त्यातल्या इतर महत्त्वाच्या गोष्टीसुद्धा सोडायला आणि बदलायला तयार होईल. खूप पैसा दिला, पण स्वातंत्र्य हिरावून घेतलं, गुलाम म्हणून वागवलं, तर पैसा कितीही महत्त्वाचा असला, तरी माणूस प्रसंगी त्याचा त्याग करायला तयार होईल. 'स्वातंत्र्या'सारखं श्रेष्ठ आणि

पवित्र मूल्य ही मानवी जीवनाची खरोखर शान आहे, असं म्हटलं तरी वावगं होणार नाही.

काही माणसं पैशापोटी स्वातंत्र्य गहाण टाकायला, तयार होत असतीलही पण ते अपवाद आहेत. त्यातही त्यांना त्यांची गुलामगिरी लक्षात आली तर मात्र ते स्वतःच्या स्वातंत्र्यासाठी मग तो भूल घालणारा पैसासुद्धा सोडायला तयार होतील. आणि त्यांच्याही बाबतीत हे स्वातंत्र्याचं मूल्य अंतिमतः खरं ठरतं, हे लक्षात येईल. आता माणुसकीला - मानव जातीला ललामभूत ठरणाऱ्या या 'स्वातंत्र्य' कल्पनेचा खरा नि व्यापक अर्थ पाहाणं, हे खचितच औचित्याचं नि उपयोगाचं ठरेल असं वाटतं. कारण अनेकदा स्वातंत्र्य इतकं महत्त्वाचं असूनही त्याच्यावरचा विचार, त्याची योग्य दिशा, त्याची मर्यादा, त्याचा खरा आविष्कार - अशा अनेक गोष्टींवरचे विचार अनेकांच्या आयुष्यात कुठं न आल्यानं ते या खऱ्या स्वातंत्र्याला आणि त्यासाठी करायच्या नेमक्या प्रयत्नांना, त्यापासून मिळणाऱ्या आनंदाला पारखे होतात.

स्वातंत्र्य म्हणजे बरेचदा परकीय सत्तेपासून आपली सुटका होणं, म्हणजेच 'राजकीय स्वातंत्र्य' हेच चटकन आणि प्रामुख्यानं नजरेसमोर येतं, नाही का ? आणि तसा विचार केला तर 'स्वातंत्र्या'चा मुख्य अर्थ असाच आहे. कारण त्यात आपली अनेक प्रकारची इतर स्वातंत्र्यं आपोआपच येतात. आपलं आचाराचं, विचाराचं, भाषणाचं अशी अनेक प्रकारची स्वातंत्र्यं - आपण राजकीयदृष्ट्या स्वतंत्र असलो, तरच निर्वेधपणे आपल्याला मिळू शकतात, हे खरंच आहे.

पण त्याचा अर्थ हाही आहे की, या राजकीय स्वातंत्र्याबरोबरच 'माणूस' म्हणून आणखी अनेक प्रकारच्या 'स्वातंत्र्यां'ची माणसाला गरज आणि शक्यता आहे. अशा इतर अनेक गोष्टी आहेत की, ज्या बाबतीत

आपण स्वतंत्र आहोत की परतंत्र हे आपल्या क्वचितच लक्षात येतं. किंबहुना आपण इतर स्वातंत्र्यांचा विचारसुद्धा अनेकदा केलेला असत नाही. त्यामुळं अर्थातच आपलंच नुकसान होतं.

उदाहरणार्थ, सत्ता निघून गेली पण तिनं आपल्याला दिलेला पोषाख हा त्यांचा आहे. माझा काही देशी, स्वतंत्र पोषाख आहे ही जाणीवसुद्धा त्यामुळं विसरून गेली. एखादी गोष्ट चांगली आहे, स्वीकारण्यासारखी आहे म्हणून स्वीकारणं - भले ती परकीय असो - हे वेगळं आणि केवळ लादली, सवयीची झाली म्हणून ती स्वीकारणं वेगळं. पहिल्यात चांगलं-वाईट ठरवण्याचं स्वातंत्र्य आपल्याला आहे नि ते अमलात आणण्याचं स्वातंत्र्यही आपल्याला आहे. पण दुसऱ्यात ती दोनही स्वातंत्र्यं आपण 'राजकीयदृष्ट्या स्वतंत्र' असूनही आपल्याला नाहीत, हेच सूचित होतं, नाही का ?

ही गोष्ट पोषाखापुरती आहे, तोवर एकवेळ ठीक आहे, पण हेच बंधन इतर अनेक सूक्ष्म गोष्टीत आपल्यावर आहे, ही जाणीव आपल्याला झाली, तर मग स्वातंत्र्य ही किती व्यापक नि गरजेची गोष्ट आहे, हे लक्षात येऊ लागतं.

समजा, कुणा एका माणसावर काही आपत्ती आली, काही मदतीची त्याला गरज असली आणि गरज म्हणून, माणूस म्हणून ती सारखीच असली तरीही ज्याच्या गावचा, ज्याच्या धर्माचा, ज्याच्या गणगोताचा तो माणूस असेल त्यानं पुढं व्हावं, असं स्वाभाविकपणे आपल्याला वाटतं ना ?

वास्तविक पाहाता तो माणूस आहे आणि त्याला त्या क्षणी मदतीची गरज आहे आणि एक माणूस म्हणून ती करणं आपल्याला शक्य, योग्य आणि आवश्यक आहे, असं आहे. पण आपल्या हे लक्षात येईल की, हा विवेकी विचार करायला मी स्वतंत्र कुठं आहे ? बरं, यात राजकीयदृष्ट्या स्वातंत्र्याचाही कुठला प्रश्न-अडथळा नाही ! तरीही एक माणूस म्हणून मी

'स्वतंत्र' नाही, हेच खरं ! म्हणून दुसऱ्यानं पुढं व्हावं, असं मला वाटतं.

आपल्या असंही लक्षात येतं की, राजकीयदृष्ट्या स्वतंत्र होणं ही खऱ्या प्रगत-उन्नत-सुखी मानवी जीवनाची, नागरी जीवनाची खरी फक्त सुरुवातच आहे. इतर रूढींची, धर्मांची, जातींची, पंथ-भाषा-आर्थिक-सामाजिक विषमतांची, अमानुष-पाशवी वर्तनांची अशी अनेक प्रकारांची बंधनं जोवर आपल्यावर आहेत, तोवर सामाजिक किंवा व्यक्तिगतदृष्ट्यासुद्धा आपलं जीवन सुखी, समाधानी आणि प्रगत होणं कठीण आहे. राजकीयदृष्ट्या आपण स्वतंत्र असू, तर सर्वांना कायदा समान असेल आणि तो कुठला भेदभाव करायला खचितच सांगणार नाही. पण आपण स्वतंत्र नसू, तर मात्र कायदा कसाही असला तरी आपल्याकडून कुठल्या ना कुठल्या बंधनामुळं भेदभाव होईल आणि तोच आपल्याला, आपल्या समाजाला दुःखाचा ठरेल.

या साऱ्यावरून आपल्या एक गोष्ट सहजच लक्षात येईल की, बंधन भाषेचं असो, विचाराचं असो, कुठल्या पंथाचं असो - त्याचं अडचणीचं बंधन असतं ते आचारावर, बाह्य गोष्टीवर असतं, असं जरी वाटत असलं आणि त्यानंच सामाजिक विषमतांना आपल्याला तोंड द्यावं लागत असलं, तरी ते मूळ आणि खरं बंधन नसून, खरं सूक्ष्म बंधन माणसाच्या मनावर असतं. त्याच्या कल्पना, विचार, भावनांवर असतं. म्हणून बाह्य कायदा, शिक्षा या गोष्टी तात्पुरत्या उपयोगी वाटल्या, तरी खरी समता आणायला, खरा बंधुभाव, खरी एकात्मता आणायला त्या उपयोगी ठरत नाहीत. ज्यावेळी मनाच्या या विविध प्रकारच्या पारतंत्र्यांपासून त्याची मुक्तता होईल, ज्यावेळी मनाच्या या सूक्ष्म आणि मूलभूत स्वातंत्र्याची प्राप्ती माणसाला होईल, तेव्हाच या साऱ्या सामाजिक विषमतांवरचं, दुर्दशेवरचं खरं उत्तर माणसाला गवसेल.

गुरुदेव रवीन्द्रनाथ टागोरांसारख्या विश्वकवीनं मांडलेल्या भारताच्या स्वातंत्र्याच्या कल्पनेत माणसाच्या या बाह्य तसंच आंतरिक स्वातंत्र्याचा

उल्लेख आपल्या प्रसिद्ध कवितेत का आणि कसा केला आहे, त्याची आपल्याला खचितच आठवण होईल. तिथं मांडलेली कल्पना ही नुसत्या राजकीय स्वातंत्र्याची नाही, हे आपल्याला ठाऊकच असेल. आपल्या आयुष्यात आपल्याला दुःखात टाकणाऱ्या अनेक गोष्टी आपल्या दैनंदिन जीवनात घडत असतात. याला कुणी अपवाद नाही. पण अनुभव असा येतो की, त्या गोष्टी साध्यासाध्या असून, कदाचित ते कळतही असून, त्यांत माणसाचं मन अडकून त्यावर अकारण विचार करीत राहातं, त्याला सतत दुःख देत राहातं, त्याला त्या त्या क्षणी लागलेली दुःखाची टोचणी, त्यावर विचार करूनकरून ताजी ठेवतं. उदाहरणानं पाहिलं, तर कुणाचं तरी एखादं न पटणारं मत, न आवडणारा शब्द, न आवडणारा निर्णय, अगदी आपल्या शेजारून कुणीतरी चुकीच्या पद्धतीनं पुढं नेलेली गाडी - असल्या असंख्य गोष्टी रोज घडत असतात. आपण स्वतः नंतर विचार करून पाहिला, तर त्या गोष्टीला दोन-पाच मिनिटं विचार करण्यापलीकडं काहीही महत्त्व देण्याचं कारण नसतं. हे आपल्याला पटतंसुद्धा. पण या किरकोळ पण आपल्याला दिवस-दिवस दुःख देणाऱ्या विचारांपासून मुक्त राहाण्याचं स्वातंत्र्य तरी आपल्याला आहे. याचा विचार जरी मनुष्य करू शकला, तरी त्याला विचारांचंच नव्हे तर विचारस्वातंत्र्याचं मोठं दालन खुलं होईल.

माणसाला जसा एखाद्या गोष्टीचा योग्य विचार करण्याचं स्वातंत्र्य आहे, तसंच एखाद्या गोष्टीवर खरंतर विचार न करण्याचंसुद्धा स्वातंत्र्य आहे! पण आपल्याला स्वातंत्र्याच्या कल्पनेचा असा व्यापक अर्थ कळला असला, तर हे सारं शक्य होईल ना ?

निसर्गव्यवस्थेतल्या 'माणूस' या सर्वोच्च निर्मितीचे घटक म्हणून आपल्याला विचारस्वातंत्र्याचा परिचय खचितच 'आवश्यक'ही आहे आणि 'शक्य'ही आहे.

* * *

अनेक घरातून असं दृश्य आपल्याला पाहायला मिळालेलं असेल. संध्याकाळची वेळ आहे, घरातली मुलं आपल्या मित्रांसह मैदानावर खेळायला पळण्याची रोजची वेळ आहे. पण आज संध्याकाळ झालेली असूनही तसं चित्र दिसत नाही. मुलं बाहेर न जाता पुस्तकं - वह्यांत बुडून गेलेली आहेत. तसे फार परीक्षेचे दिवस आहेत असंही नाही. पण भराभर अभ्यास उरकण्याचं काम सुरू आहे. कारण विचारल्यावर कळतं की, आज संध्याकाळचं खेळणं बुडलं तरी चालेल. अभ्यासही पूर्ण करायचा आहे, कारण रात्री तो शिल्लक राहू नये. याचं खरं कारण, आज रात्री टीव्हीवर एक फार चांगला सिनेमा लागणार आहे. तो चुकू नये. त्या सिनेमासाठी बराच मोकळा वेळ लागणार आहे. एरवी संध्याकाळी खेळायला जाऊ नका, असं एखादे वेळेस जर म्हटलं, तर लगेच तोंड एवढंसं करणारी मुलं आज आपण होऊन संध्याकाळचा खेळ बुडवायला तयार आहेत. हे दृश्य थोडं विचार करण्यासारखं आहे.

अनेक घरांतून आपण असंही चित्र पाहिलं असेल की, घरच्या कर्त्या पुरुषाला किंवा कर्त्या स्त्रीला नोकरीमध्ये बढतीची संधी आलेली आहे. संधी दुर्मीळ आहे, महत्त्वाची आहे. त्याला ते पात्र ठरलेले आहेत. त्या संधीत वाढणाऱ्या जबाबदाऱ्या, बदल्या, कामाचा ताण या बरोबरच मोठा आर्थिक लाभ, आपल्या आपल्या कार्यक्षेत्रातला वाढणारा मानमरातब आहे. सामाजिक प्रतिष्ठा वाढणार आहे. यामुळं सारे द्विधा आहेत. संधी नाकारण्यात नुकसान तर सरळच आहे. पण स्वीकारण्यात निर्माण होणारं कौटुंबिक अस्थैर्य, अस्वास्थ्य याबरोबर व्यक्तिगत ताणतणावात होणारी लक्षणीय वाढ हेही अपरिहार्य आहे. बराच विचार विनिमय होतो, सल्लेमसलती होतात, थोडेफार भेदमतभेद होतात. अखेर स्वास्थ्याचा विचार प्रबळ ठरतो.

इतर नुकसान त्यापुढं गौण ठरतं आणि ही संधी नाकारायचा निर्णय होतो.

आता याच दोन्ही चित्रांतल्या घटनांची पर्यायी चित्रं आपण तीही पाहूया. तीही व्यवहारात घडताना दिसतील. घर तेच आहे, मुलं तीच आहेत, रात्री सिनेमा तोच आहे, अभ्यास तोच आहे, फक्त उद्या परीक्षा आहे आणि ती बोर्डाची आहे. तिच्यावर आपल्या पुढच्या आयुष्याची दिशा अवलंबून आहे. आता त्याच घरात आपण पाहिलं तर चित्र वेगळं आहे. सिनेमा चांगला आहे, आवडीचा आहे, तरीही तो बुडवायचा ठरलं आहे. त्यापेक्षा रात्री उशीरापर्यंत जागून अभ्यासाची तड लावायचा निर्णय झालेला आहे.

आता दुसऱ्या उदाहरणातलं पर्यायी चित्र पाहू या. परिस्थिती तीच आहे. माणसं, घरातल्या अडीअडचणी, वाढणाऱ्या जबाबदाऱ्या, ताण, बदल्या सर्व सारखं आहे. मिळणारे आर्थिक फायदे, वाढणारा मानमरातब, सामाजिक प्रतिष्ठा सारं सारखंच आहे. जाणारं स्वास्थ्यही सारखंच आहे. फक्त ऑफिसच्या नियमांत एकच फरक झालेला आहे की, ही बढती न स्वीकारणाऱ्यांना कंपनीचा राजीनामा द्यावा लागणार आहे किंवा कालांतरानं होणाऱ्या नोकरकपातीच्या वेळेला त्यांना त्याला सामोरं जावं लागणार आहे. आता मात्र निर्णयात फरक पडला आहे. स्वास्थ्य थोडंफार गेलं तरी चालेल, पण बरोबर, उलट निर्णय झालेला आहे. बढती स्वीकारायची ठरलेली आहे.

आपण आता हा विचार करायला हरकत नाही की, पहिला निर्णय असा लगेच विरुद्ध का झाला आणि हाही विचार करायला हरकत नाही की, पहिला निर्णय दोन्ही ठिकाणी तसा झाला, त्याला तरी काय कारणं होती ? केवळ आधी सांगितली तेवढी परिस्थितीच कारणीभूत होती का ? अधिक विचार केला तर हे लक्षात येईल की, या पहिल्या काय किंवा नंतरच्या काय निर्णयामध्ये आणखी एक घटक कारणीभूत होता. तो तसा पडद्यामागचा सूत्रधार आहे आणि तो म्हणजे प्रत्येकानं कळतनकळत स्वीकारलेली

मूल्यव्यवस्था.

पहिल्या चित्रात अभ्यासाला मूल्य आहेच, पण चांगल्या - कधीतरी पाहायला मिळणाऱ्या सिनेमालाही मूल्य आहे. त्याच चित्रात पुढं सिनेमालाही मूल्य आहे, तसंच ते बोर्डाच्या परीक्षेलाही आहे. फक्त फरक एवढाच की, या दोन्ही गोष्टींना सारखंच मूल्य नाही. सिनेमाचा आणि बोर्डाच्या परीक्षेचा प्रश्न आल्याबरोबर तुलनेनं सिनेमाचं आधी अधिक वाटणारं मूल्य कमी ठरलं आणि परीक्षेचं जास्त. पर्यायानं निर्णय परीक्षेकडं गेला.

तीच गोष्ट बढतीची, स्वास्थ्याची आणि नोकरी जाण्याची आहे, नाही का ? आधी अधिक मूल्य वाटणाऱ्या स्वास्थ्यात, नोकरीच जाते म्हटल्यावर मूल्याचा चढउतार झाला. ताण पडला तरी चालेल, पण बढती स्वीकारावी असा निर्णय झाला. नोकरीचं मूल्य त्या बढतीनं जाणाऱ्या स्वास्थ्यापेक्षा अधिक ठरलं.

या साऱ्यावरून आपल्या एक-दोन गोष्टी लक्षात आल्या असतील की, आपल्या अनेक विचारांच्या मागं, कृतींच्या मागं आपण मानलेली मूल्यं हा एक अत्यंत महत्त्वाचा घटक असतो. तो ज्या पद्धतीनं, जसा, जितका काम करील, तसतसा आपला विचार व निर्णय बदलत जात असतो. हा घटक फारसा वर दिसत नसला, तरी तो या साऱ्या मानवी कृतींच्या मागचा एक निर्णायक घटक असतो आणि दुर्दैवानं म्हणा किंवा आपला बेसावधपणा म्हणून म्हणा आपल्याला अनेकदा या मूल्यांची कल्पनाच नसते. ती नसल्यानं, आपलं दोन प्रकारचं नुकसान होत असतं, हेही आपल्या लक्षात येईल.

पहिली गोष्ट ही की, माणसाचे निर्णय - ते होणं, बदलणं, परस्परविरोधी निर्णय होणं - यांमुळं अनेकदा आपण बुचकळ्यात पडतो, माणसांशी कसं वागावं कळत नाही, अनेकदा तो माणूस बदलला आहे, दुटप्पीपणा करतो आहे, विक्षिप्तपणा करतो आहे, इथंपासून तो मुद्दामच

आपल्याला त्रास देण्यासाठी असं काहीतरी करतो आहे, इथंपर्यंत आपले सारे समज - गैरसमज होतात. अनेकदा यावरून वाद, भांडणं, संघर्ष या गोष्टींना विनाकारणच सामोरं जावं लागतं. या साऱ्या निर्णयांमागं त्याचीत्याची काही मूल्यं काम करीत असतील, अशा तऱ्हेचा विचारच आपल्या मनात येत नसल्यानं, असल्या अनेकदा टाळता येण्याजोग्या अनेक संघर्षांत, गैरसमजात आपली कितीतरी ताकत, वेळ वाया जातो. आपल्याला तो त्या माणसाचा व्यक्तिगत दोष वाटतो. हा एक भाग झाला.

दुसरी गोष्ट अशी की, ही मूल्यं आपल्या जीवनाला, निर्णयांना, कृतींना दिशा देतात, हे एकदा लक्षात आलं की, एखाद्याच्या बाबतीत किंवा अगदी आपल्या स्वत:च्या बाबतीतसुद्धा आपल्याला आपल्या विचारांची, कृतींची दिशा बदलावी असं वाटत असेल, तर उगीच स्वत:वर सक्ती करण्यापेक्षा, राग काढण्यापेक्षा किंवा असंच काहीसं इतरांच्या बाबतीत करून अडचणीत येण्यापेक्षा - वेगळा एक मार्ग आपल्याला उपलब्ध होऊ शकतो. तो मूलगामीही आहे, अन् विधायकही आहे. तो म्हणजे स्वत:ची विचार व मूल्यव्यवस्था तपासण्याचा. त्यांच्यात आवश्यक तो बदल घडवण्याचा. तो मार्ग वापरला तर,जीवनातले, कृतीतले बाकीचे बदल आपोआपच घडतात. हीच बाब इतरांच्यातल्या बदलालाही लागू आहे. मात्र आपण हे मूल्यांचं माणसाच्या जीवनातलं स्थान ओळखण्याची गरज आहे.ते न घडलं, तर आता सांगितलेल्या दोन आघाड्यांवर आपलं नुकसान होण्याची शक्यता आहे. किंबहुना ते होतच असतं, असं आपल्या लक्षात येईल.

आता या जीवनमूल्यांचा, त्यांच्या तपशिलांचा आपण थोडा मागोवा घेऊ या. मूल्यांचा विचार करायला सुरुवात केली की, काही वैशिष्ट्यं आपल्या लक्षात येतात. त्यांतलं पहिलं असं की, 'मूल्य' हे मुळातच माणसाच्या संस्कृतीचं प्रधान वैशिष्ट्य आहे. इतकंच काय, ही मूल्यं -

निदान शाश्वत किंवा प्रधान मूल्यंच - जर संकटात आली किंवा ऱ्हास पावली, तर माणसाच्या जीवनाला पशूच्या जीवनाची कळा आल्याशिवाय राहात नाही. पशूंच्या जीवनामध्ये अशा तऱ्हेची मूल्यव्यवस्थाच नाही.

दुसरं वैशिष्ट्य असं की, 'मूल्य' शब्दाचा अर्थच दाखवतो त्याप्रमाणं मूल्य म्हणजे किंमत, योग्यता, अर्थ. हेही माणसाचं वैशिष्ट्य आहे. माणसाला ही क्षमता आहे की, तो कोणत्याही गोष्टीचं मूल्य जाणू शकतो, ते बदलू शकतो, त्यात तरतम करू शकतो. एखाद्या वस्तूला, कल्पनेला, घटनेला काही नवीन, मोठं, कमी मूल्य देणं ही माणसाची मोठीच शक्ती आहे. एखाद्या विशिष्ट आकाराच्या, रंगाच्या कापडाची किंमत ती काय असायची, पाच पन्नास रुपये. पण त्याला राष्ट्रध्वजाचं स्थान दिलं की त्याच कापडाचं मूल्य किती बदलू शकतं, हे आपण पाहातोच. अशा वेळेला त्याचं लौकिक किंवा व्यावहारिक खरेदीमूल्य तेवढंच राहिलं, तरी देशाच्या मोठ्यात मोठ्या व्यक्तीलासुद्धा त्या वस्तूचं मूल्य त्या वस्तूला वंदन करण्याएवढं ठरतं, ही मानवी संस्कृतीची करामत आहे.

तिसरं वैशिष्ट्यं असं की, 'मूल्य' म्हणून ही सारीच 'मूल्यं' 'मूल्यवान' असली तरी त्या सर्वांचं मूल्य सारखं नाही. त्यात कमीजास्तपणा आहे. किमतीत महत्त्वाचा फरक आहे. मूल्यांची एक उतरंड आहे. ही उतरंड कशी लावायची, कुणी लावायची याबद्दल मतभेद असू शकतात. पण व्यक्तीच्या जीवनात असो किंवा सामाजिक जीवनात असो, आपली आपली एक मूल्यव्यवस्था- श्रेष्ठ-कनिष्ठ मूल्यांची व्यवस्था - असते.

ती श्रेष्ठ-कनिष्ठता ठरवण्यातसुद्धा माणसांची प्रगत-अप्रगत अवस्था किंवा प्रगल्भता कळू शकते. राजकीय सत्ता, पैसा, सामाजिक मानमान्यता - याच बरोबर नीती, सत्य, अहिंसा, दया, परोपकार अशा मूल्यांचे गट दिसतात. यांत उंच - सखल, श्रेष्ठ - कनिष्ठ ठरवणं आवश्यक असतं. तसं ते समाज

आणि प्रत्येक माणूससुद्धा ठरवीतच असतो. मात्र ते व्यक्तिपरत्वे बदलू शकतं. पण एकदा कमीजास्त ठरलं, क्रम लागला की, माणूस नेहमी निर्णय घेताना चटकन अधिक मूल्य असलेली गोष्ट पत्करतो. म्हणजे एखाद्या धनिकाच्या दृष्टीनं जर पैसा ही मानापेक्षा अधिक मूल्यवान गोष्ट असेल, तर तो पैशासाठी वेळी अपमानसुद्धा पत्करायला तयार होईल.

त्यातूनच निर्माण होणारं या मूल्यव्यवस्थेचं चौथं वैशिष्ट्य असं की, या मूल्यांची उतरंड हा अनेकदा मतभेदाचा, वादाचा - वेळी संघर्षाचा, युद्धाचा विषय असला तरीही मुळात काही मूल्यं ही 'शाश्वत' असतात. कोणत्याही काळी आणि कोणत्याही व्यक्तीला ती लागूच असतात. सत्य, दया, करुणा, परोपकार अशा सार्वत्रिक आणि त्रिकालाबाधित मूल्यांचं स्थान, सर्वकाळी, सर्व समाजामध्ये उच्च राहातं, हे कळून येतंच.

तीच गोष्ट व्यक्तींनी किंवा समाजानं आपल्या आपण ठरवलेल्या मूल्यांच्या बाबतीतसुद्धा घडू शकते. काही प्रमाणात तरी असं श्रेष्ठ-कनिष्ठ बरोबर आहे की नाही, हे आपणदेखील सांगू शकतो. स्वार्थापोटी 'स्वत:चं कल्याण' हे मूल्य जास्ती महत्त्वाचं आहे, असं मानणारा एखादा सामान्य माणूस किंवा 'प्रजेचं कल्याण' हे श्रेष्ठ मानणारा कर्तव्यदक्ष राजा आणि 'मानवाचं कल्याण' हे मूल्य श्रेष्ठ मानणारा सत्पुरुष यांच्यातलं अधिक बरोबर काय हे ठरवणं, सहज शक्य वाटतं.

त्यातूनच असं एक सूत्र गवसतं की, मूल्यांना जितकी व्यापकता येईल, तितकी ती श्रेष्ठ ठरतात. त्याचबरोबर माणसाच्या अंतिम हिताकडं, मानवजन्माच्या सार्थकाच्या अंतिम उद्दिष्टाकडं घेऊन जाणारी मूल्यं ही स्वाभाविकत:च श्रेष्ठ ठरवावी लागतात.

मूल्यव्यवस्थेचं पाचवं वैशिष्ट्य हे की, माणसा-माणसांच्या व्यवहारामध्ये जे वैचित्र्य आहे, वैविध्य आहे, जे संघर्ष आहेत, विशेषत: जे

उघडउघड विरोधाभास आहेत, त्यांचा उलगडा या मूल्यव्यवस्थेच्या अभ्यासानं आणि त्यावरच्या विचारानं होतो.

एखादी सतत नट्टापट्टा करणारी स्त्री घ्या. नाना तऱ्हेच्या सौंदर्यप्रसाधनांचा क्षणोक्षणी वापर करणारी ती स्त्री कुठलाच मेकअप् न करता कुणासमोर येण्याची कल्पनासुद्धा करू शकत नाही. स्वाभाविकपणे तिच्या दृष्टीनं कोणतीच सौंदर्यप्रसाधनं न वापरणाऱ्या स्त्रिया या गावंढळ, तिरस्काराचा, तुच्छतेचा विषय असतात. इतकंच काय, इतरांनी विशेषतः इतर पुरुषांनीही यांच्या सौंदर्याला - अर्थातच कृत्रिम सौंदर्याला - दाद देताना या इतर बावळट, तुच्छ स्त्रियांकडं तसंच तुच्छतेनं पाहावं - अशीही त्यांची सुप्त अपेक्षा असते.

याच्या उलट ज्या स्त्रियांचा असल्या बाह्य देखाव्यावर विश्वासच नाही, त्या तर असा मेकअप् टाळतीलच, पण ज्या काटेकोरपणे पहिल्या स्त्रिया मेकअप् करण्याची नि तो टिकवण्याची काळजी घेतील, तितक्याच काटेकोरपणे दुसऱ्या स्त्रिया मेकअप् चुकूनही घडू नये, याची काळजी करतील आणि खरं वास्तव सौंदर्य टिकवण्याचा प्रयत्न करतील. दोघींचंही वर्तन हे वरवर पाहाता विरोधाभासाचं, त्यांच्यापुरतं संघर्षाचं, वादाचं असलं तरी त्याचा उलगडा त्यामागच्या त्यांच्या मूल्यव्यवस्थेतल्या भिन्नतेच्या अभ्यासानं होतो.

तीच गोष्ट प्राणपणानं एखाद्या इझम-विचारप्रणालीसाठी आयुष्यभर झगडणाऱ्या आणि तसल्याच दुसऱ्या कुठल्या इझमसाठी आणि विशेषतः पहिल्या इझमच्या विरोधासाठी आयुष्यभर झगडणाऱ्या दोन कट्टर विरोधकांची आहे आणि अधिक व्यापक क्षेत्रात पाहिलं तर तीच गोष्ट सश्रद्ध-अश्रद्ध माणसांच्या विरोधाभासाच्या वागण्याचीही आहे. पदोपदी श्रद्धेची काळजी घेणारा माणूसही आपण पाहातो. त्याचबरोबर आपल्या आयुष्यात श्रद्धेसारख्या

भाबडेपणाला कुठं चुकूनसुद्धा स्थान मिळू नये, याची काळजी घेणारा माणूसही आपण पाहातो. मूल्यांचा आपला अभ्यास असेल, तर आपण तो विरोधाभास तर समजू शकू. आपल्यापुरता संघर्ष टळेल, त्रास कमी होईलच, पण आपण मूल्यव्यवस्थेचा अधिक अभ्यास करू, तर त्यातलं तरतमसुद्धा ओळखू शकू. हे सारं विचारानं आपल्याला शक्य आहे.

यातूनच एक नवा मुद्दा उपस्थित होतो आणि तो असा की, मूल्यांची जशी श्रेष्ठ - कनिष्ठ, शाश्वत - अशाश्वत अशी विभागणी आपण करू पाहातो आहोत, तशी ती करताना आपल्याला अजून काही निश्चित स्वरूपाचा आधार देता येईल का, किंवा निश्चित स्वरूपाचा निकष घेता येईल का की, ज्याच्या योगानं आपल्याला श्रेष्ठ-कनिष्ठ ठरवणं सोपं पडेल ? तर तसा आधार आपल्याला जरूर मिळवता येईल. त्यासाठी थोडा माणसाचा विचार करावा लागेल.

माणूस जगताना नुसता माणूस म्हणून एकच दिसला तरी, तो दोन पातळ्यांवर जगत असतो. त्याच्या प्रत्येक हालचालीला, व्यवहाराला दोन अंगं असतात. समजा, एखादा मनुष्य करमणुकीसाठी, घटकाभर मजेत घालवण्यासाठी एखाद्या सिनेमाला गेला. तीन तास तिथं घालवून आल्यावर त्याला विचारलं, काय तीन तास विरंगुळा झाला ना ? तर तो म्हणतो, सिनेमाला गेलो, तीन तास थिएटरमध्ये होतो खरा, पण सिनेमाला गेल्यासारखं काही वाटलं नाही.

म्हणजे पहिल्या प्रत्यक्ष व्यवहाराच्या, देहाच्या पातळीवर विरंगुळ्यासाठी आवश्यक ती कृती त्यानं केली, त्या दृष्टीनं विरंगुळा मिळाला पाहिजे. पण मनाच्या पातळीवर घरच्या, प्रपंचाच्या, धंद्याच्या, नोकरीच्या कसल्या तरी चिंता त्याला तिथं भेडसावीत राहिल्यानं त्याचं सिनेमात लक्ष लागलं नाही, असं तो निराशेनं, दु:खानं सांगतो. त्यावेळी नेहमीच्या बाह्य

पातळीवरील कृती बरोबर घडली, तरी आतल्या पातळीवर काहीही घडलं नाही. त्यामुळं त्याला अपेक्षित लाभ तर घडलाच नाही, उलट तो निराश झाला. या अर्थानं पाहिलं, तर माणूस बाह्य पातळीवर जगतो, तसा तो आतल्या पातळीवरही जगतो. त्याच्या कृतींना बाह्य अंग आहे, तसं अंतरंगही आहे.

हे एवढंच नाही, तर देहाच्या पातळीवर गोष्ट घडणं आणि आतल्या मनाच्या, अंतरंगाच्या पातळीवर गोष्ट घडणं - या दोन्ही सारख्या बाबी तर नाहीतच, पण त्यात तरतम भाव आहे. इतर प्राणी जास्त करून या देहाच्या-बाह्य - इंद्रियांच्या पातळीवरच जगतात. त्यामुळं त्यांचा व्यवहार त्या पातळीवर पुराही होतो. पण माणसाचा व्यवहार त्या पातळीवर होत असला, तरी तो पुरा होत नाही. आतल्या पातळीवरच तो पुरा होतो. देहाच्या पातळीवरचा व्यवहार मर्यादित असतो, तर आतल्या, सूक्ष्म पातळीवरचा व्यवहार फारच व्यापक, विशाल असतो. बाह्य पातळीवरच्या व्यवहाराला फारच बंधनं आहेत, तो क्षणिक आहे, तात्पुरता आहे, पण आतलं विश्व मात्र मुक्त, व्यापक, टिकाऊ, शाश्वत आहे.

म्हणूनच आपल्या असं लक्षात येईल की, माणसाचे व्यवहार देहामार्फत चाललेले असले, तरी ते सारे आतल्या व्यवहारांसाठी, आतल्या उद्दिष्टांसाठी असतात. एकवेळ बाहेरचे व्यवहार घडतील, पण आतला खरा आवश्यक व्यवहार किंवा आतला आवश्यक परिणाम घडेलच असं नाही. पण आतली गोष्ट मात्र बाहेरच्या कृती नसतानासुद्धा घडून येऊ शकेल. म्हणूनच विरंगुळा निर्माण करणारी बाह्य कृती करूनही आत विरंगुळा घडला नाही. पण एखाद्या वेळी कोणतीही बाह्य कृती न करताही विरंगुळा निर्माण होऊ शकेल, चित्त प्रसन्न राहू शकेल किंवा मनाचीच अशी अवस्था राहू शकेल की, ते कायम प्रसन्नच आहे.

आता आपण ज्या 'मानवी जीवनमूल्यांबद्दल आणि त्यांच्या श्रेष्ठ-कनिष्ठते'बद्दल बोलत आहोत, त्याचा आणि या माणसाच्या देहाच्या नि मनाच्या अंतरंगाच्या पातळीवर जगण्याचा संबंध कोणता ? तर त्यातून आपल्याला शाश्वत किंवा टिकणारी मूल्यं ठरवण्याची एक दिशा, एक निश्चित निकष मिळू शकतो. तो असा की, आपण पाहिलेल्या अनेक मूल्यांमध्ये माणसाला सुख - समाधान देण्याची क्षमता आहे. त्यात काही मूल्यं अशी आहेत, जी त्याच्या देहाला किंवा बाह्य, दृश्य अंगाला सुख देऊ शकतात. उलट काही मूल्यं अशी आहेत की, जी देहाला कदाचित सुख देतील वा न देतील, पण अंतरंगाला सुख नक्की देतील, त्याला समाधानी करतील, व्यापक करतील. अशा वेळी त्याच्या देहाच्या पातळीवरच राहाणारी मूल्यं कनिष्ठ प्रतीची होय, हे उघड आहे.

उदाहरणार्थ, आज अनेकांच्या जीवनामध्ये सर्वांत महत्त्वाचं स्थान मिळवून बसलेलं - 'पैशा'सारखं परिचित मूल्य घ्या. 'पैशा'ला महत्त्व तर आहेच. जगाचा बराचसा व्यवहारही त्यावरच चालतो, यात शंकाच नाही. पण म्हणून ते 'प्रधान'मूल्य मानून जर माणूस चालायला लागेल, तर पैशाच्या साहाय्यानं त्याला मिळू शकणाऱ्या वस्तू त्याच्या फार तर देहाला सुखसोयीच्या ठरू शकतील.

उदाहरणार्थ, देहाच्या भुकेला भरपूर अन्न तो पैशाच्या साहाय्यानं मिळवू शकेल. पण मुळातच देहाचं सुख क्षणिक आणि नश्वर असल्यानं भूक भागल्याचं सुख मिळतं, तोवरच पुन्हा भूक लागल्याचं दु:ख ते उभं करील. तीच गोष्ट पैशाच्या साहाय्यानं घेता येणाऱ्या इतर साधनांची आहे. म्हणूनच पैसा भरपूर आल्यानं भरपूर सुख मिळेल, ही कल्पनाच देहाधारित असल्यानं ती क्षणिक आणि फोल ठरते. उलट जास्त पैशानं निर्माण होणाऱ्या चिंता, मत्सर, मोह या मंडळींच्यामुळं या पैशाच्या मूल्यापोटी अधिक दु:खच

पदरात यायची शक्यता आहे. म्हणूनच प्रत्यक्ष अनुभव पाहिला तरी ज्यांच्याजवळ जास्तीत जास्त पैसा आहे, ते जास्तीत जास्त सुखी असं आढळत नाही. तीच गोष्ट देहाला धरून असलेल्या भरपूर आयुष्य, निरोगी शरीर, मुलंबाळं इत्यादी इतर मूल्यांची आहे.

याउलट जी मूल्यं 'सूक्ष्म' असतात, विशाल असतात, पूर्णतेवर आधारलेली असतात, ज्यांच्या अनुभवानं मन कायमचं समाधान पावू शकतं, अशी अंतरंगप्रधान मूल्यंच श्रेष्ठ मूल्यं होत. अशा अंतरंगप्रधान, सूक्ष्म मूल्यांमध्येसुद्धा अधिकाधिक श्रेष्ठत्व कसं येत जातं ते पाहाता येईल. 'मी' हे एक मूल्य धरून चालणारा माणूस, पुढं जाऊन 'माझी माणसं' हे मूल्य प्रधान धरतो, तेव्हा स्वाभाविकच 'मी'च्या मूल्याला मर्यादा असल्यानं त्याचा व्यवहार करताना मिळणाऱ्या आनंदालाही मर्यादा पडतात.

तोच 'माझी माणसं' हे मूल्य धरून चालू लागला, तर अधिक प्रगल्भ ठरेल, अधिक आनंदी होईल. याच क्रमानं 'माझा समाज', 'माझा देश', 'हे पूर्ण विश्व' अशा क्रमानं जाता जाता जर या 'विश्वापलीकडची विश्वशक्ती' इथंपर्यंत पोचला, तर क्रमाक्रमानं विशाल होत जाणारं त्याचं मूल्य त्याला प्रत्येक वेळी अधिकाधिक आनंद तर देईलच, पण रोजच्या व्यवहाराला एक वेगळं परिमाण लाभेल. ज्या क्षुद्र चिंता, विवंचना, काळज्या यांनी त्याला ग्रासलेलं असतं, ज्यांच्यामुळं त्याला आनंद मिळणं दुर्लभ होतं -त्या साऱ्या चिंता,काळज्या, विवंचना कमी होतात. या योग्य विचारामुळं, त्यांच्या विकासामुळं, मूल्यांच्या ओळखीमुळं उलट त्याच्या स्वास्थ्यात भर पडते. चित्ताला विसावा लाभतो. जर ही मूल्यप्रगती उत्तम तऱ्हेनं करू शकला तर त्याच्या या जीवनात 'आनंदाचे डोही आनंद तरंग'च उरतील.

या साऱ्या पार्श्वभूमीवर आपल्या हे लक्षात येऊ शकेल की, अखंड आनंदाचा साक्षात अनुभव घेणाऱ्या संतांना त्यांच्या आयुष्यात

भगवंताचं, ईश्वराचं आणि त्याची जाणीव, भेट घडवून देणाऱ्या आपल्या गुरूंचं मूल्य अंतिम का वाटतं ? एकदा ते मूल्य सर्वांत श्रेष्ठ ठरलं की, बाकी सारी मूल्यं त्याच्या खालीच आहेत हे लक्षात येतं.मग इतर मूल्य - जग असो, देश असो, समाज असो, नगण्य मी असो - प्रत्येक पातळीवरच्या लाभ - हानीला, मान - मान्यतेला, सत्तेला, पैशाला - कशालाच फार महत्त्व राहात नाही आणि इतर कुठल्याही पातळीवर कोणतीही स्थिती - परिस्थिती भोगावी लागली, वाट्याला आली तरी तिची भीती त्यांना वाटत नाही, त्याचा कशाचाही त्यांच्या आनंदावर, समाधानावर यत्किंचितही परिणाम होत नाही. ते अखंड आनंदात राहू शकतात. म्हणूनच ईश्वर किंवा अखंड समाधान हे या साऱ्या मूल्यश्रेणीतलं सर्वोच्च मूल्य ठरतं !

म्हणूनच माणसाच्या जीवनाला दिशा आणि अर्थ देणाऱ्या या 'मूल्यां'चा आपण अधिकाधिक विचार करूया, अभ्यास करूया, अंमल करूया आणि त्यातून आत्मकल्याण आणि विश्वकल्याणही साधूया !

* * *

८. संघर्षांपलीकडं

लहानपणापासून आपल्यावर संघर्षाचे संस्कार आहेत. वेगवेगळ्या पातळीवर माणसाला संघर्ष करण्याची सवय आहे. जन्माला आल्यापासून मरेपर्यंत माणूस इतक्या प्रकारचे संघर्ष करतो की, संघर्षाशिवाय जीवन नाही, अशी त्याची पक्की धारणा होते. शेवटी तर तो आपल्या जगण्याला 'जीवनसंघर्ष' म्हणू लागतो.

माणूस जन्माला येतो तेव्हापासून जगण्यासाठी धडपड करणं, वेगवेगळ्या दुर्बलता आणि रोगराईंशी तोंड देणं, असा त्याचा कार्यक्रम सुरू होतो. त्यातून जगाच्या व्यवहाराचं उपजत ज्ञान त्याला नसल्यामुळं जगण्यासाठी लागणारं वेगवेगळ्या प्रकारचं ज्ञान मिळवण्यात म्हणजेच अज्ञानाशी संघर्ष करण्यात त्याचा सारा बालपणाचा व तरुणपणाचाही काळ जातो.

त्यात आर्थिकदृष्ट्या प्रतिकूलता, सामाजिकदृष्ट्या मागासलेपण अशा तऱ्हेच्या अनेक गोष्टींशीही त्याला वेळोवेळी संघर्ष करावा लागतो. त्यात पुन्हा त्याची वेगवेगळी ध्येयं निर्माण होतात. लौकिकदृष्ट्या आपण कुणीतरी होणं, मग धनवान किंवा सत्ताधीश किंवा आर्थिकदृष्ट्या सबळ मनुष्य होणं, कौटुंबिकदृष्ट्या लग्न किंवा मुलंबाळं होणं - अशा तऱ्हेची त्याची ध्येयं असतात. त्याचबरोबर घरदार, वाहनवस्तू अशांसारख्या गोष्टी मिळवण्याची त्याची ध्येय असतात, ती वेगळीच. ही सारी गाठताना त्याला सततचा संघर्ष करावा लागतो.

या संघर्षाचं स्वरूप कष्टानं एखादी गुणवत्ता मिळवणं, एखादं कौशल्य मिळवणं, तशाच पद्धतीची ध्येयं मिळवू पाहणाऱ्यांशी सदोष, निर्दोष स्पर्धा करणं, मिळवण्याच्या गोष्टी दुर्मीळ असतील, तर त्या हस्तगत करण्यासाठी झगडणं आणि वेळी इतरांच्या आधी त्या प्राप्त करण्याचे प्रयत्न करणं - अशा स्वरूपाचे हे संघर्ष माणसाच्या आयुष्याच्या अखेरीपर्यंत सतत

सुरू राहातात. इतके की, मरतानासुद्धा मनुष्य त्याला झालेल्या अंतिम आजाराशी संघर्ष करीतच मृत्यू पावतो.

या संघर्षमय जीवनाचा आपल्या मनावर होणारा परिणाम मात्र क्वचितच पाहिला जातो. सतत संघर्ष करीत असल्यामुळं मनाची अशी एक समजूत तयार होते की, संघर्ष हेच माणसाचं जीवन आहे. संघर्ष केल्याशिवाय त्याला परिस्थितीतून कधीच मार्ग काढता येणार नाही आणि आपल्या ध्येयापर्यंत जाता येणार नाही. आपल्या जवळपासची माणसं किंवा परिस्थिती हे जणू काही त्या ध्येयाच्या आड येणारे शत्रू असल्यासारखी त्याच्या मनाची समजूत होते. त्यातून त्यांच्याशी कायम अविश्वासाच्या किंवा झगड्याच्या पवित्र्यातच मन वावरत राहातं. क्वचित प्रसंगी त्या घटकांतून मिळणारी मदत सोडली, तर एरवी त्या घटकांवर कशी मात करता येईल आणि आपलं ईप्सित कसं गाठता येईल, याचे डावपेच मन नकळत, पण अविश्रांतपणे आखीत असतं.

साधी वडिलोपार्जित मालमत्ता घ्या. प्रत्येक वारसाला असं वाटतं की, उरलेले वारस काही कारवाई करून आपला वाटा आपल्याला मिळू देणार नाहीत, तो वाटा लुबाडतील आणि आपलं नुकसान होईल. अशा कल्पना मनात आल्या की, इतर कुठं काही विषय नसतानासुद्धा मन संघर्षाचा पवित्रा घेतं. इतरांच्या आधी आपण कोणती हालचाल करावी, याच्या योजना सुरू करतं आणि काही काळानं त्यात कदाचित ते यशस्वीही होतं. दुर्दैवानं अयशस्वी झालं तर, पुन्हा त्याचे संघर्षाचे प्रयत्न सुरू होतात.

अशा तऱ्हेनं प्रत्येक बाबतीत 'जे आहे' आणि 'जे असावं' असं मनाला वाटतं, त्यासाठी संघर्ष करण्याची मनाला जणू एक पक्की सवय लागते. त्या सवयीपोटी 'जे आहे' ते नीट व पुरेसं समजून न घेता, जे असावं असं वाटतं, त्याच्यासाठी 'ते कसं असावं' हेही पुरेसं नीट समजून न घेता

कृती करीत सुटण्याची मनाला सवय लागते.

म्हणजे उदाहरणानं पाहायचं, तर जी वडिलोपार्जित संपत्ती आहे तिची स्थिती कशी आहे, तिची आपल्याला गरज आणि उपयुक्तता किती आहे, इतर वारसदार खरोखरच ती संपत्ती मिळवण्याचे भलेबुरे मार्ग अवलंबित आहेत काय, ती संपत्ती माझी होण्यानं - म्हणजे आपल्याला जसं व्हावं असं वाटतं आहे, तसं होण्यानं - नक्की माझ्या आजच्या आयुष्यात खरी सुखाची भर पडणार आहे की नाही, याची शहानिशा न करता मन संघर्ष करायला सुरुवात करतं, असं आढळेल. त्यामुळं अनेकदा एखाद्या नापिक किंवा वैराण जमिनीवरून किंवा पडक्या उद्ध्वस्त वाड्यावरून संघर्षाला सुरुवात होते. त्याची अखेर त्यांचं आहे ते सुख नाहीसं होण्यात आणि त्यांची असलेली नांदती घरं आणि परस्परांचे चांगले संबंध उद्ध्वस्त होण्यात होते, हेही आपण पाहिलं असेल.

जीवनाचं स्वरूप संघर्षमयच आहे, हे विचारांनी मनानं एकदा गृहीत धरलं की, ते आपल्याला सतत अकारण कार्यशील आणि अस्वास्थ्यात ठेवतं. संघर्षाशिवाय जगता येतं, हा विचार एकदा पटला, त्या दिशेनं विचार सुरू झाले, प्रत्यक्ष जगून पाहिलं, म्हणजे मग तेच जीवन हे खरं, आदर्श आणि सहज जीवन आहे, हे लक्षात येतं. कृष्णमूर्तींसारखे सत्पुरुष, जे संघर्षमुक्त जीवनाबद्दल बोलत, त्याचा अर्थ आता लक्षात येऊ शकतो. खरं पाहिलं, तर असं सहज आणि संघर्षमुक्त जीवन विचारपूर्वक जगणं हे निखळ पारमार्थिक जगणं आहे. जे कुणालाही हवंसं वाटावं असं आणि आनंदाचं आहे. फक्त त्यासाठी या संघर्षांकडं पाहण्याचा एक जागृत दृष्टिकोन, विचार या निमित्तानं सुरू झाला तरी खूप काम होईल. आपल्या हे सहज लक्षात येऊ लागेल की, संघर्ष जे काल्पनिक आणि अनावश्यक आहेत, निदान ते टाळून आपण संघर्षापलीकडं जायची सुरुवात करू शकतो.

वर पाहिल्याप्रमाणं मनाला लागलेली संघर्षाची सवय ही विचार करण्यासारखी गोष्ट आहे, हे नक्कीच. या संघर्षांचा काही प्रमाणात ध्येय मिळवायला उपयोग होत असला, तरी सततच्या संघर्षांनी माणसाचं जीवन चिंतेत, दुःखात, निराशेत, निदान अस्वस्थतेत लोटलं आहे, हा तरी आपला अनुभव नाही का ? संघर्षाच्या मनाच्या सवयीमुळं गरज नसलेले कित्येक संघर्ष आपण आयुष्यभर करीत असतो, हे आपल्या लक्षात येऊ शकेल ना? मन जर सततच संघर्षाच्या पवित्र्यात राहाणार असेल तर ते आपल्याला संघर्षमुक्त असण्यातला निकोप, निरुपाधिक, नैसर्गिक असा आनंद आणि स्वास्थ्य देऊ शकणार नाही, ही वस्तुस्थिती नव्हे काय ?

हे खरं असताना उलट व्यवहारात असं आढळतं की, अनेकांना स्वतः संघर्ष करण्यात तर रस असतोच पण इतरांचे एकमेकांत संघर्ष होत नसतील, तर त्याचं नवल वाटतं. अनेक ठिकाणी तर एकमेकांच्या संबंधात असे संघर्ष निर्माण करून माणसं त्यात भ्रामक आनंद घेतात, हा केवढा विरोधाभास आहे ! म्हणजे असं की, एखादे भाऊ-भाऊ, सासू-सून, मालक-नोकर हे जर संघर्षाशिवाय आनंदानं राहात असतील, तर अनेकांना ते अनैसर्गिक वाटतं आणि ते नसलेलं संघर्ष उपस्थित करून स्वतःही आनंदाला मुकतात आणि त्यांच्या जीवनातला आनंदही घालवतात. म्हणून अशा संघर्षप्रिय मनापासून सावध होऊन संघर्षापलीकडं जाण्याची त्याला सवय आणि विचार करायला लावणं म्हणजे स्वतःला आणि इतरांनाही विसाव्याच ठिकाण गाठून दिल्यासारखं आहे. खरा परमार्थ हा असा व्यवहार आणि पारमार्थिक वाटचाल संघर्षमुक्त करण्यातच आहे.

व्यावहारिकदृष्ट्या माणूस एखाद्या ठिकाणी असतो आणि त्याला कुठल्यातरी ठिकाणी जायचं असतं, म्हणजे जे आहे आणि जे असावं, असं वाटतं त्यांतलं अंतर निश्चित व स्पष्ट असतं. यामुळं व्यवहारातल्या जीवनात

एकवेळ कुठंतरी जाण्याची किंवा काही मिळवण्याची ही कल्पना माणसाला थोडा का होईना, संघर्ष करायला लावू शकेल. पण या सवयीनं तो जर आनंदाच्या बाबतीत किंवा परमार्थाच्या बाबतीत संघर्ष करायला जाईल, तर फसेल, हे कृष्णमूर्तींसारख्यांचं म्हणणं आपल्याला सहज पटू शकेल.

कारण परमार्थ हा स्वत:ला समजून घेण्याचा, स्वत:ची ओळख करून घेण्याचा किंवा स्वत:त असलेला आनंद अनुभवाला येण्याचा विषय आहे. तो व्यवहारात आनंद आणण्याचा मार्ग आहे. या मार्गात कुठं जाण्याचा किंवा काही होण्याचा प्रश्नच मुळात उद्‌भवत नाही. स्वाभाविकच त्यासाठी कुठला संघर्ष करण्याचीही गरज नाही. मी स्वत: जसा आहे, तसा समजून घेणं आणि आपलं खरं निखळ स्वरूप लक्षात येणं व अनुभवायला येणं यासाठी बाह्यत: कोणत्या यात्रा, अनुष्ठानं किंवा ध्येयं असणं गरजेचंच आहे, असं नाही. निदान ते संघर्षानं करायचे विषय असू नयेत, एवढं उघड आहे. व्यावहारिक प्रगतीची ध्येयं ही जीवनाचा प्रवास बनवतील, पण जीवनाचा संघर्ष बनवणार नाहीत.

पण अशा परमार्थाच्या बाबतीतही व्यावहारिक बाबींसारखी पारमार्थिक ध्येयं मन निर्माण करतं. ते मिळवण्यासाठी संघर्ष सुरू करतं आणि त्यात केवळ आपलीच फसवणूक होते. खरं सांगायचं तर 'जे आहे' ते समजून घेण्यातच आपला खरा परमार्थ सामावलेला आहे आणि त्यासाठी कुठल्या बाह्य ध्येयाची किंवा संघर्षाची जरूर नाही, हे उघडच आहे.

स्वत:चा वरवरचा स्वभाव, आवडीनिवडी, व्यवहार आणि या सगळ्याच्या खाली असलेलं जे आपलं खरं मूळ स्वरूप आहे, तिथंपर्यंत जाण्यात आणि स्थिर होण्यात आपले संघर्षही कमी होतात आणि बाहेरचे अकारण व्यावहारिक संघर्षही कमी होतात. त्यानं अपार स्वास्थ्य येतं. मात्र त्यासाठी 'संघर्षांपलीकडं' जाण्याचा विचार रुजण्याची गरज आहे !

* * *

आपण ज्यावर विचार करण्याची गरज आहे, अशा गोष्टींमध्ये शिक्षणाचा विषय हा एक अपरिहार्य विषय आहे. या शतकात तरी जवळजवळ प्रत्येक माणूस कुठल्या ना कुठल्या प्रकारे शिक्षित आहे. साध्या भाषेत शिक्षण झालं म्हणजे आता आपल्याला आयुष्यात काही नडणार नाही, अशी कुणाही सामान्य माणसाची समजूत असते, शिक्षण देणाऱ्यांचीही तशी कल्पना असते. पण प्रत्यक्ष शिक्षणानं हे उद्दिष्ट साध्य होतं का, की शिक्षणाचा आणखी काही विचार करण्याची जरूर आहे, याचा मात्र विचार करण्याची वेळ आलेली आहे. कारण एका 'शिक्षण' शब्दाचाच विचार केला, तर चुकीचं, अपुरं, पोटभरू आणि खरं इतके प्रकार या शिक्षणात आहेत, असं चटकन लक्षात येईल. याचा विचार वेळीच केला, तर आपल्याला आयुष्यात समाधान देणारं शिक्षण काय पद्धतीचं असेल, ते कसं घ्यावं लागेल, याची तरी ओळख या विचारांनी होईल.

आज शिक्षणाच्या क्षेत्राची एवढी प्रगती झालेली असताना 'खरं शिक्षण म्हणजे काय ?' असं विचारणं किंवा आपण खरं शिक्षण म्हणजे काय ते शोधूया, असं म्हणणं काहींना धाडसाचं वाटेल. किंबहुना आपण सर्व एवढे सुशिक्षित असताना, शालेय किंवा व्यावहारिक शिक्षणात आपल्या आपल्या परीनं पारंगत असताना 'खरं शिक्षण म्हणजे काय' असं विचारणंसुद्धा काहींना हास्यास्पद वाटेल. पण कोणत्याही थरातल्या माणसाला जर आपलं जीवन कुठल्याही परिस्थितीत सुसंवादी, शांत व आनंदी ठेवता येत नसेल, तर खरं शिक्षण म्हणजे काय, हा प्रश्न अगदी प्राधान्यानं विचारात घेण्याची आपल्याला खरंच गरज आहे.

पैसा, सत्ता, लौकिक, मानमान्यता, कुठल्यातरी विषयाचं साठवलेलं ज्ञान, शरीरसंपदा, स्वत:ला सतत फायद्यात ठेवण्याचं व्यावहारिक

कौशल्य किंवा करामती असल्या कुठल्या तरी गोष्टींच्या आड दडून आपण खूप शांत आणि आनंदी आहोत असं दाखवणारे आणि आतून मात्र अशांत असलेले, दांभिक लोक आपण क्षणभर सोडून देऊ. त्यांच्यापेक्षा - हा प्रश्न आम्हाला खरोखरच सुटलेला नाही - असं म्हणणारे प्रामाणिक लोक श्रेष्ठ असून ते असंख्य आहेत. म्हणून अशा लोकांसाठी तरी खरं शिक्षण म्हणजे काय याचा विचार आपण करूया.

आजचं शिक्षणाचं क्षेत्र कितीही विशाल असलं, तरी त्याचे दोन भाग करणं आवश्यक आहे. एक जगाबद्दलचं शिक्षण आणि दुसरं स्वत:बद्दलचं शिक्षण. आजची असंख्य शास्त्रं, विज्ञान, कला आणि विद्या पाहिल्या तर, त्या बऱ्याचशा या जगाबद्दलच्या ज्ञानात मोडतात, असं आढळून येईल. जगाबद्दलच्या ज्ञानाची आणि शिक्षणाची वाढ अपरिमित आणि थक्क करणारी आहे, यात शंकाच नाही.

ज्या ठिकाणी जाऊन पोचणंही अशक्य आहे अशा महासागरांच्या तळात वास करणाऱ्या प्राणी, वनस्पती, दगड असल्या गोष्टींचं ज्ञान आणि शिक्षण आज उपलब्ध झालेलं आहे. दुसऱ्या बाजूला आपल्या डोळ्यांच्या कक्षेत कधीही येऊ न शकणाऱ्या अंतराळातल्या ग्रहगोलापर्यंतचं ज्ञान आणि शिक्षणही आज उपलब्ध आहे. जगातल्या अतिविशाल मानल्या जाणाऱ्या गोष्टींपासून ते केवळ अतिसूक्ष्मदर्शक यंत्रातून दिसू शकणाऱ्या जीवजंतूंपर्यंत या शिक्षणाची व्याप्ती पसरलेली आहे. कल्पनातीत ब्रह्मांडापासून सूक्ष्म परमाणूपर्यंत असंख्य गोष्टींचं ज्ञान माणसाकडं जमा झालं आहे. ते शिक्षणाच्या माध्यमातून तो इतरांना देऊही शकतो.

तरीही या साऱ्या ज्ञानाच्या विस्तारामध्ये हे सारं ज्याच्याबद्दल आणि ज्याच्याकडून सुरू आहे, त्या साध्या पाच-सहा फुटाच्या माणसाच्या अंतरंगाबद्दल मात्र ज्ञानाची आश्चर्यकारक वानवा आहे. जगाचं ज्ञान बाजूला

ठेवलं, तर फारच थोडं ज्ञान शिल्लक राहतं आणि ते स्वत:च्या शरीराविषयी आणि किंचित प्रमाणात स्वत:च्या मनाविषयीचं आहे. त्यातल्या शरीराविषयीच्या ज्ञानाला बऱ्यापैकी निश्चितता व शास्त्रीयता असली, तरी ज्या अंतरंगात मनुष्य शांत, आनंदी व सुसंवादी असायला हवा, त्या अंतरंगाविषयी मात्र ज्ञान अगदी नगण्य स्वरूपाचं आहे, असं म्हटलं तरी चालेल.

ही ज्ञानाची परिस्थिती असल्यामुळं खरं ज्ञान आणि त्यासाठी लागणारं खरं शिक्षण याची स्थिती किती शोचनीय आहे, याची कल्पना येऊ शकेल. ती इतकी शोचनीय आहे की, सगळ्या जगाच्या ज्ञानाच्या गदारोळात या स्वत:विषयीच्या ज्ञानाचा आणि शिक्षणाचा आवाज अत्यंत क्षीण व लुप्तप्रायच आहे. म्हणूनच खरं शिक्षण म्हणजे काय हा प्रश्न अनेकांना हास्यास्पद वाटू शकतो आणि तरीही तो खरा निकडीचा प्रश्न आहे.

खरं आपल्या हे लक्षात यायला हवं की, शांतता किंवा सुसंवाद याबाबतीत आपली जी दयनीय अवस्था होते, त्यातून तसं पाहाता कुणीही सुटत नाही. त्याला कुणीही अपवाद नाही. मग तो सत्ताधीश असो, अडाणी असो, निर्धन असो की, थोर शास्त्रज्ञ असो. जगाच्या बाबतीतल्या एखाद्या विषयाच्या ज्ञानाशिवाय किंवा शिक्षणाशिवाय माणसाचं एकवेळ किंवा वेळी आयुष्यभरसुद्धा चालू शकेल. रसायन, पदार्थ, जीव, भौतिक, अर्थ, वाणिज्य अशा कुठल्याही शाखेच्या ज्ञानाशिवाय एकवेळ मनुष्य पोटापुरतं मिळवू शकेल, जगू शकेल, त्याचा प्रपंच, घरदार अगदी मृत्यूपर्यंत सर्व काही व्हायला कुठलीही अडचण येणार नाही. मात्र त्याला शांत किंवा आनंदी किंवा सुसंवादी राहाता येणार नाही. कारण स्वत:विषयीचं ज्ञान किंवा शिक्षण नसेल तर, त्या शिक्षणाशिवाय कुणाचंही अडू शकेल. आज ते अडतं आहे, हा आपला सर्व जगभराचा अनुभव आहे. म्हणून हे स्वत:विषयीचं शिक्षण हे

खरं अपरिहार्य शिक्षण आहे.

असं खरं शिक्षण म्हणजे काय आणि ते कसं घेता येईल याचा विचार केला, तर जगाचं शिक्षण आणि स्वत:विषयीचं शिक्षण यांमधला महत्त्वाचा फरक आपल्या लक्षात येऊ शकेल. स्वत:विषयीच्या शिक्षणात शिकणारा आणि शिकण्याचा विषय तो स्वत:च आहे. त्यात पुन्हा हे दोनही अत्यंत जिवंत आणि सतत गतिमान आहेत. जगाच्या ज्ञानासारखा यात नुसता ज्ञानाचा ढीग करून ज्ञानी होता येत नाही. जगाचं ज्ञान साठवून मनुष्य त्यावर आयुष्यभर गुजराण करू शकतो. जसं एखाद्या प्राध्यापकांनी त्यांच्या विषयाच्या नोट्स एकदा काढून त्यावर थोडेफार बदल करीत आयुष्यभर नोकरी करावी, तसं स्वत:च्या ज्ञानाच्या बाबतीत नसतं. जाणणारा जिवंत आहे. तो प्रत्येक क्षणी बदलतो आहे. त्याची आशाआकांक्षा, निराशा, उत्साह याची समीकरणं प्रत्येक क्षणी बदलत आहेत. यासाठी तितक्याच जिवंतपणाची शिकणाऱ्याला गरज आहे. गोळा केलेलं स्वत:च्या स्वभावाविषयीचं ज्ञान एका क्षणात गैरलागू ठरण्याची शक्यता माणसाच्या बाबतीतच आहे.

स्वत:च्या विषयीच्या ज्ञानाचं हे एक वैशिष्ट्य आहे की, ते शिकण्याचे दोन प्रकार असू शकतात. एक तर, मनुष्य कोणत्याही एखाद्या माणसाच्या अंतरंगाचा अभ्यास करील किंवा तो स्वत:च्याच अंतरंगाचा अभ्यास करील. मुळात माणसाचं मन हे इथून तिथून सर्वत्र सारखंच असल्यामुळं इतरांच्या मनाच्या किंवा अंतरंगाच्या अभ्यासावरून त्याला जसं स्वत:विषयी शिकता येईल, तसंच ते स्वत:च्या मनाच्या अभ्यासावरूनही शिकता येईल. या शिक्षणाचं आणखी एक वैशिष्ट्य आहे की, ते शिक्षण माणसाला प्रत्येक क्षणी सावध राहायला शिकवतं. कारण त्याशिवाय हे शिक्षण शक्य होत नाही.

दुसरं एक वैशिष्ट्य असं की, हे शिक्षण जगातल्या इतर विषयांच्या

शिक्षणासारखं त्या विषयापासून बाजूला राहून शिकता येत नाही. हे शिक्षण केवळ तादात्म्यानं शिकता येतं. ज्याच्याविषयी शिकायचं - मग ते स्वतः असो किंवा इतर कोणी असो - त्याच्या अंतरंगाशी तादात्म्य झालं की, लगेच त्याचं ज्ञान होतं आणि पुढचा मार्गही गवसतो. आनंदात आलेले विक्षेप समजतात आणि दूर होतात.

स्वत:विषयीचं शिक्षण हे स्वत:तला गोंधळ आणि विसंवाद लक्षात आणून देतं. तो दूर कसा करावा, हेही लक्षात आणून देतं. माणसाला सर्वत्र दु:ख, विसंवाद किंवा निराशादायक परिस्थिती अनुभवायला येत असली तरी तिची माणसागणिक कारणं बदलत नसतात. त्याची कारणं मनाच्या एका ठरावीक चाकोरीतून किंवा स्वभावातून जन्माला आलेली असतात.

म्हणून वर पाहिल्याप्रमाणं माणसं लौकिकदृष्ट्या अडाणी किंवा ज्ञानी, सामान्य किंवा सत्ताधीश, जडवादी किंवा आध्यात्मिक - कुठलीही असली तरी त्यांना होणारं दु:ख, त्यासाठी स्वत:चं शिक्षण घेण्याची गरज या गोष्टी सगळीकडं सारख्याच असल्याचं आढळेल.

या सगळ्यासाठी मात्र जगाच्या शिक्षणाबरोबर स्वत:च्या शिक्षणासाठी आपण थोडा वेळ काढला पाहिजे. कारण ते आपल्याला मुक्त करू शकणारं खरं शिक्षण आहे. हे जर एकदा लक्षात आलं, विचारानं पटलं तर त्यासाठी आपण स्वतःपुरतं काय करू शकतो, हे शोधता येईल. दुसरं म्हणजे हे शिक्षण नसल्यामुळं आपल्याला येणारं अस्वास्थ्य कोणतं आहे, हे लक्षात येईल. त्याचबरोबर याच शिक्षणाच्या अभावानं इतरांना स्वतःला आणि त्यांच्यामुळं आपल्याला दु:ख का पोचतं आणि ते कसं दूर करता येईल, याविषयी विचार करता येईल. त्यामधूनच या बाबतीतल्या विसाव्याचा मार्ग मोकळा होईल !

* * *

वृद्धत्व हा तसा कुणाला सहसा नकोसा वाटणारा, पण हमखास येणारा पाहुणा आहे. तो पाहुणा मुळात नकोसा वाटणारा असल्यामुळं काहीतरी घडेल आणि तो आपल्याकडं येणार नाही, अशा सोयीस्कर समजुतीत अनेक माणसं प्रौढपण घालवतात. पण कधीकधी कुणी म्हातारी माणसं पाहिली, त्यांची शारीरिक विकलता, प्रकृतीच्या तक्रारी, स्वभावातला हेकटपणा, त्यानं स्वत:ला आणि आजूबाजूच्यांना दु:खात ठेवणारं त्यांचं जीवन - हे सारं पाहिलं की, तरुणांना किंवा प्रौढांनाही क्षणभर अस्वस्थता येते.

पण पुढं उगीचच असं वाटतं की, आपलं काही असं होणार नाही. आपण मुळात एवढे वृद्ध होणारच नाही, निवृत्त झालो की, लगेच किंवा त्या पूर्वीसुद्धा तब्येत अगदी ठणठणीत असताना विजयी मुद्रेनं आपण जाऊ शकणार आहोत, असे विचार मनात येतात आणि अस्वस्थता दूर होते. निराशा झटकली जाते. वस्तुस्थिती तात्पुरती डोळ्यांआड होते. पण ती टळत नाही आणि महिनाअखेरच्या ठरलेल्या दिवशी उत्तम नोकरीबद्दल गळ्यात हार घालून हातात मात्र निवृत्तीचं पत्र द्यावं, तसा निसर्ग एके दिवशी वाढदिवसाचं अभिनंदन करतानाच वृद्धत्वाचा संदेश आपल्या हातात ठेवतो. नाखुषीनं का होईना, वृद्धत्वाला सामोरं जावंच लागतं. मग अभ्यासाची टाळाटाळ केलेली असताना, जर एखादी परीक्षा द्यायला लागली, तर प्रत्येक पेपर जसा काठावर सुटत जातो, तशी आनंदाची परीक्षा काठावर कशीबशी निभावत वृद्धत्व पार पाडावं लागतं.

याला काही पर्याय नाही का, असा विचार सहजच मनात येईल. सुदैवानं त्याचं उत्तर 'होय' असं आहे. याला जरूर पर्याय आहे. ही वृद्धपणाची आनंदाची परीक्षा चांगल्याच नव्हे, तर उत्तम गुणांनी पास होता येऊ शकते. त्यासाठी एखाद्या परीक्षेच्या बाबतीत जसा थोडा अभ्यास करावा लागतो,

थोडी पूर्वतयारीची जोड द्यावी लागते. तसा काहीसा प्रकार या बाबतीतही आहे. फक्त यात आणखी एक सवलत अशी आहे की, आधी अभ्यास करणं आणि मग ही परीक्षा देणं हे तर यात शक्य आहेच, पण यात अशीही सोय आहे की, परीक्षा देता देतासुद्धा इथं अभ्यास करता येतो. आपले गुण वाढवीत राहाता येतं. त्यामुळं तरुणपणी किंवा प्रौढपणी याचा विचार एखाद्याला करता आला तर उत्तमच. पण त्या काळात ही पूर्वतयारी त्याला करता आली नसेल, त्यावेळी त्याला याची कल्पनाही नसेल तरीसुद्धा आज वृद्धपणीही तो या आनंदाच्या विद्येचा विचार करू शकेल, अंमल करू शकेल.

त्यामुळंच आपण वयाच्या कुठल्याही टप्प्यावर असलो तरी वृद्धपणीही आपल्याला आनंदी ठेवू शकणारे हे मार्ग आणि त्यासाठी करावा लागणारा विचार आपण जरूर समजून घेऊ या. या मार्गांकडं वळण्यापूर्वी वृद्धपणाची काही गंमतशीर वैशिष्ट्यं आपण लक्षात घेऊ. ही वैशिष्ट्यं गंमतशीर अशासाठी म्हणायची की, त्यात काही आश्चर्यकारक विरोधाभास आहेत. उदाहरणानं पाहायचं झालं, तर वेळेचं घेऊ. कामं करायला माणसाला वेळेची गरज असते. माणसाला कामंही भरपूर असतात, हे आपल्याला माहीत आहेच. तरुणपणी कितीतरी प्रकारची कामं डोळ्यांसमोर दिसत असतात. पण दुसऱ्या बाजूला वेळ मात्र अगदी कमी पडत असतो. हेच म्हातारपणी वेळ भरपूर असतो, पण कामंच सुचत नाहीत.

हीच गोष्ट निर्णयांच्या बाबतीत आहे. तरुणपणी अनेक कारणांमुळं माणसाला खूप प्रकारचे निर्णय घ्यावे लागतात. पण त्या वेळेला वय कमी, अनुभव कमी, त्यामुळं निर्णयक्षमता कमी - पण निर्णयांची संधी मात्र पदोपदी आणि भरपूर. उलट म्हातारपणी अनेक वर्षांच्या अनुभवानं, वयानं मनुष्य संपन्न झालेला असतो. त्यामुळं निर्णयशक्ती अधिक असते, ती प्रगल्भही असते. त्यावेळी मात्र बरेचसे व्यवहार पुढची तरुण पिढी पाहात असल्यानं

निर्णयांची संधी क्वचित आणि कमी येते. म्हणजे निर्णयांची संधी असते, त्यावेळेला क्षमता कमी पडते आणि वृद्धपणी क्षमता जास्त असताना निर्णयांची संधी कमी पडते.

अशा अनेक विरोधाभासांना म्हातारपणी जास्त तोंड द्यावं लागतं. त्यातून म्हातारपणच्या आनंदाला ग्रहण लागायला सुरुवात होते. आत्ताच्याच उदाहरणात पाहिल्याप्रमाणं अनेकांना त्यामुळं रिकामपण असह्य झालेलं दिसेल, तर निर्णयांच्या संधींच्या अभावी घरात कुणी आम्हाला विचारीतच नाही, अशा तऱ्हेची खंत किंवा खिन्नता अनेकांना आलेली दिसेल.

या सगळ्या परिस्थितीत काही मार्ग किंवा आधार आपल्याला अवश्य असतात. तशा एकाकी किंवा उदास वाटणाऱ्या या कालखंडात आपल्याला सोबत करणारे, आपलं एकटेपण दूर करणारे, आपली खिन्नता कमी करणारे, आपल्या आनंदात भर टाकणारे अनेक सोबती - सांगाती असू शकतात. फक्त गरज आहे, ती आपण त्यांचा परिचय करून घेण्याची, त्यांची सोबत - संगत घेण्याची. हे सांगाती छंद असू शकतात, अभ्यास असू शकतात, विधायक कार्यं असू शकतात.

त्यातलाच एक सांगाती म्हणजे, आपले विचार आणि आपलं तत्त्वज्ञान होय. तत्त्वज्ञान शब्दानं गडबडून जायचं काही कारण नाही. ती काही कुठली दूरवरची किंवा कठीण किंवा दुर्लभ गोष्ट नाही. आपला आयुष्याकडं बघण्याचा तो एक दृष्टिकोन आहे. आपल्या स्वत:त अगदी जवळ असलेला आणि आपल्या आनंदात मोलाची भर घालू शकणारा तो एक वैचारिक ठेवाच आहे.

प्रत्येकाला निसर्गानं बहाल केलेली ती विचारांची शक्ती आहे. मग आपल्याला क्षणभर असं वाटेल की, जर ती सोपी आणि सुलभ गोष्ट आहे तर ती इतकी वर्षं आपणा सर्वांना का उपयोगी पडली नाही ? त्याचं उत्तर

असं आहे की, अगदी आपल्यासमोर आपल्या जेवणाच्या पानात पाचसहा वस्तू वाढल्या असल्या किंवा समोर भांड्यात ठेवल्या असल्या तरीही, आपल्याला माहीत नसल्यामुळं किंवा आपलं लक्ष नसल्यामुळं आपला एखादा पदार्थ खायचा राहून जावा, तशी या तत्त्वज्ञानाच्या बाबतीत आपली अवस्था झाली आहे आणि - आपण तिकडं लक्ष देणं आणि आनंदासाठी त्याचा पुरेपूर वापर करणं - हेच त्यावरचं उत्तर आहे.

हेच तत्त्वज्ञान किंवा हा विचार आनंदासाठी आपल्याला कसा उपयोगी पडतो, विशेषत: वृद्धपणी तो आनंदासाठी आपला सांगाती कसा होऊ शकतो, याचा विचार आता आपण करू या. यातलं पहिलं तत्त्वज्ञान 'आकलनाचं तत्त्वज्ञान'. आकलन म्हणजे आपली समजून घेण्याची क्षमता. हे आपल्याला आनंदी ठेवू शकणारं मोठं तत्त्व आहे. आत्ताच आपण वृद्धपणात वाट्याला येणारे काही विरोधाभास पाहिले. ते म्हणजे आकलनाचा एक नमुनाच होत.

एखाद्या शेतकऱ्याला तरुणपणी जमीन, हवामान, पिकाची निवड यांचं पुरेसं ज्ञान नसताना पीकपाण्याचे अनेक निर्णय घेत जावं लागतं, प्रयोग करत राहावं लागतं. प्रौढपणी बरोबर निर्णय घ्यायची क्षमता येते तोवर वृद्धपण येऊन निर्णय मुलांच्या हातात जातात. निर्णय घेण्याच्या संधी कमी होतात. अशा वेळी ही वस्तुस्थिती जशी आहे, तसं तिचं व्यवस्थित आकलन करून घेणं, आपल्याला शक्य आहे. हे आकलन झालं तर खंतही टळते, निर्णय पुढच्या पिढीवर आनंदानं सोपवता येतात, त्यांच्या निर्णयांच्या परिणामांना आपल्यापरीनं उमेदीनं सामोरंही जाता येतं. यात आकलनाबरोबरच कळलेल्या परिस्थितीचा स्वीकार करण्याचं पुढचं तत्त्व येतं.

हे स्वीकाराचं तत्त्वज्ञान माणसाला कितीतरी दु:खांपासून, उद्वेगांपासून, चुकीच्या कृतींपासून वाचवू शकतं. समजा, एखादा निर्णय घेण्याची संधी

वृद्धपणामुळं आपल्या हातात नाही, हे कळलं आणि स्वीकारलं तर आनंदाचा मार्ग मोकळा होतो, हे आपण पाहिलंच. पण हेच आकलन आणि स्वीकार आपण केला नाही तर, निर्णयाची संधी आपल्याच हातात आहे, अशी स्वत:ची गोड समजूत आपण करून घेऊ आणि निर्णय घ्यायला जाऊ, मग मात्र फसू. पुढच्या पिढीलाही असे निर्णय स्वीकारता येणार नाहीत. परिणामी, त्यांनाही अस्वस्थता अन् आपल्यालाही दु:ख राहील.

हेच आपलं आकलन अधिक व्यापक असेल, तर आपल्या हेही लक्षात येईल की, अनेक वर्षांच्या अनुभवानं जरी आपली निर्णयक्षमता वाढली असल्याचं आपल्याला वाटत असलं, तरी नव्या पिढीसमोर दरम्यान अनेक नवे अनुभव, नवी परिस्थिती आलेली असू शकते आणि त्यानुसार त्यांनी निर्णय घेणंच योग्य असतं. त्यातून होणाऱ्या नफा-नुकसानीतूनच त्यांना अनुभव येणार असतो, त्यांची निर्णयक्षमता वाढणार असते. अशा वेळी आपलं आकलन आणि आपल्याला वृद्धपणी असलेल्या भूमिकेचा स्वीकार आपल्या आनंदात नक्कीच भर टाकतो.

आपल्या आनंदात भर टाकणारी जी अनेक तत्त्वं आहेत, त्यातलं आणखी एक तत्त्व साक्षित्वाचं. साक्षित्व म्हणजे तटस्थपणानं इतरांकडं किंवा स्वत:कडं पाहण्याची एक विद्याच. एखादा चित्रकार चित्राचा थोडासा भाग रेखाटून झाला की, पेन्सिल किंवा ब्रश खाली ठेवून थांबून क्षणभर चित्राकडं पाहतो. पुन्हा लांब जाऊन चित्राकडं पाहातो. तेव्हाच त्याला त्या चित्रामध्ये काय काय झालेलं आहे आणि काय काय करायला हवं आहे, याचं बरोबर आकलन होतं. त्या तटस्थतेनं पाहण्यामुळं त्याचं चित्र अधिक योग्य बनतं. हे झालं चित्र काढतानाचं. तीच गोष्ट चित्र काढून झाल्यानंतरची. चित्र काढून झाल्यावरही तो तटस्थतेनं ते चित्र न्याहाळतो. त्या चित्रातले गुणदोष त्याला कळतात. पण त्यात बदल करण्याची वेळ मात्र आता नसते. तसंच काहीसं

या साक्षित्वाचं आहे.

तरुणपणी किंवा प्रौढपणी आपल्या कर्तृत्वावाकडं अधूनमधून साक्षित्वानं पाहत असावं. त्यामुळं त्यात चांगल्या सुधारणाही करता येतात. कर्तृत्वात गुंतायलाही होत नाही. म्हातारपणी तर साक्षित्वानं अवश्य राहावं. कारण आता चित्र पूर्ण झालेलं असतं. त्यात बदल करायची गरज असलीच तरीसुद्धा बदल करायची वेळ संपलेली असते. मग ते चित्र आपण उभ्या केलेल्या घराचं असो, पैसाअडक्याचं असो, जमीनजुमल्याचं असो की, माणसाचं असो. आता त्या चित्राकडं आणि ते रेखाटणाऱ्या स्वत:कडंही साक्षित्वानं पाहायचा काळ आलेला असतो. त्यात जमलेल्या गोष्टींत-अहंकारात गुंतायचं नसतं किंवा न जमलेल्या गोष्टींत खंत करून किंवा निराश होऊनही गुंतायचं नसतं.

वृद्धपणी आनंदी ठेवणारं आणखी एक तत्त्वज्ञान 'कृतज्ञतेचं'. एखाद्याला आयुष्यात - चार गुंठे जमीन घेता येईल, चार मजली इमारत बांधता येईल, चार पैसे शिल्लक टाकता येतील, दोन मुलांचा प्रपंच मार्गी लावता येईल किंवा नुसती वडिलोपार्जित जमीन सांभाळता येईल, आहे त्या घराला डागडुजी करून राहाता येईल - असंच काहीसं करता येईल. पण ते सगळं करण्यासाठी निसर्गापासून माणसांपर्यंत अनेकांनी आयुष्यभर मोलाची मदत, मार्गदर्शन, साथ केलेली असते. तिची जाणीव ठेवण्याचा आणि त्यांच्याविषयीच्या कृतज्ञतेनं जगण्याचा हा उत्तम काळ असतो.

काय साधलं नाही आणि एवढंसंच का साधलं - अशा विचारांपेक्षा जे साधलं त्यासाठी आपल्याला कित्येकांनी निरपेक्षपणे, आयुष्यभर केलेली मदत आठवणं -यांसाठी हा वृद्धपणाचा काळ नक्की उपयोगी पडतो. अनेकदा तर अशी मदत इतरांनी करावी इतकी आपली योग्यता नसताना, त्यांनीच मनाचा मोठेपणा ठेवून केलेल्या मदतीमुळं, आपल्याला हे सारं साध्य झालेलं

असतं, हा विचार मनात जरी ताजा राहिला, तरी तो मन आनंदित ठेवतो, प्रफुल्लित ठेवतो. त्यात जर आपल्या आपल्या परिस्थितीनुसार ही कृतज्ञता व्यक्त करणारी छोटी, मोठी कृती आपण या काळात करू शकलो, तर आपला वृद्धपणीचा आनंद नक्की वृद्धिंगत होतो.

या कृतज्ञतेच्या विचाराचा संबंध आणखी एका महत्त्वाच्या बाबतीत आहे. ती बाब म्हणजे आपल्या शारीरिक स्थितीची. म्हातारपणी आनंदावर विरजण घालणारी अर्धीअधिक बाब शारीरिक दु:खाशी निगडीत असते. वृद्धपणीची आजारपणं किंवा वैगुण्यं ही अनेकांना दु:ख देतात किंवा निराशा आणतात, हे खरं आहे. पण आधी म्हटल्याप्रमाणं अशी वैगुण्यं हीसुद्धा आकलनाचा किंवा समजून घेण्याचा भाग असतो. अनेक वेळा आपल्याला दिलेल्या शारीरिक क्षमतांचा अतिरिक्त किंवा चुकीचा वापर हे जसं या वैगुण्याचं कारण असू शकतं, तसंच आहार, योग्य व्यायाम अशांकडं आपलंच झालेलं दुर्लक्ष हेही वृद्धपणच्या शरीरदु:खाचं कारण असू शकतं.

काही वैगुण्यं ही तर केवळ वयोमानामुळं आलेली असू शकतात. हा झाला आकलनाचा भाग. पण कृतज्ञतेचं तत्त्वज्ञान जाणणारा, त्याही पुढं जाऊन आपल्या वैगुण्यांच्या किंवा शारीरिक उणिवांच्या वृद्धपणीच्या परिस्थितीतसुद्धा आनंदी कसा राहू शकतो, ते आपण आता पाहू.

आज घडीला त्यालाही ऐकू कमी येत असेल, लांबचं दिसत नसेल, छोटीमोठी व्याधी असेल, लहानसहान अपघातांना सामोरं जावं लागत असेल, तरीही त्या क्षणीसुद्धा तो हा विचार करू शकेल की, ज्या वेळेला मला नोकरी - व्यवसायासाठी चांगलं ऐकू येण्याची, चांगलं दिसण्याची गरज होती, त्यावेळी याच कानांनी किंवा डोळ्यांनी मला केवढी मोलाची साथ दिली होती. आज भले ते कार्यक्षम राहू शकत नसतील, तरी वेळेला त्यांनी केलेल्या मदतीविषयी कृतज्ञ राहाणं हेच आज अधिक गरजेचं आहे.

तीच गोष्ट अपघात आणि व्याधींची. या गोष्टींना ऐन उमेदीत सामोरं जावं लागत नाही, हे निसर्गाचे म्हणा, शरीराचे म्हणा किंवा इतर घटकांचे म्हणा केवढे उपकार आपल्यावर असतात. त्यामानानं आज अशा दु:खांना वेळ देणं किंवा आनंदानं सामोरं जाणं हे किती सोयीचं आहे, हे आपल्या लक्षात आलं तर मनुष्याला दु:खाला किंवा निराशेला जागा उरणार नाही.

तीच गोष्ट असल्या शारीरिक व्याधींवर किंवा उणिवांवर होणाऱ्या खर्चाची. उमेदीच्या काळात यावर होणारे खर्च उद्‌भवले असते, तर आपल्या चालत्या प्रपंचाच्या गाड्याला खीळ बसली असती. अनेक महत्त्वाची कर्तव्यं पार पाडता आली नसती. अशा वेळी याबद्दल तक्रार करण्याऐवजी आपल्याला ते खर्च सोयीनं करायला मिळाल्याबद्दल उलट कृतज्ञताच वाटेल आणि तो अपरिहार्य खर्च आपण आज आनंदानं करू शकू.

सारांशानं असं म्हणता येईल की, आपलं आहे तेच वृद्धपणीचं जीवन आपण विचारांच्या किंवा तत्त्वज्ञानाच्या साहाय्यानं आनंदी करू शकू. आकलन, स्वीकार, साक्षित्व, कृतज्ञता या आणि अशांसारख्या आपल्या ठिकाणी वसत असलेल्या अनेक विचारांचा, तत्त्वांचा आपण लवकर परिचय करून घेऊया आणि वापरही करूया. तरुण किंवा प्रौढांना पूर्वतयारी म्हणून या तत्त्वांचा उपयोग होईल, तर वृद्धांना आपलं आजचं वृद्धपणीचं जीवन आनंदी करण्यासाठी उपयोग होईल.

अखेर तत्त्वज्ञान किंवा तत्त्व किंवा शाश्वत विचार हे सार आहे आणि तो दृष्टिकोनही आहे. आनंदाचं सार सापडलं तर असार दु:ख गळून जाईल. दृष्टी बदलली, विचार बदलले, तर वृद्धपणीची दु:खमय सृष्टीही बदलेल आणि ती आनंदाची होईल !

* * *

आपल्याला कुठल्याही एखाद्या घरात आढळण्यासारखी परिस्थिती आहे. प्रश्न नेहमीप्रमाणं सासूबाईंचा व सुनेबद्दलचा आहे. सुनेचं वागणं बरोबर नाही, तिला रीत नाही, वळण म्हणून काय ते लागलेलं नाही, आमच्या वेळी लहान मुलं नव्हती का ? आम्हाला त्यांना कसं वाढवावं कळत नाही का ? पण हिची तऱ्हा काही औरच आहे. हातात घास घेऊन भात भरवण्यासाठी घरभर फिरण्यापासून ते मुलांच्या ड्रेसखरेदीपर्यंत कुठलंच काही सासूबाईंच्या मनाला येत नाही.

तीच परिस्थिती एका वेगळ्या बाबतीत वडिलांची आणि मुलाची आहे. मुलाला सतत असं वाटतं की, वडिलांना आर्थिक व्यवहार नीट कळत नाहीत, कुठेही गुंतवणुकी करून मोकळे होतात, कुणावरही विश्वास टाकतात. यापेक्षा अमुक एका शेअरमध्ये गुंतवले असते, अमुक एका कंपनीत टाकले असते, तर आजवर कुठल्या कुठं फायदा झाला असता. अर्थातच, आपण आहे त्यापेक्षा कितीतरी चांगल्या परिस्थितीत राहू शकलो असतो आणि निदान आपल्याकडे आहे त्यापेक्षा जास्त पैसा नक्की साठला असता.

क्षणभर दुसऱ्या बाजूला जाऊन त्यांचंही म्हणणं ऐकलं तर काय ऐकू येईल ? सूनबाई म्हणतील सासूबाईंच्या वागण्यात काही ताळमेळ नसतो. एकदा गोष्ट अशी कर म्हणतील, काही दिवसांनी अशी कशी काय केली, तशी कर असं म्हणतील. माणसाच्या वयाचा आदर ठेवायला हरकत नाही. पण त्यांचंही वागणं आदर वाटण्यासारखं नको का असायला ? त्यांना माझा, माझ्या कामाचा, माझ्या कुवतीचा विश्वास म्हणून तो कसा वाटतच नाही. एखादी गोष्ट करायला सांगतील, सोपवतील पण एक तास किंवा एक दिवससुद्धा शांत राहणार नाहीत. दहा वेळा मी बरोबर काम करते की नाही, याची चौकशी करतील. अशानं काम करण्याचा आनंदही नाही आणि

आत्मविश्वासही नाही. एकूण त्या वाईट आहेत हे खरं.

वडिलांची परिस्थिती याहून फार वेगळी नाही. मुलाची कुवत, हुशारी, बुद्धिमत्ता ते ओळखतात. पैशाचे व्यवहारही ते जाणतात. गुंतवणुकीचे पर्याय त्यांना थोडेफार माहिती आहेत. पण पैशाच्या सतत विचारात राहणारी व पैशाच्या सारख्या उलाढाली करणारी माणसं फार पुढं गेलेली नाहीत. एखाद्या ठिकाणी मोठी हुशारी करून काही मिळवतात आणि दुसऱ्या ठिकाणी अनपेक्षित परिस्थितीमुळं मिळवलेलं घालवतात. असं त्यांना अनुभव सांगतो. मिळवलेला पैसा किंवा असलेला पैसा हा व्यवस्थित जीवन जगायला पुरेसा आहे, असं असल्यानं यापेक्षा त्याचा विचार करणं व्यर्थ आहे, असं त्यांना वाटतं. त्याशिवाय त्यांनी अमुक एक करावं किंवा करू नये, असं म्हणणाऱ्या मुलानं स्वतः पैशाचा कितपत योग्य आणि पुरेसा वापर केला आहे, ते त्यांना दिसतंच आहे. जो ते नीट करू शकत नाही, त्याला हे असं असायला हवं होतं, वगैरे म्हणण्याचा काही अधिकार नाही, असं म्हणून ते मुलाचं म्हणणं फेटाळतात.

या एका छोट्याशा आणि हरघडी घडणाऱ्या प्रसंगात अनेकदा वर सांगितलं त्याप्रमाणं चित्र दिसतंच पण ज्याच्या त्याच्या भूमिकेवर जो तो ठाम असल्यामुळं त्याचे पुढचे दुष्परिणामही अनेकदा दिसतात. सासू-सुनेची खरं तर मूळ मतभेदांमुळं सुरू होणारी कुरबुर इतरत्र कुठली तरी कारणं घेऊन आयुष्यभर सुरू राहते. त्याला कालांतरानं शीतयुद्धाचं व शत्रुत्वाचं स्वरूप येतं. वडील - मुलाच्या बाबतीतसुद्धा परिस्थिती फारशी वेगळी नसते. त्यांच्यातही अशा तऱ्हेचे विसंवाद हळूहळू दुराव्याचं स्वरूप धारण करताना दिसतात. पुढंपुढं मग इतर निमित्तं, प्रसंग त्यात भाग घेतात. आणि मूळ दुराव्याचा प्रश्न कल्पनेपेक्षाही मोठा करून ठेवतात. एकदा चुकीच्या रस्त्याला लागल्यावर जशी भलतीसलती गावं वाटेत लागावीत आणि देवाच्या

आळंदीची गाडी चोराच्या आळंदीला जावी तशी आपल्या संबंधाची गाडी अशांती, अविश्वास, असमाधान, दुरावे अशा भलत्याच मुक्कामाला जाऊन पोचते.

एक थोर तत्त्वज्ञ कृष्णमूर्ती काय म्हणतात, ते जर समजून घेतलं, थोडं त्यानुसार जगून पाहिलं तर निदान चोराची आळंदी तर नक्की टळू शकेल. कृष्णजींचं म्हणणं असं की, जगाला मोजण्याची एक फूटपट्टी प्रत्येकाकडं नकळत असते. माणूस तिच्यात जे येईल, ते बरोबर आणि न येईल ते चुकीचं असं ठरवत असतो. आयुष्यात फार क्वचित तो या स्वतःच्या फूटपट्टीकडं किंवा तिच्या अचूकतेकडं पाहतो ! किंबहुना अशा तऱ्हेच्या फूटपट्टीवर आपण जगातल्या माणसांना, विचारांना, पंथांना, व्यवस्थांना, घटनांना मोजत असतो. हेही त्याच्या क्वचित लक्षात येतं. त्याला बरोबर वाटतं म्हणजे ते बरोबर आणि त्याला चूक वाटतं म्हणजे ते चूक अशा भ्रमात तो आयुष्यभर जगतो. पण वस्तुस्थिती पाहिली, तर चित्र खूप वेगळं असतं. अनेक वेळा घटनेच्या सगळ्या बाजू त्याला माहीत नसतात. त्याचा अनुभव अत्यंत मर्यादित असतो. माणसं किती वेगवेगळ्या वातावरणात, परिस्थितीत वाढलेली असतात याची त्याला कल्पना नसते. परिस्थितीला अनेक बाजू असू शकतात आणि त्या बाजूंत तथ्यही असू शकतं. परिस्थितीत अनेक बदल होत असतात. ज्यानुसार निर्णय, मतं, भूमिका बदलणं गरजेचं असतं. निसर्गामध्ये, मानवनिर्मित संस्कृतीमध्ये अपार वैविध्य आहे. त्यानुसार माणसांच्या धारणा, अनुभव खूप वेगवेगळ्या प्रकारचे असू शकतात.

या आणि अशा अनेक प्रकारच्या गोष्टींची कल्पनाही नसताना आपली मतं ठाम ठेवणं किंवा दुसऱ्यांना आपल्या फूटपट्टीनं मोजायला जाणं किती धाडसाचं आणि अनर्थकारी असू शकतं, याची कल्पनाच केलेली बरी. पण अशा फसव्या फूटपट्टीनं आपण जगाला चूक - बरोबर ठरवतो. त्यानुसार

त्याच्याशी व्यवहार करतो, हे तर रोज आणि आयुष्यभर घडतं आहे ! मग आपण अशांतता आणि असमाधानाला आमंत्रण देणार नाही, तर दुसरं काय होईल ? या नेहमीच्या फूटपट्टीचं फसवेपण पुन्हा एका वेगळ्या गोष्टीत आहे. ती अशी की, ती फूटपट्टी कधी कायम नाही. अनेकांची मतं, आग्रह, पंथ वेळोवेळी बदलत असतात. त्या त्या प्रमाणं ते लोकांना चूक बरोबर ठरवतात. स्वतः बदलल्यावर लोकंही त्यांच्या दृष्टीनं चांगल्याचे वाईट आणि वाईटाचे चांगले होतात. याची त्यांना स्वतःला कल्पनाही असत नाही. हे म्हणजे कधी आठ, कधी अकरा, कधी चौदा इंचाची फूटपट्टी घेऊन मोजायला बाहेर पडल्यासारखं नाही का ? अशावेळी निघणारे निष्कर्ष चुकीचे असणं स्वाभाविकच आहे. माणसानं परिस्थितीचा अनुभव विचारात घेऊन बदलक्षम राहावं हे बरोबरच आहे, पण इतरांचं मोजमाप करताना, त्यावर आपले सारे व्यवहार अवलंबून ठेवताना आपल्यात जसा विकास - बदल होतो, तसा तो इतरांच्यातही होत असतो, आपली मतं फार आग्रही राहण्याइतकी खरी नसतात, अशा गोष्टींचं भान ठेवलं तरी कितीतरी संघर्ष आणि चुकीच्या गोष्टी तो टाळू शकेल.

आधी पाहिलेल्या उदाहरणात प्रत्येकाच्या म्हणण्यात काही ना काही तथ्य जरूर आहे. ते कधी अनुभवानं आलेलं आहे, परिस्थितीनं आलेलं आहे, कधी कुवतीप्रमाणं आलेलं आहे. फक्त अडचण अशी आहे की, ते अपूर्ण आहे, बदलक्षम आहे. असंच दुसऱ्याचं असल्यामुळं तेही समजून घेण्याची गरज आहे. या सगळ्याची जाणीव कुठंतरी कमी पडते आहे. म्हणून संबंध मित्रत्वाचे व पूरक न होता, शत्रुत्वाचे व मारक होतात.

हे अगदी साध्या उदाहरणापासून मोठमोठ्या आंतरराष्ट्रीय किंवा जागतिक संघर्षांपर्यंत सर्वत्र लागू असल्याचं आढळून येईल. या साऱ्या ठिकाणी फसव्या फूटपट्टीचं भान आपण ठेवू शकलो, तर कृष्णजींचं म्हणणं

आपणा सर्वांशी किती निगडित आहे, ते लक्षात येऊ शकेल आणि ते लक्षात ठेवून वागल्यास आपण संघर्ष किंवा नकारात्मक गोष्टी कशा कमी करू शकतो, तेही कळू शकेल.

हे सगळं होऊ शकेल पण आजची वस्तुस्थिती अशी आहे की, लहानांचं क्षणभर सोडा पण अनेक प्रौढ किंवा मोठ्या माणसांनाही आपले विचार फसवे असू शकतात, त्यांच्यावर अनेक प्रभाव असू शकतात, त्यामुळं ते चुकीचे ठरतात, अर्थातच त्या विचारांच्या साहाय्यानं इतरांचं मूल्यमापन करणं हे दोघांनाही अस्वास्थ्याचं ठरू शकतं - याची कल्पना नसते. त्यामुळं याचा परिणाम म्हणून अनेक कुटुंबात, संस्थांमधून, कामकाजाच्या कार्यालयांमधून, सामाजिक गटांतून - विसंवादाचे अनुभव येत असतात.

वर म्हटल्याप्रमाणं त्यासाठी आपल्या स्वतःच्या विचारांकडं, त्यातल्या संभाव्य त्रुटींकडं, त्यात करता येण्यासारख्या दुरुस्त्यांकडं लक्ष देण्याचा विचार जर सतत मनात राहील, त्यानुसार कृतीचे प्रयत्न राहतील - तर हा विचारांचा विकास आपल्याला नक्की विधायक अनुभव देईल. विसंवाद कमी होतील, अस्वास्थ्य कमी होईल, आपले इतरांशी संबंध अधिक सुसंवादी, निदान कमी त्रासाचे राहतील. मात्र त्यासाठी या स्वरूपाच्या विचारांकडं, त्याच्या विकासाकडं वेळीच लक्ष देणं गरजेचं आहे, नाही का ?

* * *

आजकाल घडणाऱ्या असंख्य अनपेक्षित, विपरित घटनांनी मनुष्य विचारमग्न राहतो. अनेकदा परिस्थितीच्या रेट्यापुढं तो हतबलही असतो. मग विचारांनी चित्त भ्रमून जातं. एक प्रकारचा मानसिक थकवा येतो. त्यातच त्या त्या प्रांताप्रमाणं सणावाराचे असलेले गणपती, दसरा, दिवाळी असे सणाचे दिवस येतात. आपण थोडं थांबून पाहिलं तर दर वर्षी साऱ्या वर्षभरात अनुभवायला येणारी काळजी, असमाधान, निराशा, वैचारिक थकवा - सारं काही पुसून टाकणारे विशेषतः दिवाळीसारखे चारपाच दिवस खरोखर अद्‌भुत वाटतात. कारण अगदी मोलमजुरी करणाऱ्या गरीबांपासून प्रचंड उद्योग करणाऱ्या धनिकांपर्यंत सर्वांच्या आयुष्यात हे दिवस, हे आनंदाचे दिवस दर वर्षी नित्यनेमानं उगवतात, सारा ताणतणाव विसरायला लावतात आणि आनंदाची उधळण करून निरोप घेतात. पुन्हा दुसऱ्या दिवाळीची माणूस वाट पाहात पाहात सारं वर्ष ढकलतो.

आपण आत्ताच असं म्हटलं की, सर्वांना - अगदी गरीबांपासून श्रीमंतांपर्यंत, लहानांपासून थोरांपर्यंत सर्वांना हे दिवाळीचे चार दिवस आनंदाचे वाटतात आणि त्यामुळं पुढं वर्षभर त्यांची प्रतीक्षा करीत राहावं, त्यांची वाट पाहात राहावं असं वाटायला लावणारे असतात.

पण ही खरंच वस्तुस्थिती आहे का ? आपण असे सणच साजरा न करणारे किंवा ही प्रथाच नसलेले जगातले इतर लोक सोडून देऊ. पण आपल्याच संस्कृतीतले, आपल्याच भोवताली असलेले असे काही लोक आहेत की, ज्यांच्या बाबतीत आत्ता म्हटलं तशी वस्तुस्थिती नाही. म्हणजे 'दिवाळीचे चार दिवस'च केवळ त्यांना आनंदाचे ठरत नसून वर्षातले उरलेले सारे दिवसही त्यांना दिवाळी सारखेच आनंदाचे वाटतात !

सामान्य माणसाला हे ऐकतानासुद्धा जरा कसंतरी होतं, अविश्वास

वाटतो, नवल वाटतं. पण हे खरं आहे. खरं म्हणजे अपवाद म्हणून किंवा कधीतरी चुकून खरं ठरणारं - 'असलं' खरं नसून हे वर्षानुवर्षं, शतकानुशतकं खरं ठरलेलं 'खरं' आहे. ते लोक कोण, त्यांना तसा अनुभव कसा येतो, तो अनुभव येण्यासाठी त्यांनी काय केलं, आपल्या आपल्या ठिकाणी आपल्यालाही या 'दिवाळी'च्या चार आनंदाच्या दिवसांमध्ये आणखी चार दिवसांची भर घालता येणं शक्य आहे का, शक्य असल्यास ते आपल्याला कसं करता येईल, इतकंच काय, असे आनंदाचे दिवस चाराचे आठच नव्हे तर आठाचे सोळा किंवा सोळाचे बत्तीस करीत जाणं, वाढवीत जाणं शक्य आहे का - या साऱ्या सहज येणाऱ्या शंकांचा नि प्रश्नांचा तितक्याच सहजपणे उलगडा आपल्याला करता येतो का, यावर विचार करण्याचा आपण प्रयत्न करू. हे जर आपण साध्य करू शकलो, तर आपल्या विचारविश्वात आणि आयुष्यात ती कदाचित अत्यंत मूल्यवान आणि संस्मरणीय भर ठरेल.

असा हा चार दिवसांपुरता आनंद साऱ्या वर्षभर अनुभवणारे हे महानुभाव म्हणजे संत-सत्पुरुष होत ! 'आनंदाचे डोही आनंदतरंग' म्हणणारे हे संत म्हणजे नुसते चार दिवस किंवा चार वर्षं आनंद अनुभवणारे लोक नसून अखंड याच आनंदाच्या अवस्थेत राहून तो आनंद आत मावेनासा होऊन, त्या आनंदानं ओसंडून जाऊन, साऱ्या जगाला तो प्रेमानं वाटून टाकणारे महानुभाव आहेत.

बरं, ते काही अलौकिक म्हणून सोन्याचांदीचे होऊन जन्माला आले म्हणावं, तर तसं नाही. कुठून अचानक पृथ्वीवर अवतीर्ण झाले म्हणावं, तर तसंही नाही. ते काही आमच्यापेक्षा आगळ्यावेगळ्या विलक्षण सुखमय परिस्थितीत वाढले म्हणावे, तर तसंही दिसत नाही. इतकंच काय, कित्येक सत्पुरुषांनी पूर्वायुष्यात काढलेल्या हालअपेष्टा किंवा तोंड दिलेली प्रतिकूल परिस्थिती पाहिली, तर आपल्या वाट्याला आलेली परिस्थिती ही

त्याच्यापेक्षाही कितीतरी पट चांगली आहे, असं कबूल करायला लागेल.

कुठल्या तरी खेड्यापाड्यात किंवा वेळी नगर - शहरात जन्म. अनेकदा फार मोठं काही वैशिष्ट्य नसलेले आईवडील. फारशी अनुकूलता नसलेली आर्थिक-सामाजिक परिस्थिती. शिक्षण, संगोपन पाहावं तर चारचौघांसारखं. अनेकांच्या बाबतीत तर तेही यथातथाच - मग या साऱ्या पार्श्वभूमीवर ही आनंदसागरातली झेप त्यांनी कशी काय घेतली असावी, असं वाटतं. श्री ज्ञानोबांच्या काळात त्यांनी 'निरंतर दिवाळी'चा अनुभव घेतला आणि सांगितला, तोच अनुभव शेकडो वर्षांपूर्वीच्या उपनिषत्कारांनीही सांगावा नि तोच अखंड आनंदाचा अनुभव सातशे वर्षांनंतरच्या अगदी अलीकडच्या श्री रमण महर्षींनी किंवा श्री गोंदवलेकर महाराजांनीही उच्चरवानं सांगावा - हे सारे काही केवळ योगायोग नव्हेत. त्यासाठी ज्या दृष्टीनं आपण काही वेगळेपण त्यांच्या पूर्वपरिस्थितीत, शिक्षणात, संगोपनात शोधतो आहोत तसं ते त्यात सापडणं कठीण आहे, हेही खरं आहे. असा आनंदाचा अखंड अनुभव त्यांना येण्याची कारणं काही वेगळी आहेत, हे खचितच.

ती काय आहेत हे समजून घेण्यापूर्वी एक गोष्ट पाहाणं आवश्यक आहे की, हा खरा आनंद नक्की काय आहे. आपण आपल्या अनुभवाच्या बाजूनं पाहू या. दिवाळीच्या चार दिवसांमध्ये आपण अतिशय आनंदात असतो. दु:ख-निराशा सारं जणू हद्दपार झालेलं असतं, म्हणजे काय ?

दिवाळीचा दिवस उगवला तेव्हा तो सूर्य सकाळी नेहमीप्रमाणंच, नेहमीच्याच दिशेला उगवला. फक्त रोज आपण त्याच्या स्वागताला सज्ज नसत असू, आज पहाटे उठून, सगळं आवरून आपण सज्ज होतो. एरवीच्या दिवशी तो उगवल्यावर आपण काही वेगळं केलं नसेल पण जे आज केलं, ते एवढंच की, आंघोळी वगैरे आवरून शुचिर्भूत होऊन देवदेवतांचं, मंगलमय दिव्यांचं पूजन करून आपण जणू जगाला संजीवन देणाऱ्या त्या

सूर्यनारायणाला ओवाळलं असेल, त्याचं आनंदानं स्वागत केलं असेल. म्हणजे तसं पाहिलं तर, वर्षातल्या इतर दिवसांसारखाच उगवलेला आजचा दिवस सृष्टीकडून, सूर्याकडून पाहिलं तर काही आगळा - वेगळा नव्हता. तसा तो उद्याही नसेल. तरीही आजचा दिवाळीचा दिवस आपल्याला अगदी आनंदाचा वाटतो.

याचा अर्थ आता उघडच आहे की, बाहेर काही बदल घडला नाही. बदल घडला तो आपल्याकडून घडला. त्याही बदलात पुन्हा दोन प्रकार आपल्याला दिसतील. एका बाजूला आपण पहाटे उठणं, सडे-रांगोळ्या घालणं, शुद्ध स्नान करणं, फटाके उडवणं, मंगलदीप लावणं अशा अनेक क्रिया केल्या. त्यामुळं म्हणजे, त्या क्रिया एरवी रोज करीत नसल्यामुळं, एक प्रकारचं नावीन्य, वेगळेपण आपण अनुभवलं, ज्यानं आपल्या आनंदात भर घातली.

पण दुसऱ्या बाजूला आणखी बरंच काही घडलं. आत्ता सांगितलं तशा आतूनही अनेक गोष्टी केल्या. दिवाळीच्या या दिवसांत करतो आणि करणार आहोत, त्या साऱ्या आतल्या गोष्टी मात्र न दिसणाऱ्या आहेत, अंतरंगातल्या आहेत.

उदाहरणानंच पाहायचं, तर आज सकाळी सार्वजनिक नळावर कुणी नंबर मागंपुढं करायचा प्रयत्न केला तर एरवी हमरीतुमरीवर येणारे आपण - आतून विचार केला, म्हणालो, जाऊ दे, त्यांची खरंच अडचण - गडबड होती आणि आज दिवाळीच्या दिवशी हा वाद, ही अप्रिय गोष्ट नको ! आज घरातलं कुणी काही चुकलं, चुकून बोललं तर एरवी ते लावून धरणाऱ्या आपण विचार केला - माझं नाही का चुकत कधी, जाऊ दे, आज नुसतं समजावून सांगू, त्याचाही उपयोग होईल, अगदी रागावण्याचं आणि आदळ-आपट करण्याचं काही कारण नाही. आज दिवाळी आहे, सगळ्यांचा मूड

खराब करायला नको. आज कुठं कामावर गेलो, तिथं कुणी काम जास्ती लावलं, मनाविरुद्ध वागलं तर आपण म्हणालो कामाचं काय होऊन जाईल, आज दिवाळी आहे, आनंद बिघडू द्यायचा नाही !

असा दिवसभर विचार करीत राहिलो, याचा अर्थ आपण दिवसभर चुकीच्या गोष्टींना मान्यता देत राहिलो किंवा गैर गोष्टी योग्य आहेत, असं म्हणत राहिलो असा नाही, तर ती प्रत्येक गोष्ट आत घ्यायची जी माझी मानसिक व्यवस्था आहे, तिच्यात मी बदल केला. मी मुळात असं ठरवलं की, शक्यतो आज आपला आनंद बिघडू द्यायचा नाही आणि शक्यतो आपल्याकडून इतरांचा आनंदही बिघडू द्यायचा नाही. एवढ्या नुसत्या मनोभूमिकेच्या बदलानंच माझ्या आनंदात कितीतरी भर पडलेली आहे, असं आपल्या अनुभवाला येईल.

यात बाहेर किंवा बाह्यतः ज्या वेगळ्या क्रिया मी केल्या असं म्हटलं, त्याचा संबंध नव्हता असं नाही. पण त्याही तशा कमी महत्त्वाच्या आहेत, असं लक्षात येईल. कारण ज्याच्या त्याच्या आर्थिक व्यावहारिक परिस्थितीप्रमाणं त्याला चार दिवे कमीजास्त लावता येतील, चार फटाके कमी किंवा जास्त उडवता येतील, थोडं गोडधोड कमीजास्त करावं लागेल, पण या साऱ्यांचा अनुभव आणि दिवाळीच्या आनंदाचा अनुभव मात्र सारखाच असेल. कारण बाहेरून करायच्या गोष्टी बदलल्या, कमीजास्त झाल्या तरी अंतरंगात करायच्या गोष्टी सारख्याच आणि तितक्याच केल्या गेल्या आहेत. हे एक महत्त्वाचं तत्त्व आपल्या या आनंदसंवादातून समोर आलं आहे की, दिवाळीतल्या आपल्या आनंदाचा खरा स्रोत, खरं मूळ हे आपल्या आत आहे. आपण आतून ठरवलेल्या भूमिकेत आहे, विचारात आहे.

यावरूनच हेही लक्षात येईल की, आपण आपला अनुभव पाहिला तरी आनंद ही मुळातच आत घडणारी घटना असल्यानं तिच्या अनुभवासाठी

बाह्यांगानं कुठली क्रिया घडायची मुळात गरज नाही. घडल्यानं बिघडत नाही, हे खरं. पण त्यावर आतला आनंदाचा अनुभव अवलंबून नाही, हेही खरं !

मग यावरून आपल्या हेही लक्षात येईल की, आपण मग एरवी वर्षभर म्हणा, आयुष्यभर म्हणा आनंद मिळवण्यासाठी ज्या अनेक गोष्टी बाह्यांगानं सृष्टीमध्ये करायचा प्रयत्न करीत असतो, त्यांचं काय ? त्यांची आनंदाला खरी गरज आहे की नाही ? आपण घरं बांधतो, बंगले-गाड्या घेतो, माणसं जोडतो, नाव कमवायचा प्रयत्न करतो, पैसा साठवतो, लग्न करतो, मुलंबाळंगोतावळा वाढवतो, सत्ता मिळवायचा प्रयत्न करतो, देणग्या देतो, देणग्या गोळा करतो, मरेस्तोवर सगळीकडं कष्ट करतो - नाना गोष्टी करतो. त्या साऱ्या बाह्यांगाच्याच म्हणजे दृश्यातल्या आहेत. मग आनंद एरवी त्यावर अवलंबून असतो का ?

तर खरं पाहिलं आणि आधी केलेल्या दिवाळीच्या आनंदाचा अभ्यास पाहिला, तर खरा आनंद हा या साऱ्या उपद्व्यापावर किंवा मालमत्तेवर अवलंबून नसतो. खरा आनंद हा आपल्या आतल्या वृत्तीवर, तिच्या स्थितीवर अवलंबून असतो. म्हणूनच असे सारे उद्योग वर्षानुवर्षं करूनही दु:खात किंवा तळमळीत दिवस कंठणारे भेटतात, तसेच असे एवढे उद्योग न उभारता जरुरीपुरता व्याप करूनही अतिशय आनंदात जगणारेही भेटतात !

म्हणूनच अखंड आनंदात राहाण्याचा अनुभव ग्वाही देऊन सांगणाऱ्या संतांना 'नित्य दिवाळी' अनुभवायला येते आहे, हे आपण पाहातो. पण पूर्वी पाहिली तशी त्याची कारणं ज्या ठिकाणी आपण पाहू गेलो - पूर्वपरिस्थिती, संगोपन, शिक्षण - अशा कुठल्या ठिकाणी मिळाली नाहीत. कारण मुळातच आनंद कशावर अवलंबून नाही. त्यामुळं ही कारणं शोधायची झालीच, तर ती अशा संतांच्या अंतरंगातल्या म्हणजेच आतल्या

घडामोडींमध्ये, साधनेमध्येच शोधावी लागतील. त्यांच्या आतल्या धारणेमध्येच शोधावी लागतील, त्यांच्या विचारांच्या बैठकीमध्ये शोधावी लागतील आणि ती सापडली तर ही विद्या आपल्यालाही सापडेल.

संतांचं या बाबतीतलं म्हणणं असं आहे की, जिला चिकटून राहाल तिचे गुणधर्म स्वीकारावे लागतील. आमच्या आजच्या आयुष्यात आम्ही आनंदाला अनेक वस्तूंना, घटनांना, माणसांना चिकटवून ठेवलं आहे. वस्तू तर बदलणाऱ्या आहेत, नाश पावणाऱ्या आहेत. स्वाभाविकच आमच्या आनंदालाही नाश पत्करावा लागतो. हीच परिस्थिती वेगवेगळ्या घटनांची आहे.

अमुक एक गोष्ट घडली की मला आनंद होणार, असं म्हणून मी आनंद तिला चिकटवून ठेवला की, एकतर ती घटना घडण्यावर तो अवलंबून राहील आणि ती घटनाही पुन्हा न टिकणारी असल्यामुळं ती घडून आनंद मिळाला तरी, तो आनंद घटना बदलली, बिघडली की गायब होणार, बिघडणार ! तीच गोष्ट माणसांवर अवलंबून असलेल्या आनंदाची आहे. ती सारी माणसं अशाश्वत, न टिकणारी, बिनखात्रीची असल्यानं तीच गत त्यांना चिकटवून ठेवलेल्या आनंदाची होते, हे वेगळं सांगायला नको.

मग या अखंड आनंदाच्या प्राप्तीसाठी संतांचा मार्ग काय ? तर आत्ता आपण जी वस्तुस्थिती पाहिली तिच्यातच तिचे दोन मार्ग असल्याचं दिसून येईल. आत्ताच पाहिलं, तसं आपण आनंद जिच्यावर अवलंबून, चिकटवून ठेवू तिचे गुणधर्म त्याला येत असल्यानं आणि आज तो अशाश्वत गोष्टींना - दृश्याला चिकटवून ठेवलेला असल्यानं आनंदसुद्धा अशाश्वत बनला आहे. हे लक्षात घेऊन तो अशा गोष्टींवर अवलंबून किंवा चिकटवून ठेवावा की, जी गोष्ट शाश्वत आहे, कधी न बदलणारी आहे, न बिघडणारी आहे, न गायब होणारी आहे. अशी शाश्वत वस्तू एकच - ती म्हणजे

भगवंत किंवा परमेश्वर ! आपला आनंद त्याच्यावरच अवलंबून ठेवावा. तोही त्या वस्तूप्रमाणंच शाश्वत टिकेल ! अर्थातच इथंही पुन्हा भगवंत दिसणारा, दृश्यातला नव्हे तर प्रत्येकाला सुलभ, उपलब्ध असलेला सर्वव्यापी, अंतर्यामीचा आहे, हे उघडच आहे !

नसेल तर संतांचा दुसरा अनुभवसिद्ध मार्ग - मनाचीच ठेवण बदलण्याचा आहे. तो म्हणजे आनंद मुळातच कशावर अवलंबून नाही, अगदी भगवंतावरसुद्धा, हे सतत भान ठेवून राहाणं. म्हणजेच निरुपाधिक आनंद आहे.

हे दोनही संतप्रणीत मार्ग अत्यंत शुद्ध आणि अनुभवसिद्ध आहेत. दिवाळीच्या चार दिवसात आपण तसं ठरवल्यामुळं जर आपला आनंद टिकवता येत असेल तर सततच आनंदाचा अनुभव घेणाऱ्या संतांनी सुचवलेल्या मार्गानं गेलो तर आपल्यालाही 'निरंतन दिवाळी'चा आनंद का अनुभवता येणार नाही ? संतांनी हा आनंद अनुभवण्यासाठी दोनही मार्ग चोखाळलेले आपल्याला दिसतील.

पहिला मार्ग हा की, आपला आनंद शाश्वत वस्तूला म्हणजे भगवंताला त्यांनी चिकटवून ठेवला. म्हणजेच त्यांचा सारा व्यवहार त्यांनी भगवंताशी जोडायचा प्रयत्न केला. परिस्थितीनं म्हणा, आपल्या निवडीनं म्हणा - जे कर्म आयुष्यभर करावं लागतं, ते कर्म त्यांनी प्रतिक्षणी भगवंताशी संबंध आणि संपर्क ठेवून केलं. आपली सारी माणसं, आपलं सारं कामकाज त्या भगवंताचं देणं समजून केलं. त्यातलं यशापयश, चढउतार सारे भगवंताला बरोबर घेऊनच केले. मात्र त्या माणसांशी, यशापयशांशी आपला आनंद त्यांनी कधी जोडला नाही. तो जोडला त्या भगवंताशी, तो भगवंत मिळवून देणाऱ्या गुरूशी, सत्संगाशी, भजनसाधनाशी ! त्यामुळं त्यांना हा अखंड आनंद गवसला.

तोच प्रकार दुसऱ्या मार्गानं - म्हणजेच आनंद मुळातच कशावर अवलंबून नाही असं मानण्याच्या मार्गानं जाणाऱ्या सत्पुरुषांचा. रोज उठून त्यांनी प्रत्येक घटनेकडं अशा दृष्टीनं, अशा तटस्थतेनं पाहिलं, तसं पाहाण्याचा अभ्यास केला की, तो विचार वागताना कायम ठेवला की, याचा माझ्या आनंदाशी खरोखरी काही संबंध नाही ! या घटना, चढउतार सुरू राहाणार. माझा आनंद मात्र निरुपाधिकपणे अबाधित राहाणार !

हे मार्ग एकदा समजल्यावर आपल्याआपल्या वृत्तीला कोणता मार्ग सोपा पडेल, एवढंच ठरवायचं आहे. मग तो निवडावा. अभ्यास करावा. सुरुवातीला आपण पाहिलं तसं मनातली दिवाळीसारखी आनंदाची अवस्था पहिल्यांदा चार दिवस टिकेल. सरावानं आठ दिवस. पुढं आठ दिवसांवरून वर्षांवर नि पुढं अखंड टिकेल ! मनाची अवस्था आनंदाची असावी, असं कुणाला वाटत नाही ? त्यासाठी ज्या अनेक धडपडी मनुष्य करतो, त्यातली ही एक त्याच्या आटोक्यातली धडपड आहे.

विचार व्यापक झाले, शुद्ध झाले, सुसंवादी झाले, चुकीच्या विचारांचं आकलन झालं, ते विचार टाळता यायला लागले, योग्य विचार टिकवता यायला लागले की, आतून ही विचारांची बैठकच बदलते. दृष्टिकोन बदलतो. अधिक चांगल्या, योग्य विचारांनी योग्य कृती घडतात. त्यानं परिस्थिती बदलते. त्या बदलानं आनंद वाढतो. चित्ताला विसावा होतो. पण जिथं तशा बदलांची गरज नसते, जिथं तसे बदल शक्य नसतात - अशा ठिकाणीसुद्धा आपलाच विचारांचा दृष्टिकोन बदलल्यामुळं अस्वस्थता कमी होते, विसावा होतो, आनंद टिकतो. त्या दिशेनं ही एक छोटीशी वैचारिक सुरुवात !

* * *

कोणत्याही माणसाला विचारशक्तीची मोठी अद्‌भुत देणगी आहे. तिचं वैशिष्ट्य हे आहे की, ती त्याला घडवू शकते, सतत दिवाळीसारख्या आनंदात ठेवू शकते, शांतीच्या मानससरोवरात विहरत ठेवू शकते किंवा ती त्याला सतत विचारमग्न ठेवून, भूत-भविष्याबद्दल काळजी उत्पन्न करून त्याला व्यग्र ठेवू शकते, त्याची झोप उडवू शकते. त्याच्याबरोबर त्याच्या संगतीतल्यांचं स्वास्थ्य घालवू शकते. इतकंच काय, फार टोकाला गेली तर ही शक्ती त्याच माणसावर उलटून त्याला उद्‌ध्वस्त करू शकते.

या विचारांचा आणि त्यांचा परिणाम म्हणून घडणाऱ्या घटनांचाच वावर माणसाच्या आजूबाजूला सदैव होत असतो. त्याला सुखी-दुःखी करत असतो. आपण परिस्थिती फारशी बदलू शकलो नाही, तरी योग्य विचारांनी तिला विधायक वळण देऊन चित्ताचा क्षोभ कमी करू शकतो. कधी नीट विचार करून वैचारिक समजूत वाढवून शांत राहू शकतो. एक नक्की की, विचारांनी प्रगल्भ झालेली व्यक्ती शांती आणि आनंदाचा अनुभव, आहे त्या जागी घेऊ शकते. योग्य विचारांनी मनाला विसावा देण्याचं किंवा वेळी इतरांनाही विसावा देण्याचं सामर्थ्य विचारांच्या ज्या प्रगतीमध्ये आहे तिचा परिचय आपण वेगवेगळ्या क्षेत्रांच्या संदर्भात पाहात आलो आहोत.

आता आपण असा विधायक - व्यापक - योग्य विचार केल्यास काय घडतं, याचा परिचय आजूबाजूला घडणाऱ्या प्रत्यक्ष काही घटनांच्या उदाहरणांनीच करून घेऊ.

●

एखाद्या घरात व्यापार हा पारंपरिक व्यवसाय असतो. पहिली पिढी त्यावेळेला असलेल्या गरिबीमुळं जास्त शिकू शकत नाही, इतर पर्यायही नसतात-अशा कारणांनी जो जमेल तो व्यापारउद्योग करून चार पैसे कमवायचा

ती पिढी प्रयत्न करते. त्यावेळी एखाद्या नव्या गावात जाणं किंवा पूर्वीच्या काळी अनेक लोक आपली गावं सोडून जिल्ह्याच्या ठिकाणी किंवा पुणे-मुंबईसारख्या शहरात जात, तसं करणं. तेव्हा ते एक धाडसच असे. फक्त परिस्थितीच एवढी हलाखीची असे की, आपण काही धाडस करतो आहोत, याची जाणीव होण्याएवढा वेळसुद्धा त्यावेळी नसे. अशा काळात कष्ट करताना दिवस कधी उजाडला आणि कधी मावळला, हेही कळत नाही. जिद्द आणि नशिबाची साथ मिळून यश येतं. सुस्थिती येते.

दुसऱ्या पिढीपुढं पहिला सेटअप तयार असतो. आधीच्या पिढीइतकी निकड किंवा हलाखी नसते. सेट झालेली गाडी तशीच पुढं चालवीत राहावं, तसं फारसे कष्ट न करता, मागच्या पिढीपेक्षा अधिक यश मिळवता येतं.

तिसरी पिढी येते, तिला मात्र आता पूर्वीच्या व्यवसायाचा आणि आजच्या काळाचा मेळ बसतो, असं वाटत नाही. दरम्यान त्यातच अनेक स्पर्धक उतरलेले असतात. मार्जिन कमी झालेलं असतं. वडिलोपार्जित संपत्ती टिकू शकते, पण बाजारातल्या चढ-उतारांनी काही वेळा पूर्वीइतके दिवस चांगले राहतील, असं वाटत नाही. शिवाय त्यांच्यासमोर जशी पहिली क्षेत्रं जुनी झाली, तशी आता नव्या काळाला धरून नवी क्षेत्रं, नव्या संधीही आलेल्या असतात. त्यात पुढं जाण्याचे मार्गही त्यांना सुचतात. थोडी परिस्थितीची ओढ किंवा निकड जाणवत असल्यामुळं आणि त्या वयातलं आव्हान म्हणूनही एकदम कुठं परदेशात जावं, नवीन उद्योगात पडावं किंवा किमान आहे त्या उद्योगाला पूरक आणि आजच्या काळाला साजेसं असं धाडस करावं, असं त्यांच्या मनात येतं. नव्या पिढीला यातला धोकाही दिसतो. पहिल्यांदा थोडंफार नफानुकसान होण्याची शक्यताही दिसत असते. पण इतपत धाडस केल्याशिवाय पुढच्या काळात आपण टिकणं किंवा प्रगती करणं शक्य नाही, हेही त्यांच्या डोळ्यासमोर असतं.

अशा नव्या पिढीतल्या मुलांच्या या धाडसाबद्दल थोडी काळजी वाटणारे मधल्या पिढीचे एक गृहस्थ बोलत होते. ते स्वतः वडिलांच्या पिढीचा व्यवसाय त्यात थोडी भर घालून त्याच ठिकाणी गिऱ्हाइकाचा बेस असल्यामुळं चालवू शकले. त्या अर्थानं यश टिकू शकलं. पण पुढच्या पिढीची ही योजना मात्र त्यांना एकदम धोक्याची, काळजीची वाटत होती. त्यात क्षेत्र थोडं नवीन, त्यातला अनुभव आपल्याकडं नाही, त्यात आपण परदेशात असल्यामुळं परस्वाधीन, काही अडचण आल्यास तिथं आपल्याला स्थानिक पाठबळ मिळेल की नाही - अशा अनेक चिंता त्यांच्या मनाला भेडसावीत होत्या. त्यामुळं या प्रस्तावाला होय म्हणावं की नाही, याबद्दल ते द्विधा होते. होकार देण्यात धोका दिसत होता, नकार देण्यात पुढच्या पिढीवर अविश्वास, त्यांची नाराजी याही गोष्टी दिसत होत्या. एकूणच सगळीकडं अस्वास्थ्य निर्माण झालं होतं.

या सगळ्याचा विचार केल्यावर त्यांना मी सहज म्हटलं की, ज्या वातावरणात आपण वाढला आहात आणि आपला व्यवसाय झाला आहे, त्याचा विचार करता ही सगळी काळजी रास्त आहे. फक्त मला एवढीच विनंती करायची आहे की, आपण एकदोन गोष्टींचाही याचबरोबर विचार करावा. एक, आपल्या मागच्या पिढीचा व्यवसाय, त्यातलं यश आपल्या डोळ्यांसमोरच आहे. कुठल्या आड-खेड्यात जिथं जाणं-येणं, शिक्षण कशाच्याच सुविधा नव्हत्या, कुठलं पाठबळ नव्हतं, मार्गदर्शन करणारं कुणी नव्हतं, पदरी भांडवल नव्हतं-अशा वेळी त्या खेड्यातून एवढ्या मोठ्या शहरात येण्यातलं धाडस आपण त्या काळाची कल्पना करून समजून घेऊ. आपल्या लक्षात येईल की, आज इथून परदेशात जाण्यात जे अंतर, परिस्थितीतला फरक, धाडस आपल्याला वाटतं आहे, तेच त्या काळातल्या त्या खेडेगावातल्या माणसाला त्यावेळेला वाटलं असेल. आजच्या सुख -

सोयींचा विचार करता, जवळ आलेल्या जगाचा विचार केला तर, त्या तुलनेनं आज परदेशात जायचं धाडस उलट सोपं वाटेल, शक्य वाटेल.

एवढ्या शहरात येताना कुठलाही आधार, इतर भांडवल, पाठबळ नसताना येणं आणि आज त्या मानानं या साऱ्या गोष्टी असताना परदेशात व्यवसायासाठी जाणं यात कुठलं अधिक सोपं आहे, हे तर सहज लक्षात येण्यासारखं आहे.

हे ऐकताच या प्रश्नाकडं बघण्याचा एक वेगळाच दृष्टिकोन समोर आल्यानं, त्यांच्या चित्ताला विसावा झाला. एकदा या दृष्टीनं विचार करायला लागल्यावर मग पुढचे गुंते, तणाव हेही आपोआप सुटत गेले. काळामुळं व्यवसायात फरक करण्याची गरज, नव्या व्यवसायातल्या संधी - अशा अनेक गोष्टी या विधायकच होत्या. त्या लक्षात आल्या. आपल्या मधल्या पिढीत हे प्रश्न फारसे न आल्यानं अशा बदलांचा मनाला विचार करण्याची फारशी वेळ आली नाही. नव्या कुठल्या गावी जाण्याचं धाडस करावं लागलं नाही. त्यामुळं आपल्याला या धाडसात, ते योग्य असूनही उगाचच जास्त धोका वाटतो आहे, हेही त्यांच्या लक्षात आलं.

अधिक विचार केल्यावर उलट हे लक्षात आलं की, काळाची पावलं ओळखून नवे, पूरक व्यवसाय शोधणं, त्यासाठी आवश्यक ती माहिती, तंत्र, मदत हे सारं गोळा करणं - यात पुढच्या पिढीचं नुसतं धाडसच नव्हतं, तर कौतुक करण्यासारखा दूरदर्शीपणाही होता. विचारात व्यापकता आल्यावर आता निर्णयातली नकारात्मकता किंवा अकारण होऊ शकणारे मतभेद, ताण हे सारंच एकदम नाहीसं झालं. उलट त्यांच्याच बाजूनं या प्रस्तावाचा आनंदानं विचार सुरू झाला. घरात त्याविषयी विधायक चर्चा सुरू झाली. पुढचे बेत आखले गेले. विचारांच्या व्यापकतेनं सर्वांनाच पुढं जाण्याचा उत्साहही आला होता आणि चित्ताला विसावाही !

*

●

अनेक पालक आपापल्या मुलांना वेगवेगळ्या कला शिकवतात. त्यासाठी क्लासला घालण्यापासून त्यांना त्याची साधनं उपलब्ध करून देण्यापर्यंत मेहनत घेतात. कलेनं माणसाचं जीवन पुढं समृद्ध होतं, यात शंका नाही. त्याला नेहमीच्या चाकोरीबद्ध आयुष्यातून एक चांगला विसावा, काही वेळा अभिव्यक्ती या निमित्तानं मिळते. त्यासाठी हा पाया घालणं उपयोगी असतं. गाणं शिको, वाद्य शिको, चित्रकला शिको की आणखी काही.

हे करताना एक थोडा अडथळा येऊन जातो. तो म्हणजे या कला शिकवण्याचा हेतू नकळत विसरतो. काही चांगलं द्यायचं आहे, ते पुढं आयुष्यभर पुरावं यासाठी कष्ट घ्यायचे आहेत. त्याचा उपयोग कसा करून घ्यायचा हे मोठं झाल्यानंतर या मुलांनी किंवा त्याच्या यातल्या गुरूंनी ठरवावं, हे खरं आहे.

पण आजूबाजूला बघून म्हणा, कुणाला मिळालेली प्रसिद्धी बघून म्हणा किंवा आपली अपरिपक्वता म्हणून म्हणा, या शिकणाऱ्या मुलाला लगेचच कुठं ना कुठं स्टेज मिळावं, संधी मिळावी, असे विचार येतात. ते मूळ धरतात. काही वेळा इतर लोक त्याला खतपाणी घालतात. गुरूंना या मुलांच्या तयारीची कल्पना असते. संधी देण्यातल्या फायद्या-तोट्यांची कल्पना असते. अनेकदा अकाली ते देणं त्यांच्या दृष्टीनं हिताचं नसतं. त्यात त्याच्या इतर करियरची गुंतागुंत होऊ शकते. अशा अनेक कारणांनी अशी संधी जर मिळाली नाही, स्टेज मिळालं नाही, तर एकवेळ मुलांना काही वाटत नाही पण पालकांचीच नाराजी आणि धुसफूस सुरू होते. गुरूंवर आरोप होतात, क्लास बदलले जातात, कुठल्या ना कुठल्या मार्गानं पुढं यायचे प्रयत्न होतात. क्वचित ते यशस्वीही होतात. तात्कालिक समाधान होतं. पण पुढं त्याचा फारसा उपयोग नसतो. उलट उपद्रव आणि निराशा वाढून ठेवलेल्या

असतात. त्या अनुभवांना सामोरं जावं लागतं. मुलांच्या मुळात मनात नसलं तरी आईवडिलांच्या सततच्या चर्चा किंवा प्रभाव यांमुळं त्यांनाही या परिणामांना प्रत्यक्षात अधिक सामोरं जावं लागतं. एकूण या कलांनी आनंद निर्माण होण्यापेक्षा किंवा पुढं आयुष्यात एक विसावा निर्माण होण्यापेक्षा कटू अनुभवच साठवले जातात. जे हे कलांच्या-साहित्याच्या बाबतीत असतं, तेच अधिक मोठ्या प्रमाणात साधनेच्या बाबतीतही असतं.

यात वर म्हटलेले विचार करणारे पालक जर सावध असतील, तर अशा संधी मिळवण्याच्या मागं ते लागणार नाहीत. कलेच्या मागं लागणं वेगळं आणि स्टेजच्या मागं लागणं वेगळं. पहिलं आपल्याला आयुष्यभर पुरणारी कला देऊन जातं, तर दुसरं आयुष्यभर पाठीमागं लागणारं असमाधान देऊन जातं.

म्हणून याचा योग्य विचार जर करता आला, तर त्यामुळं चित्ताला येणारे असे कटू अनुभव टळतात. खऱ्या काही विद्याही साध्य होतात आणि घरातल्या एकूण होणाऱ्या वातावरणावर होणारे परिणामही टळतात. याबद्दल बोलताना एक सत्पुरुष म्हणाले की, झाडावर भरपूर पानं असतात. त्यामध्येच योग्य वेळी फळं धरतात. जी फळं उघड्यावर असतात, त्यांची वाढ नीट होत नाही आणि ती पिकण्याअगोदरच कुणीतरी तोडण्याची शक्यता जास्त असते. यासाठी पानांच्या आडोशानं फळ वाढलं, तर ते सुरक्षितही राहतं आणि पूर्ण परिपक्वही होतं.

त्यांच्या म्हणण्यामागची विचारांची दिशा, दीर्घदृष्टी, हिताची दृष्टी- हे एकदा लक्षात आलं, तर आयुष्यात कितीतरी बाबतीत या विचारविकासानं आपली त्या त्या बाबतीतली निराशा, नकारात्मकता टळेल. उलट अशा हिताच्या, व्यापकतेच्या विचारांनी स्वतःच्या आयुष्याला योग्य दिशा मिळेल आणि आपल्या मुलाबाळांनाच नव्हे , तर कुटुंबातल्या , संबंधातल्या,

व्यवसायातल्या इतरांनाही ती मिळेल आणि स्वास्थ्य टिकेल !

*

●

एका गृहस्थांच्या अंगणात मोठी बाग होती. ते उत्तम निगा राखत असल्यामुळं बारा महिने बाग ताजीतवानी असे. प्रसन्न वाटे. त्यांच्या बागेतून त्यांच्या देवांसाठी ते फुलं नेत असत. गप्पा मारताना मी तेही पाहात असे. इतक्या प्रकारची आणि इतक्या संख्येनं असलेली फुलं डोळ्यांसमोर दिसत असत. पण त्यांच्या परडीत फक्त कुठली तरी पाच फुलं आणि एक तुळस असे. मला वाटे की, ते त्यांच्या देवांसाठी कितीही फुलं काढू शकतील, बाग त्यांचीच आहे, सुदैवानं फुलंही सदैव आणि भरपूर असतात. म्हणून मला हे त्यांचं देवासाठी पाच फुलं काढणं थोडं कोड्यातलं वाटे.

एकदा त्यांना मी त्याचा खुलासा विचारला. ते म्हणाले, आपण देवाला फुलं वाहायची, ती पूजेचा उपचार म्हणून. त्यातल्या त्यात फुलं हा सृष्टीतला अगदी श्रेष्ठ अविष्कार म्हणून. त्या माध्यमातून जास्तीत जास्त कृतज्ञता व्यक्त करता येते. आमच्या देवघरात पाचच देव आहेत. मी पाचच फुलं एवढ्यासाठी काढतो की, ही कृतज्ञता व्यक्त करायला देवाला एक-एक फूल पुरेसं आहे. मी म्हटलं, आपण अधिक फुलं वाहिल्यानं आपल्याला आणि देवाला अधिक आनंद होणार नाही का ? ते उत्तरले, तो आवडता पदार्थ थोडाच आहे की, जास्त करावा आणि जास्त खावा. मुळात फुलं आपल्या बागेत वाढली हीसुद्धा कृपाच आहे. निसर्ग फांद्यांच्या हातांनी देवाला पूजेची फुलं वाहतो आहे. त्यातून मुळात काही घेणं बरोबर नाहीच. पण गरजेपुरतं एक घेणं हेच ठीक आहे. निसर्ग या पूजेनं उलट आपल्यासारख्या इतर माणसांना त्याच्या आविष्काराचा आनंद,त्याच्या निर्मितीतला दैवी सुगंध देतो आहे. जास्त फुलं काढणं म्हणजे तो आपण कमी करणं नाही का ?

साध्याशा गोष्टीमागच्या या भूमिकेनं मनाला तर आनंद दिलाच. पण व्यापक विचारांतसुद्धा चित्ताला टिकाऊ विसावा देण्याचं किती सामर्थ्य असतं, याची कल्पना आणून दिली !

*

●

पुढं म्हटलं ती वेळ प्रपंचात कधीही येते. कधी तरुणपणी, प्रपंच मांडल्यावर, कधी लहान मुलांचे गोंधळ,व्याप वाढत चालल्यावर,कधी मोठ्या मुलांनी वेगवेगळे निर्णय घाईगर्दीचे, चुकीचे, अनपेक्षित घेतल्यावर, कधी निवृत्तीनंतर थकून एकाकी पडून आजूबाजूचा आयुष्यभराचा प्रपंच पाहताना.

हे नुसत्या प्रपंचातच नाही. अगदी पारमार्थिक उद्देशानं सुरू केलेल्या मंदिरात उत्सव कमिटीच्या मीटिंगमधल्या मतभेद-गोंधळ, मतभेदानंतर निर्माण होणाऱ्या उदास वातावरणात, एखाद्या यात्रा-उत्सवानंतर कुणी आवरायला नसताना तशाच पडून राहिलेल्या पालापाचोळा, कचरा, निर्माल्य, वाळलेले केळीचे खांब, सुकलेले आंब्याचे डहाळे, तुटून विस्कळितपणे वाऱ्यावर फडकत असलेल्या पताका-अशा पसाऱ्यात. एखाद्या मठात, आश्रमात-कुठंही.

त्या त्या ठिकाणी अनेकदा वाटतं की, हा चांगल्यासाठी मांडलेला एवढा पसारा ! तो हा एवढ्या गोंधळाचा कसा झाला ? इतक्या चांगल्या कल्पना होत्या, अजूनही आहेत, त्या सगळ्या यातून आता कशा निर्माण होणार, आकाराला येणार ? काही चांगलं-आपलं म्हणा, प्रपंचातल्या इतरांचं म्हणा किंवा सार्वजनिक कार्यात समाजाचं म्हणा-कसं होऊ शकणार ? अशावेळचा संभ्रम किंवा कधीकधी उद्विग्नतासुद्धा या विचारांनी वाढत वाढत जाऊन माणसाची कामाचीच नव्हे तर विचार करण्याचीसुद्धा उमेद खचते.

अशा साऱ्यातूनच जाणारे आणि त्यामुळे विचारांनी अधिकाधिक

उद्विग्न आणि त्यामुळं निराश होत असलेले एक तरुण गृहस्थ आता हा व्याप कुठं थांबवावा, अशा मनस्थितीत त्या साऱ्या प्रपंचाच्या गोंधळात विमनस्क होऊन खुर्चीत बसले होते. शांत, शुद्ध चित्तानं विचार करण्याची क्षमता असलेले एक पोक्त गृहस्थ तिथं आले. त्यांनी या युवकाच्या चेहऱ्यावरची चिंता पाहून हळुवारपणे आणि समजुतीनं विचारलं की, काय झालं. त्यावर त्या तरुणानं सारी परिस्थिती सांगितली.

ते अनुभवी गृहस्थ म्हणाले, ते असू दे. आपण जरा बाहेर चक्कर टाकून येऊ. बाहेर मोकळ्या वातावरणात त्या तरुणाचा तणाव आपोआपच थोडा कमी झाला. गावाबाहेर मोकळ्या रस्त्यावर आजूबाजूला झाडी होती, तिथल्या एका पुलावर ते दोघे पाच मिनिटं विसावले. पुलाखालून वाहणारा नाला बरोबर अनेक प्रकारचा केर-कचरा-गाळ घेऊन गावाबाहेर निघाला होता. त्यांच्या बाजूच्या रस्त्याच्या कडेच्या झाडांखाली कितीतरी वाळका पालापाचोळा पडला होता.

ते उठले आणि त्या तरुणाला घेऊन परत गावाकडं आले. येतायेता एक हॉटेल बघून, आपण जरा चहा घेऊया का म्हणाले. दोघेही स्तब्ध होते, वाफा येत असलेला चहा अत्यंत स्वादिष्ट होता. तो घेतल्यावर ते उठून बाहेर निघाले. निघतानिघता बाहेरच्या हॉलला लागून असलेल्या भटारखान्यातून मालकांचा आवाज आला. त्यांनी त्या तरुणाला खूण केली. दोघेही आत डोकावले. या गृहस्थांनी नमस्कार केला. विचारपूस केली. त्यावेळी आत हॉटेलचे मालक चुकार कामगारांवर आरडाओरडा करीत होते. आजूबाजूला कांद्याची, बटाट्याची सालं, सुऱ्या, उकळत असलेल्या कढया, पदार्थ असा न पाहावणारा खूप पसारा पडला होता.

घरी परतताना हे गृहस्थ एका टेलरिंगच्या दुकानात शिरले. बाहेरच्या शोकेसमध्ये काउंटरवर अनेक प्रकारचे, फॅशनचे, साधे उत्तम शिवलेले कपडे

टांगलेले होते. घरगुती ओळख असल्यानं त्या तरुणाला घेऊन ते गृहस्थ आत, रामराम टेलरकाका, आत आहात काय, असं म्हणत म्हणत त्यांच्या आतल्या खोलीत शिरले. आत दाटीवाटीनं मशिनं, कपड्यांचे ढिगारे, हातापायाखाली चिंध्या, कट केलेले तुकडे, अस्ताव्यस्त पडलेल्या कॉलर, दोऱ्यांची रिळं त्या सगळ्या गर्दीतून टेलरकाकांनी तिथूनच आनंदानं हात केला. आतल्या त्या सगळ्या पसाऱ्याकडं नजर टाकत म्हणाले, या सगळ्या चिंध्या हलवू, की आपण बाहेरच बसूया ? गृहस्थ म्हणाले, कुठंही ! मग बाहेर काउंटरवर कोचावर बसून ख्यालीखुशालीच्या गप्पा झाल्या. आजूबाजूच्या त्या शोरूममध्ये लावलेल्या नीटनेटक्या कपड्यांकडं त्या गृहस्थांचं आणि त्या तरुणाचं मधूनमधून लक्ष जात होतं.

थोड्या वेळानं घरी परतताना ते गृहस्थ त्या तरुणाला म्हणाले, कसं काय वाटतंय ? तो म्हणाला, मगाचचं माझ्यावरचं विचाराचं मळभ गेलं. त्या सगळ्यावर पुन्हा एकदा विचार करावा लागेल, हे नक्कीच ! त्यावर हे गृहस्थ म्हणाले, प्रपंच आहे म्हटल्यावर केर-कचरा गोळा होणार, सांडपाणी जमा होणार. पण आपण त्या सगळ्याची व्यवस्था लावतो. ती घेऊन जाणारा नाला निर्माण करतो, आपण कट्ट्यावर बसलो, तिथं आपल्या ते लक्षातही आलं नसेल की, हा नाला हे सगळं घेऊन जातो आहे म्हणून गावातल्या इतक्या घरात नीटनेटक्या वस्तू, नीटनेटके प्रपंच आणि प्रगती सुरू आहे. आजूबाजूला एवढा पालापाचोळा पडला असला, तरी त्यात शांतपणे उभ्या असलेल्या झाडावर नवीन हिरवी पालवी फुटलेली तू बघितली असशील. ती नुसती पाहतानासुद्धा खालच्या पाचोळ्याचा विसर पडत होता.

हॉटेलमध्ये आत एवढा आरडाओरडा, वस्तू, वास, वातावरण सगळं सांभाळलं जात होतं म्हणून त्यातूनच निर्माण झालेला निर्भेळ चवदार चहाचा कप आपल्याला बाहेर शांतपणे घेता आला. त्यानं आपल्याला ताजंतवानं

केलं. शेवटचं आपलं टेलरकाकांचं दुकान. इतक्या चिंध्या, तुकडे, वेस्टेज पायात पडलेलं होतं पण त्यातूनच निर्माण झालेले उत्तम कपडे शोकेसमध्ये आपलं लक्ष वेधून घेत होते आणि ते त्या त्या माणसांना खूप काळ आनंद देणार होते, उपयोगी पडणार होते.

आपले असे सारेच प्रपंच या अशा टेलरिंगच्या दुकानासारखे आहेत. तिथं चिंध्या, वेस्टेज, गोंधळ, तुकडे असावे तसे प्रपंचात अनेक गोंधळ, अनपेक्षित यश-अपयश, अनावश्यक गोष्टी, वेस्टेजेस - असं असणारच. पण ते असल्याशिवाय आपल्याला एरवीची स्वच्छता, नवी हिरवी पालवी, गरजेचे खाद्यपदार्थ - चहापाणी, व्यवहाराला, समारंभाला उपयोगी पडणारे उत्तम ड्रेस - हे कसं मिळेल ? त्यासाठी ही बाकीची किंमत त्या मानानं कमीच आहे !

तरुण म्हणाला, हो ! हे मात्र खरं आहे. या नुसत्या योग्य विचारानंच माझ्या मनाला दिलासा मिळाला आहे, विसावा झाला आहे, नव्यानं कर्तव्याला उभं राहायची उमेद आली आहे !

* * *

डॉ. सुहास पेठे यांच्या दर्जेदार व संग्राह्य साहित्याची सूची

(आता डिजिटल स्वरूपात)

१. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी** : श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

२. **हरिपाठपराग :** श्री ज्ञानेश्वरांच्या हरिपाठातील काही जीवनसूत्रांचे सुबोध विवरण

३. **दर्शन :** आजच्या काळाचे अंतर्मुख करणारे दर्शन घडवणाऱ्या नव्या बोधकथा

४. **कर्तव्याची सश्रद्ध पाऊलवाट :** कर्तव्य निश्चितीसाठी सविस्तर मार्गदर्शन, शंकासमाधानासह

५. **साधनपदावली :** येथे अभ्यास,भजन व चिंतनासाठी घेतली जाणारी निवडक साधनपदे

६. **जपसंकल्प : स्वरूप व पद्धती :** जपाच्या संकल्पांसंबंधी प्रश्नोत्तररूपाने सुबोध, उपयुक्त माहिती

७. **अभंगसाधना :** श्री गोंदवलेकर महाराज यांच्या अभंगांचे साधनदृष्ट्या विवेचन

८. **जाग :** आनंदमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

९. **जीवनजिज्ञासा** : जे. कृष्णमूर्तींच्या विचारांचा सुबोध परिचय

१०. **विचारविश्वाची ओळख :** आपल्या विचारांच्या विश्वाची सर्वांना उपयोगी ओळख

११. **चैतन्यचिंतन :**श्री ब्रह्मचैतन्य गोंदवलेकर महाराज यांच्या काही बोधवचनांचे सुगम विवरण

१२. **किमया** : प्रकाशमय जीवनासाठी सोपी विचारसूत्रे

१३. **प्रसादकण** : श्री तुकोबांचे नित्योपयोगी चोवीस अभंग व त्यांचे निरूपण

१४. **ठेवा** : उपनिषदांतल्या जीवनदृष्टीचे सुबोध व आगळे विवेचन

१५. **संतबोध : भाग १ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१६. **संतबोध : भाग २** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१७. **संतबोध : भाग ३** : विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

१८. **वृत्त्यंतरप्रकाश** : खऱ्या परमार्थाचा श्रीगणेशा करण्यासाठी मोलाची मदत

१९. **नाम** : नामाच्या जिज्ञासूंसाठी सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

२०. **श्री विष्णुसहस्रनाम : एक जीवनशैली** : सहस्रनामांतील निवडक नामांतून उलगडणारी जीवनशैली

२१. **चिंतनक्षण : भाग १ ते १२ (एकत्रित आवृत्ती)**
चिंतनास उपयुक्त अशी एकूण ३६६ बोधवचने

२२. **उपासनेची नोंदवही :** विविध व्यक्तिगत उपासना संकल्पांची पॉकेट साईज नोंदवही

२३. **उत्तरायण - भाग १ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२४. **शोध :** जिज्ञासू साधकांसाठी जे. कृष्णमूर्तींच्या काही विचारांचा सोपा अभ्यास

२५. **दिशा :** वास्तवावर विचार करण्याच्या काही उपयुक्त कथारूप दिशा

२६. **उत्तरायण - भाग २ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

२७. **मुलांच्या गोष्टी पण सर्वांच्यासाठी :** मुलांसाठी उद्‌बोधक व रंजक गोष्टी - मोठ्यांनाही उपयोगी पडतील अशा

२८. **बासरी :** जीवनसंगीत सुरेल करण्यासाठी काही कथामय बोध

२९. **उपासना :** खऱ्या उपासनेची गरज, स्वरूप, शंका यांचा सोपा उलगडा

३०. **श्री ज्ञानेश्वरी : अध्याय बारावा : समओवी :** श्री ज्ञानेश्वरी बाराव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

३१. **कृपापदावली भाग : १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३२. **कृपापदावली भाग : २ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी निवडक अभंग, पदे, नव्या आरत्या, नव्या नमनमाला, नवे नित्यपाठ, श्लोक, प्रार्थना इत्यादी

३३. **साधनपदावली भाग १ :** भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

३४. **सारविस्तार भाग : १ :** चिंतनक्षण वचन क्र. एक ते आठ वरील ९ निरूपणे

३५. साधनप्रेरणा : नित्योपासनेसाठी संतछायेतील संतप्रतिमा व नमनमाला यांचे डेस्कटॉप कॅलेंडररूपाने दर्शन, गुरुपदपप्रतीक व आरत्यांसह

३६. मेरी यात्रा (हिंदी) : हिंदी कविताओं में निबद्ध साधन-यात्रा

३७. बोधपाठ : आधुनिक नित्यपाठ, २७ अभंग, विवरण, विश्वात्मकाच्या आरतीसह

३८. एकाध्यायी विचारगीता : (विवरणासह) : आदर्श मानवी जीवनासाठी आचरणीय विचारांचे मोजके सार

३९. सृष्टिसंदेश : (विवरणासह) : जीवनाला विधायक दिशा देणारे २७ अभंग सृष्टीच्या आरतीसह

४०. गुरुतत्त्वतरंगिणी : गुरुतत्त्वाच्या कार्याचे तीन अध्यायांत सुबोध श्लोकबद्ध विवरण

४१. श्री ज्ञानेश्वरी : अध्याय नववा : समओवी पारायणप्रत

४२. नाम (इंग्रजी आवृत्ती) : The Simplest Path For Spiritual Liberation

४३ ते ५४. चिंतनक्षण : भाग १ ते १२ (स्वतंत्र छोटी पुस्तके) :
डॉ. पेठे यांची चिंतनास उपयुक्त अशी बोधवचने

५५. शिदोरी : व्यक्तिगत, सामाजिक व पारमार्थिक हितासाठी विचारमंथन

५६. विचारविसावा : विसावा देणारी विचारांची विद्या

५७. सारविस्तार भाग २ : चिंतनक्षण वचन क्र. नऊ ते तेरा वरील ७ निरूपणे

५८. महाराजांची शाळा : श्री गोंदवलेकर महाराज यांच्या कल्याणकारी उपदेशाचं लहान थोर सर्वांना उपयोगी ठरू शकणारं सोपं विवरण

५९. साधनपदावली भाग २ : भजन, चिंतन, मनन यांसाठी संतांचे निवडक अभंग, पदे भूमिकांसह

६०. आरतीपुष्पमाला : डॉ. सुहास पेठे रचित विविध नवीन आरत्या

६१. विनवणीची वाणी : चौदा आर्त अभंग प्रास्ताविक व निवेदनांसह

६२. श्रद्धेची पहाट : खऱ्या सुखाचा वास्तवाधार कथारूप बोध..

६३. उपासनामाला : येथे केल्या जाणाऱ्या विविध उपासना

६४. **पावनपथ :** श्री कृष्णदास महाराजांचा जीवन पावन करणारा उपदेशमार्ग

६५. **अनुभवपुष्पे - भाग १ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

६६. **कृतज्ञतामार्ग :** कृतज्ञता या गरजेच्या गुणाचं सार्वत्रिक महत्त्व, जन्मभर व मृत्यूनंतर आचरणासाठी कालोचित, सोप्या, सार्वत्रिक कृती, सर्वांना स्वतंत्रपणे सहभागी होता येण्यासारखे मराठी मंत्र

६७. **ज्ञानेश्वरीच्या प्रकाशात :** आजच्या जीवनासाठी ज्ञानेश्वरीची सोपी ओळख

६८. **श्री ज्ञानेश्वरी अध्याय नववा : समओवी : (मोठ्या आकारातील विशेष आवृत्ती)** श्री ज्ञानेश्वरी नवव्या अध्यायाची आजच्या सोप्या मराठीतील समओवी

६९. **संतबोध : भाग ४ :** विविध संतांच्या बोधवचनांची निरूपणे

७०. **श्री रमणमहर्षीकृत उपदेशसार :** मूळ श्लोक मराठी समश्लोकीसह

७१. **उत्तरायण -भाग ३ :** जिज्ञासू साधकांच्या विविध प्रश्नांना डॉ.पेठे यांनी दिलेली उत्तरे

७२. **अनुभवपुष्पे - भाग २ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७३. **श्रद्धा :** श्रद्धा या विषयावरची सोपी प्रातिनिधिक प्रश्नोत्तरे

७४. **अनुभवपुष्पे - भाग ३ :** चिंतनासाठी काही अनुभव-वचने

७५. **अर्घ्य :** ज्यांचे उपकार फिटत नाहीत, त्यांच्यासाठी समजून केलेल्या प्रातिनिधिक कृती, काही कथांच्या रूपानं

७६. **जीवनचिंतन :** दैनंदिन आयुष्यातल्या छोट्या गोष्टींतला मोठा बोध

७७. **स्वास्थ्यसंवाद :** मनःस्वास्थ्यासाठी सर्वांना उपयुक्त, सोपा सुसंवाद

७८. **वचनांजली भाग १ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

७९. **अक्षरायण :** आनंदप्राप्तीसाठी 'अक्षर' चिंतनसूत्रं

८०. **वचनांजली भाग २ :** श्री पेठेकाकांच्या प्रवचने, निरूपणे व साहित्यातील निवडक संपादित वचने

८१. **भावगीता :** श्रीमद्भगवद्गीतेचा मराठी समश्लोकी भावानुवाद

माणूस विचारशील आहे.
कळत. नकळतही.
विचार नैराश्य देतात,
उद्विग्नता आणतात.
तसेच त्यांची दिशा
बदलली, तर ते आनंद
देतात. विधायकता
आणतात. ते आपल्याला
निदान विसावा तरी देऊ
शकतात.
त्याविषयी ही थोडीशी
मदत.....

विचार विसावा